ACER-2 Hb 1825

सत्यमेव जयते

CPA COMMONWEALTH PARLIAMENTARY ASSOCIATION

# संसदीय विशेषाधिकार : एक दृष्टीक्षेप

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तथा सचिव,
राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शासन

# Parliamentary Privileges : A Brief Overview

## (Evolution, Genesis, Growth)

**Dr. Anant Kalse,**
**Principal Secretary,**
**Maharashtra Legislature Secretariat and Secretary, Commen Wealth Parliamentary Association, Maharashtra Branch.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

# **संसदीय विशेषाधिकार :** एक दृष्टीक्षेप

**डॉ. अनंत कळसे,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तथा**
**सचिव, राष्ट्रकुल संसदीय मंडळ,**
**महाराष्ट्र शाखा**

# **Parliamentary Privileges :** A Brief Overview

## (Evolution, Genesis, Growth)

**Dr. Anant Kalse,**
**Principal Secretary,**
**Maharashtra Legislature Secretariat and**
**Secretary, Commonwealth Parliamentary Association,**
**Maharashtra Branch**

एचबी १८२५-१

# प्रस्तावना

भारताने स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला. भारतीय राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आल्यानंतर संसदीय कामकाज पद्धतीला भारतात खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. संसदीय कार्यपद्धतीचा मूळ गाभा म्हणजे जनतेचे सार्वभौमत्व आहे.

ब्रिटीश संसदेला लोकशाहीची जननी *(Mother of Democracy)* असे म्हटले जाते. संसदीय लोकशाहीच्या उगमाचा अभ्यास करावयाचा झाल्यास ब्रिटीश प्रथा व परंपरा, राजेशाही, ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्स या सभागृहाने; राजा, हाऊस ऑफ लॉर्डस तसेच न्यायालये यांच्या विरूद्ध अधिकारासाठी केलेला संघर्ष, मॅग्ना कार्टा, बील ऑफ राईट्स, वेगवेगळे चार्टर, रुल ऑफ लॉची संकल्पना, कॅबिनेट पद्धतीचा उगम कॉमन लॉ व वेगवेगळे कायदे यांचा तौलानिक अभ्यास करणे अतिशय गरजेचे आहे.

संसदीय भाषेमध्ये विशेषाधिकार *(Parliamentary Privileges)* म्हणजे सभागृह आणि त्यांचे सदस्य व सभागृहाच्या समित्या यांना सामूहिकपणे आणि सभागृहाच्या सदस्यांना वैयक्तिकरित्या प्रदान करण्यात आलेले विशेष अधिकार होय. विशेषाधिकाराची संकल्पना ही ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्सला असलेल्या विशेषाधिकारावरून घेतलेली आहे. विशेषाधिकाराचा मुख्य उद्देश सभागृहाचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व परंपरा तसेच अधिकार, अबाधित राहावेत असा असून सदस्यांना कोणत्याही बाह्य शक्तींच्या दडपणाविना (न्यायालयाच्या) मोकळेपणाने कार्य करण्यासाठी दिलेले आहेत.

ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्सला जे विशेषाधिकार प्राप्त झालेले आहेत तेच भारतीय संसद व राज्य विधिमंडळ त्यांच्या विविध समित्या व सदस्यांना सुद्धा प्राप्त झालेले आहेत.

सदर पुस्तिका विशेषाधिकारांच्या सर्व अभ्यासूंना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो. या पुस्तिकेत शक्य तेवढी अचूक माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तथापि, सभागृहांचे अधिकृत नियम वा निदेश, भारताचे संविधान यातील तरतुदींशी एखादी विसंगती यामध्ये आढळल्यास, संबंधित प्रकाशनांतील अधिकृत तरतुदी ग्राह्य समजल्या जातील. यास्तव सर्वांनी या महत्त्वाच्या प्रकाशनांचा देखील बारकाईने अभ्यास करणे इष्ट आहे. या पुस्तिकेच्या निमित्ताने सदस्यांनी केलेल्या सूचनांचे निश्चितच स्वागत केले जाईल.

हे प्रकाशन तयार करताना श्री. शिवाजीराव देशमुख, मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद आणि श्री. दिलीप वळसे-पाटील, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेले प्रोत्साहन, केलेल्या मौलिक सूचना व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

हे प्रकाशन तयार करताना श्री. नंदलाल काले, उप सचिव (विधी) व श्री. उमेश शिंदे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी केलेल्या उल्लेखनीय व मौलिक सहकार्याबद्दल मी त्यांचा येथे विशेषत्वाने उल्लेख करू इच्छितो.

या प्रकाशनासंदर्भात काही विधायक सुधारणा व सूचना आल्यास त्यांचे स्वागत केले जाईल.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १ नोव्हेंबर २०१४ .

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | विशेषाधिकारांचा उगम व इतिहास | १-२८ |
| २ | ब्रिटीश संसदेचे विशेषाधिकार | २९-३२ |
| ३ | विशेषाधिकाराबाबत राज्यघटनेतील तरतुदी | ३३-३८ |
| ४ | विशेषाधिकार | ३९-५० |
| ५ | महाराष्ट्र विधानमंडळासंदर्भात विशेषाधिकाराबाबत संक्षिप्त माहिती | ५१-५५ |
| ६ | विशेषाधिकार संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील तरतुदी | ५६-६० |
| ७ | मा. सभापती, विधानपरिषद यांचे निदेश | ६१-६४ |
| ८ | विशेषाधिकार संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमातील तरतुदी | ६५-६९ |
| ९ | मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे निदेश | ७०-७३ |
| १० | महाराष्ट्र विधानपरिषदेत विशेषाधिकार भंग सूचनांबाबत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती. | ७४ |
| ११ | महाराष्ट्र विधानसभेत विशेषाधिकार भंग सूचनांबाबत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती. | ७५ |
| १२ | विधानपरिषद विशेषाधिकार समिती | ७६-७७ |
| १३ | विधानसभा विशेषाधिकार समिती | ७८-७९ |
| १४ | विशेषाधिकार भंगाची काही प्रकरणे (विधानपरिषद) | ८०-१०२ |
| १५ | विशेषाधिकार भंगाची काही प्रकरणे (विधानसभा) | १०३-११७ |
| १६ | ससंदेतील काही प्रकरणे | ११८-१२२ |
| १७ | सभागृहाचे सदस्यत्व रद्द व निलंबित केल्याची प्रकरणे | १२३-१५३ |
| १८ | विशेषाधिकारभंगासंदर्भातील काही महत्त्वाचे न्यायनिर्णय | १५४-१९९ |
| १९ | इतर काही देशातील विशेषाधिकार संदर्भातील माहिती | २००-२१७ |
| २० | संदर्भ-सूची (Bibliography) | २१८ |

## १. विशेषाधिकारांचा उगम व इतिहास

भारताने स्वातंत्र्यानंतर ब्रिटीश संसदीय कार्यपध्दतीवर आधारित संसदीय लोकशाही प्रणालीचा स्वीकार केला. भारताची राज्यघटना ही दिनांक २६ जोनवारी,१९५० रोजी अंमलात आली. त्याप्रमाणे शासनाचे तीन विभाग म्हणजे विधीमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायपालिका अस्तीत्वात आले. मात्र राज्यघटनेने अंगिकारलेले सत्ताविभाजनाच्या सिध्दांताप्रमाणे (Doctrine of Separation of Powers) प्रत्येक विभागाने राज्य घटनेने आखून दिलेल्या मर्यादेतच कार्य करणे आवश्यक आहे. कारण राज्यघटना ही सर्वोच्च असून घटनेपासूनच या तीनही शासनाच्या विभागांना अधिकार प्राप्ती झालेली आहे. देशातील सर्वोच्च कायदा म्हणजे राज्यघटना होय. (Three Institutional wings of the Govt. Legislature, Executive and Judiciary derive their powers from the Constitution, which is supreme law of the land). "भारतीय संसद व विधिमंडळे यांची रचना ब्रिटीश संसदेच्या (हाऊस ऑफ कॉमन्स व हॉऊस ऑफ लॉर्डस) दोन्ही सभागृहांशी साधर्म्य साधणारी असून घटनाकारांनी घटना समितीमध्ये सखोल विचार विनिमयाअंतर्गत भारतीय संसद व विधिमंडळांना ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्स या सभागृहाला उपलब्ध असलेले विशेषाधिकार प्राप्त करून दिले.

यासाठी ब्रिटीश संसदेचा उगम याचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरेल." ब्रिटीश पार्लमेंटचा उगम इंग्लंडमध्ये तेराव्या शतकात झाला. पार्लमेंट ही संकल्पना फ्रेंच शब्द **"Parlement"** या शब्दावर आधारित असून याचा अर्थ बोलणे असा होतो. ( To Talk ) सन १२३६ मध्ये पार्लमेंट या शब्दाचा वापर इंग्लंडमध्ये प्रथमत: करण्यात आला. पार्लमेंट (संसद) म्हणजे राजाला सल्ला देणारे सरदार, अल्स, बॅरन्स, बिशॉप्स व ॲबोट्स यांची बैठक असा होतो. किंग एडवर्ड १, हा इंग्लंडचा, सन १२७२ ते सन १३०७ या कालावधीत राजा होता व त्याच्या कार्यकाळात पार्लमेंट ही संकल्पना निश्चित स्वरूपात आकारास आली. या संकल्पनेमध्ये राजपरिषद ( Kings Council ) व न्यायालये यांचा समावेश होता. पार्लमेंटमध्ये राजाद्वारे कायद्यांची निर्मिती होत असे व राजपरिषदेद्वारे ( Kings Council ) अध्यादेश काढले जात असत. या प्रकारे एक संसद विकसित होत गेली. या संसदेमध्ये, संसदेकडे प्रार्थना व विनंती करणारे क्लर्जी, त्याचप्रमाणे संसदेमध्ये वादविवाद करणारे बॅरन्स व संसदेमध्ये कार्य करणारे कॉमन्स यांचा समावेश होता. याप्रमाणे संसद ही हाऊस ऑफ लॉर्डस अर्थातच क्लर्जी, नोबेल्स आणि हाऊस ऑफ कॉमन्सचा समावेश असलेली पार्लमेंट झाली.

तेराव्या शतकापर्यंत कॉमन्सचे प्रवक्ते असत. मात्र ते सभागृहाच्या बैठकांमध्ये अध्यक्ष म्हणून कार्य करीत होते की नाही याची निश्चित माहिती उपलब्ध नाही. मात्र कालौघात हेच प्रवक्ते हे हाऊस ऑफ कॉमन्सचे अध्यक्ष म्हणून कार्य पाहू लागले. या प्रकारे हाऊस ऑफ लॉर्डस व हाऊस ऑफ कॉमन्स यांची निर्मिती चौदाव्या शतकामध्ये झाली व सतराव्या शतकामध्ये सध्या आपणास माहीत असलेली संसदीय कार्यपद्धती अस्तित्वात आली.

**इंग्लंडच्या इतिहासाबाबत थोडी माहिती घेणे उपयुक्त ठरेल**

इंग्लंडमध्ये विविध राजघराण्यांनी राज्य केले, सॅक्सन राजघराण्याने ५ वे शतक ते ९ व्या शतकापर्यंत राज्य केले. त्यानंतर "नॉर्मन" या राजघराण्याची सत्ता सुरू झाली. इंग्लंडला "सॅक्सन" या राजघराण्याची महत्त्वाची देण म्हणजे "मोनार्की" पद्धती. इंग्लंडमधील सात राज्ये इस्ट ॲन्ग्लिया, हेरिका, नार्थुरूबर लॅड, केंट, ससेक्स, इलेक्स, वेसेक्स यांचे एकत्रिकरण होऊन ते "सॅक्सन" राजवटीखाली एकवटले आणि पर्यायाने इंग्लंडमध्ये एकछत्री अंमल सुरू झाला.

अँग्लो-सॅक्सन राजवटीत वायटन (Witan) किंवा (Witenagemot) म्हणजे council of wise man या संस्थेने महत्त्वाचे कार्य केले. मात्र यामध्ये फक्त "राजाने" बोलविलेले राजघराण्याचे मुख्यअधिकारी (Chief officers of Royal House holds) बिशप, चर्चमन, अलडरमन व इतर राज्यांच्या उच्च अधिकाऱ्यांचा समावेश होता. "राजाच्या" अध्यक्षतेखाली या संस्थेच्या (witan) राज्यभर बैठकी होत.

"वायटन" या संस्थेचे इंग्लंडच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. कारण या संस्थेला राजाने बनविलेल्या कायद्यांना मंजुरी देणे, करार करणे, कराराला मंजुरी देणे, सैनिकी बळ उभारणे, बिशप, अलडरमन (alderman of shires) यांची नियुक्ती करणे, त्यांना काढून टाकणे, धार्मिक बाबींचे (ecclesiastical affairs) चे नियमन करणे, राजा समवेत "सुप्रिम कोर्ट ऑफ जस्टीस" म्हणून न्यायदानाचे कार्य करणे, इत्यादी अधिकार होते. जरी ही प्रतिनिधीक संस्था नसली तरी ती जनतेच्या आशा आकांक्षाचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजाने अन्यायपूर्वक कारभार केल्यास वा राजा राजघराण्याशी संबंधित नसला तर त्याला काढून टाकण्याचे अधिकार सुद्धा होते.

एकंदरीत राजघराण्याचे अनिर्बंध अधिकार (Kingship) ही संकल्पना "अँग्लो-सॅक्सन" कालावधीमध्ये अंमलात आली नव्हती. या काळात राजाने "परिषदेच्या सहाय्याने" कामकाज करावे अशी प्रथा अस्तित्वात होती. स्थानिक प्रशासन (Local Government) ही या कालावधीतच अस्तित्वाला आले कारण बहुतांश जनता ही त्याकाळी खेड्यात रहात होती. अशा प्रशासनाला हंड्रेड (Hundred) व शायर (shire) म्हणत.

ब्रिटीश संसदेला लोकशाहीची जननी म्हटले जाते. ब्रिटीश संसद जगातील सर्वात जुनी मोठी सर्वाधिक अधिकार (most powerful) असलेली संसदीय संस्था आहे. या संसदेला, लोकांकडून प्रत्यक्षात निवडून येण्यासाठी ८ शतके राजसत्तेविरुध्द संघर्ष करावा लागला.

हा संघर्ष किंग जॉन (१२१५) यांचे काळात सुरु झाला. त्याने "Magna Carta" -१२१५ स्वातंत्र्याचा जाहिरनामा (Charter of liberty) लोकांना दिला. त्यानंतर संसदेला दिर्घकाळ वित्तीय नियंत्रण, कायदे करण्याचे अधिकार व प्रशासनिक अधिकारांसाठी राजसत्तेविरुध्द व हाऊस ऑफ लॉर्डस विरुध्द झगडावे लागले. शेवटी १६८८ च्या क्रांतीनंतर ब्रिटीश पार्लमेंटचे सार्वभौमत्व प्रस्थापित झाले व राजघराणे हे अधिकाराच्या दृष्टीने नाममात्र उरले.

पार्लमेंटचे सार्वभौमत्व (Sovereignty) निर्मितीमध्ये तीन महत्वाच्या घटनांचा समावेश आहे. (Landmark Things) पहिली घटना म्हणजे १६४८ मध्ये पार्लमेंटने ठराव करुन किंग चार्ल्स या राजावर खटला चालविला व त्याला १६४९ मध्ये फाशी देण्यात आली. या संसदेने कायद्याने राजेशाही नष्ट करुन इंग्लंडला "कॉमनवेल्थ" घोषित केले व संसदेला सहकार्य करण्याच्या अटीवर चार्ल्स-II याला गादीवर बसविले.

दुसरी महत्वाची घटना म्हणजे १६८८ ची ब्रिटीश राज्यक्रांती. त्यावेळी जेम्स-II या राजाला घालवून देण्यात आले कारण तो संसदेला सहकार्य करीत नव्हता. या संसदेने विल्यम व मॅरी यांना गादीवर बसण्यासाठी पाचारण केले आणि १७०१ मध्ये सेटलमेंटचा कायदा पारित करुन राजगादीवरील वारसाबाबत अटी घालून दिल्या व कोणत्या अटीच्या अधिन राहून राज्यावर राहायचे यांचे निर्बंध घालण्यात आले.

आणि शेवटची तीसरी महत्वाची बाब म्हणजे १७८५ मध्ये "पीट" हा ब्रिटनचा पंतप्रधान झाला आणि राजाची मंत्रीमंडळ निवडण्याची व मंत्र्यांना काढून टाकण्याचे अधिकार काढून टाकण्यात आले. या काळात "ब्रिटीश कॅबिनेट" पध्दती मजबूत पायावर उभी राहिली; आणि मंत्रीमंडळ, संसदेद्वारे निवडले जाऊ लागले व बरखास्त केले जाऊ लागले.

संसदेची अधिकारीता सर्वोच्च होऊन कायदा, प्रशासन व वित्तीय नियंत्रण संसदेला प्राप्त झाले. एकप्रकारे संसद ही सार्वभौम संस्था म्हणून उदयास आली.

म्हणून असे म्हटले जाते ब्रिटीश संसद काहीही करु शकते, अपवाद फक्त पुरुषाचे रुपांतर स्त्रीमध्ये व स्त्रीचे रुपांतर पुरुषामध्ये करु शकत नाही.

(British Parliament can make or unmake anything except man into woman and woman into man)

ब्रिटनमध्ये न्यायालय संसदेचा कोणताही कायदा अवैध ठरवू शकत नाही. ब्रिटिश राज्यघटना ही अलिखित स्वरुपाची असून तेथे संसदेचे सार्वभौमत्व मान्य करण्यात आलेले आहे. Rule of Law किंवा कायद्याचे राज्य हे ब्रिटिश राज्यघटनेचे महत्त्वाचे तत्त्व आहे. प्राध्यापक डायसी यांनी या तत्त्वाचा हिरिरीने पुरस्कार केला. Rule of Law म्हणजे, कायद्यापुढे सर्व समान, कायद्याची सर्वोच्चता व ब्रिटिशांचे मूलभूत अधिकार हे न्यायालयाच्या माध्यमातून संरक्षित केले जाणे. या तत्त्वावरच ब्रिटिश संसद कार्यपध्दती आधारली असल्याचे दिसून येते.

प्राध्यापक मुनरो यांच्या मते गेल्या एक हजार वर्षांमध्ये इंग्लंडच्या नागरिकांनी त्यांचे प्रतिनिधी निवडणुकीद्वारे निवडलेले नाहीत अशी घटना घडलेली नाही. इंग्लंडचे नागरिक त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी टाऊनशिप, शायर, बरोह, पेरीश इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी निवडणुकीने निवडत होते.

नॉर्मन राजवटीच्या काळात राजाची सत्ता मजबूत होत गेली. जमीनदारी पध्दत (Federals) सुध्दा वाढीस लागली किंबहूना त्याला एक मजबूत स्वरुप प्राप्त झाले. राजा हा चर्चचा प्रमुख झाला व त्यांना बिशप यांना नियुक्त करण्याचे अधिकार दिले गेले. अशा प्रकारे राजांनी धार्मिक बाबींमध्ये सर्वोच्च अधिकार प्राप्त करुन घेतले. नॉर्मन राजवटीच्या काळात राजाची सर्वोच्चता न्यायालयाच्या, प्रशासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात वाढीला लागली.

राजाने निवडलेला न्यायाधिश हा राज्यभर जाऊन खटले ऐकू लागला व त्यावर निर्णय देऊ लागला. अशा प्रकारे अशा न्यायाधिशांनी दिलेले निर्णय हे कॉमन लॉ म्हणून उदयास आले. शेरिफ यांचे अधिकार वाढीला लागले. पर्यायाने राजाची इच्छा ही शेरिफ या संस्थेच्या माध्यमातून अंमलात येऊ लागली व त्यांच्याकडे कायदा व सुव्यवस्था राखणे, महसूल गोळा करणे इत्यादी कामे दिली गेली. अशा प्रकारे सॅक्सन राजवटीच्या काळानंतर नॉर्मन राजवटीच्या काळात राजघराणे मजबूत झाले.

प्राध्यापक मुनरो यांच्या मते राजघराण्याचे अधिकार नॉर्मन राजवटीच्या काळात व त्या पुढील राजांच्या काळात वाढीला लागून एक प्रकारे त्यातूनच इंग्लिश राजवटीचा उदय झाला. या राजवटींच्या काळात राजाला मदत करण्यासाठी मॅग्नम कौन्सिलम किंवा ग्रेट कौन्सिल, क्युरिया रेजिस किंवा किंग्ज कोर्ट अशा दोन संस्था उदयास आल्या.

मॅग्नम कौन्सिलममध्ये रॉयल ऑफिसर्स, चर्चचे अधिकारी व राजवटीतील इतर सन्माननीय व्यक्ती यांचा समावेश होता. या कौन्सिलमचा राजाही सर्वसाधारणपणे बायरन या संस्थेशी निगडीत होता. या संस्थेकडे धोरण ठरविणे, प्रशासन चालविणे व न्यायदानाचे सर्वोच्च न्यायालय म्हणूंन काम करणे अशी कर्तव्ये होती. तथापि, बायरन या संस्थेच्या तुलनेत ही संस्था काहीशी कमजोर होती. कारण नॉर्मन राजवटीमध्ये राजाला सॅक्सन राजवटीपेक्षा भरपूर अधिकार मिळालेले होते.

मॅग्नम कौन्सिलम जेव्हा कार्यरत नसेल तेव्हा क्युरिया रेजिस हे या संस्थेचा कारभार पाहत असे. क्युरिया रेजिसमध्ये चेंबर्लिन, चान्सलर, कॉन्स्टेबल, स्टुअर्ड व राजकारणातील इतर अधिकाऱ्यांचा समावेश होता. राजा प्रशासनासंबंधी बाबी या संस्थेला सोपवित असत आणि ही संस्था राजाला सल्ले देत असे. अशा प्रकारे मॅग्नम कौन्सिलम या संस्थेमधूनच इंग्लंडच्या आधुनिक संसदेचा उगम झाला व क्युरिया रेजिसचे रुपांतर पुढे प्रिव्ही कौन्सिलमध्ये आणि कॅबिनेट, एक्सचेकर व उच्च न्यायालयात झाले. या सर्वांचे श्रेय विल्यम्स राजाच्या धोरणाला जाते.

प्राध्यापक ॲडम यांच्या मते इंग्लिश घटनेच्या इतिहासाला नॉर्मन या राजवटीपासून सुरुवात होते. स्टीफन या राजाने विल्यम राजवटीच्या काळातील बऱ्याचशा राजकीय

संस्था मोडीत काढल्या होत्या. तथापि, हेन्री -II याच्या राजवटीमध्ये त्या परत स्थापित करण्यात आल्या. हेन्री-II या राजाने प्लांटागिनेट (Plantagenet) या राजघराण्याची स्थापना केली. हेन्री या राजाने क्युरिया रेजिस या संस्थेच्या प्रशासकीय व न्यायालयीन कार्यकक्षा ठरवून दिल्या. वस्तुत: ही दोन्ही कार्ये वेगवेगळया अधिकाऱ्यांमार्फत केली जाऊ लागली. त्यापैकी एक भाग रॉयल कौन्सिल तर दुसरा भाग न्यायालये म्हणून कार्यरत झाला.

हेन्री हा राजा मॅग्नम कौन्सिलम या संस्थेचे अधिवेशन वेळोवेळी बोलावू लागला आणि देशा पुढील सर्व समस्या येथे चर्चिल्या जाऊ लागल्या. कालौघात या संस्थेचे कार्य वाढून त्यांची सदस्यसंख्या सुध्दा वाढली. मात्र खऱ्या अर्थाने किंग जॉन या राजाच्या काळात ही संस्था वाढीला लागली. मात्र त्याच्या अनिर्बंध व हुकुमशाही प्रवृत्तीमुळे (high hand ness and despotic reign) लोकांनी त्याच्याविरुध्द उठाव केला व त्याला राजीनामा देण्यास भाग पाडले. लोकांच्या उठावामुळे त्याने दिनांक १५ जून, १२१५ रोजी इंग्लिश जनतेला जगप्रसिध्द मॅग्ना कार्टा म्हणजे स्वातंत्र्याचा जाहीरनामा सादर केला.

मॅग्ना कार्टामुळे इंग्लिश राजा हा नाममात्र राजा झाला व त्याच्या सर्व कृती या जनरल कौन्सिलच्या अधीन मानल्या जाऊ लागल्या. अशा प्रकारे मर्यादित राजेशाही ही मॅग्ना कार्टाची महत्त्वाची देणगी ब्रिटिश जनतेला होती. या चार्टरद्वारे राजाची सत्ता ही अनिर्बंध व अन्यायकारक नसल्याचे तत्व तसेच ग्रेट कौन्सिलच्या मान्यतेशिवाय त्याला काही कर लादता येणार नाही असे जाहीर करण्यात आले.

हेन्री-III याने १२५४ साली पार्लमेंटचे अधिवेशन बोलावले. सायमंड डीमॉटंफोर्ट हा बॅरनचा नेता राजाशी हातमिळवणी करुन हुकुमशहा बनला. त्यांनी १२६५ साली संसदेचे अधिवेशन भरविले. सदर अधिवेशनाला मोठया संख्येने बिशप्स, बॅरन्स, शायरचे नाईटस् व २१ बॅरनचे प्रत्येकी २ प्रतिनिधी उपस्थित होते. अशा प्रकारे स्थानिक प्रशासन, बॅरन, क्लर्जी, जेंटली यांचे सहकार्य प्रस्थापित करणारा तो पहिला नेता ठरला व त्या योगे हॉऊस ऑफ कॉमन्स या सभागृहाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

अशा प्रकारे छोटया गावातील प्रतिनिधी बोलावण्याची प्रथा हेन्री-III यांनी मोडीत काढली व त्यांनी मॉटफोर्ड याला सत्तेवरुन दूर केले. जरी, त्यानंतर संसदेचे अधिवेशन ३० वर्षांनंतर बोलावले गेले तरी त्यामध्ये बरोह यांना प्रतिनिधीत्व दिले गेले नव्हते. असे जरी असले तरी या पध्दतीनेच सन १२९५ मध्ये एडवर्ड-I या राजाने ते पुर्नप्रस्थापित केले. त्याने अधिवेशनासाठी समाजातील सर्व घटक म्हणजे बॅरन्स, क्लर्जी, नाईटस्, बुर्गीज यांना पाचारण केले आणि त्यांचे प्रस्तावित करांसाठी मतदान घेतले. ही परिषद ५७२ प्रतिनिधींनी बनलेली होती. त्यापैकी १७२ प्रतिनिधी शायर व बरोहचे प्रतिनिधीत्व करीत होते. ४०० प्रतिनिधी बिशप्स, क्लर्जीमेन, बॅरन्स व इतर सन्माननीय व्यक्तींचे प्रतिनिधीत्व करीत होते. अशा प्रकारे बऱ्याचशा घटकांना या परिषदेमध्ये प्रतिनिधीत्व दिले गेल्यामुळे या परिषदेला ब्रिटनची आदर्श पार्लमेंट म्हणून संबोधले जाते. या व्यवस्थेचे थोडक्यात स्वरुप असे होते की, ही संसद एकच सभागृह म्हणून बोलावली गेल्यामुळे करावर मतदान ३ भागांत झाले. राजाने सर्वसाधारणपणे क्लर्जी, बॅरन्स आणि नाईटस् आणि टाऊनशिप अशा ३ गटांना बोलावले होते. कालांतराने त्रिस्तरीय संसद, हाऊस ऑफ लॉर्डस् वरिष्ठ सभागृह म्हणून हाऊस ऑफ कॉमन्स कनिष्ठ सभागृह म्हणून या ब्रिटिश व्यवस्थेच्या माध्यमातून उदयास आली.

संसदेचे अधिकार प्लांटागिनेट (Plantagenet) राजवटीत उत्तरोत्तर वाढीला लागले. त्यामुळे किंग एडवर्ड-I या राजाला खालील बाबी मान्य करणे भाग पडले : -

(१) संसदेच्या मान्यतेशिवाय राजा जनतेवर कोणतेही कर बसवू शकणार नाही.

(२) लेखा परीक्षण करण्यासाठी संसद एक कमिशनर नियुक्त करेल.

(३) मंत्रिमंडळाची नियुक्ती संसद करेल.

(४) मंत्रिमंडळ हे संसदेला उत्तरदायी असेल व संसदेचे अधिवेशन बोलावण्यापूर्वी मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागेल.

अशा प्रकारे संसदेला राजाला पदच्युत करण्याचे अधिकार प्राप्त झाले व या अधिकारांचा वापर करुन संसदेने एडवर्ड-II या राजाला सन १३२७ मध्ये राजगादी सोडण्यास बाध्य केले.

टयुडर राजवटीच्या काळात ( सन १४८५ ते १६०३ ) राजकीय संस्थांचा मोठया प्रमाणात विकास झाला. टयुडर राजवटीच्या कालावधीत राजघराण्याची एका मजबूत पायावर स्थापना झाली. कॉमन लॉ चांगल्याप्रकारे प्रस्थापित झाला, हाय कोर्ट ऑफ जस्टिस परिणामकारकरित्या न्यायदानाचे कामकाज करु लागले. स्थानिक शासन पध्दती मजबूत पायावर उभी राहिली व महत्त्वाचे म्हणजे संसदेची दोन्ही सभागृहे एका विशिष्ट कालावधीनंतर भरु लागली. हाऊस ऑफ कॉमन्सला मोठया प्रमाणात वैधानिक अधिकार प्राप्त झाले. मात्र टयुडर राजाच्या (Monarch) हातात अधिकाधिक अधिकार एकवटले गेले. ते राजे कॉमन्सला धमक्या देत असत. त्यांची त्यांना भीती वाटत नसे. संसदेची एखादी बाब सदस्यांनी ऐकली नाही तर संसद त्यांना धमक्या देण्यासही मागेपुढे पाहत नसे. हेन्री-VIII या राजाने त्याचे न ऐकल्यास काही प्रसंगी सदस्यांना फाशी देण्याची धमकीही दिली होती.

या राजवटीत राणी एलिझाबेथने हाऊस ऑफ कॉमन्सच्या दोन सदस्यांना तिला मान्य नसलेला वैधानिक प्रस्ताव संसदेत मांडल्याबद्दल तुरुंगात पाठविले होते. अशा प्रकारे पार्लमेंट जरी अस्तित्वात असली तरी, राजाची हुकुमशाही व अन्यायकारक (despotic) राजवटीला ती प्रतिबंध करु शकत नव्हती. असे जरी असले तरी हाऊस ऑफ कॉमन्स या सभागृहाने डोळयात भरण्यासारखी प्रगती केली.

टयुडर राजवटीच्या शेवटच्या काळात हाऊस ऑफ कॉमन्सच्या वारंवार व अधिक कालावधीच्या बैठका बोलावल्या जाऊ लागल्या. इंग्लिश इतिहासकार श्री. ओक यांच्या मते या कार्यपध्दतीमुळे हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्यांना कॉमन लॉचा अभ्यास करुन तो विकसित करुन एकत्रित काम करण्याची सवय लागली. राणीनेसुध्दा पार्लमेंटशी सल्लामसलत करुन बऱ्याच प्रसंगी पार्लमेंटचा सल्ला स्वीकारला.

सन १६०३ पासून इंग्लंडमध्ये स्टयुअर्ड राजाच्या राजवटीला सुरुवात झाली. स्कॉटलँड या संस्थानाचा जेम्स-VI हा इंग्लंडचा राजा बनला व जेम्स-I म्हणून त्याचा राज्याभिषेक झाला. राजा हा ईश्वरी अंश असतो असा त्याचा विश्वास होता. त्यामुळे त्याचा संसदेशी संघर्ष होऊ लागला. या संघर्षाची परिणती चार्ल्स-I याच्या राजवटीमध्ये

सिव्हील वॉर होण्यात झाली व त्याला सन १६२८ मध्ये पिटीशन ऑफ राईट्सवर सही करावी लागली. संसदेने त्याच्यावर खटले चालवून, दोषी ठरवून शेवटी फाशी दिली.

चार्ल्स-I च्या वधानंतर इंग्लंडच्या प्रशासनामध्ये झपाट्याने बदल झाला. राजाची राजवट आणि हाऊस ऑफ लॉर्डस् बरखास्त करण्यात आले. सन १६४९ मध्ये इंग्लंडला कॉमनवेल्थ किंवा संसदेचे प्रजासत्ताक म्हणून जाहीर करण्यात आले. लिखित राज्यघटना नसली तरी Instrument of Government स्वीकारला गेला होता. त्या अंतर्गत क्रॉमवेल याचे लॉ प्रोटेक्टर म्हणून नामाभिधान करण्यात आले. तथापि, क्रॉमवेल याचे असे मत होते की, राजघराण्याशिवाय (Morarch) ब्रिटिश जनता राहू शकणार नाही. त्यामुळे राजेशाही पुन्हा प्रस्थापित करावी. त्यामुळे क्रॉमवेलच्या निधनानंतर राजेशाही पुन्हा प्रस्थापित झाली व चार्ल्स-III हा तिसरा स्टयुअर्ड राजा बनला.

चार्ल्स-II या राजाने पार्लमेंटचे सार्वभौमत्व काही प्रमाणात मान्य केले आणि त्याने राजांचे अधिकार व पार्लमेंटचे सार्वभौमत्व यामध्ये योग्य ती तडजोड केली. मात्र पुढे त्याचा उत्तराधिकारी जेम्स-II याने एककल्ली कारभार चालविला व लोकांवर अन्याय करण्यास सुरुवात केली. परिणामी पार्लमेंटच्या नेत्यांनी प्रिन्स ऑफ ऑरेंज विल्यम्स याला राजा म्हणून नेमले व त्याच्याकडे घटनात्मक स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी सोपविली. या सर्व गोष्टींची परिणती सन १६८८ च्या दैदिप्यमान क्रांती (Glorious Revolution) मध्ये झाली. जेम्स राजा फ्रान्समध्ये पळून गेला व अशा प्रकारे स्टयूअर्ड राजघराण्याची सत्ता संपुष्टात आली. मात्र स्टयुअर्ड या राजघराण्याचे घटनात्मक प्रगतीमधील योगदान वाखाणण्याजोगे होते. त्याने राजेशाही व पार्लमेंटचे सार्वभौमत्व यात योग्य ताळमेळ घातला आणि त्याच्या कारकिर्दीतच पार्लमेंटचे सार्वभौमत्व वाढीस लागले. तसेच प्रिव्ही कौन्सिलचे अधिकार व त्यांची सदस्य संख्या देखील वाढवण्यात आली. ती संस्था केवळ सल्लागार संस्था म्हणून न राहता या संस्थेकडे व्यापार नियमन, प्रशासनाचा आढावा, वित्तीय नियंत्रणाचे अधिकार इत्यादी महत्त्वपूर्ण कामे सोपविण्यात आली. मात्र या प्रिव्ही कौन्सिलच्या सदस्यांची संख्या बऱ्याच मोठया प्रमाणात असल्याने चार्ल्स-II या राजाने केबल (cabal) किंवा प्रिव्ही कौन्सिलच्या अंतर्गत गट

निर्माण केला. त्याचे प्रमुख काम राजाला महत्त्वपूर्ण बाबींमध्ये सल्ला देणे हे होते आणि यातूनच पुढे इंग्लंडमध्ये कॅबिनेट पध्दतीचा उगम झाला. त्या नंतरच्या हॅनोवर राजघराण्याच्या राजवटीच्या कालावधीत राजा आणि पार्लमेंट यांच्यामध्ये फार संघर्ष झाले नाहीत आणि संसदेने सन १६८९ मध्ये बिल ऑफ राईट हा कायदा केला. हा कायदा ब्रिटिश कार्यपध्दतीचे मूलभूत तत्त्व दर्शविणारा असून श्री. ॲडम यांच्या मते ब्रिटिनच्या इतिहासात त्याला लिखित घटनेचा दर्जा आहे. त्याद्वारे पार्लमेंटचे सार्वभौमत्व आणि पार्लमेंटच्या मंजुरी शिवाय राजाचे कर लावण्याचे अधिकार काढून टाकणे, पार्लमेंटचे नियमित अधिवेशन बोलावणे, वैयक्तिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करु नये अशा अत्यंत महत्त्वपूर्ण बाबी जाहीर करण्यात आल्या.

सन १६८९ च्या बिल ऑफ राईटमुळे खालील महत्त्वाचे बदल घडून आले : -

(१) राजघराण्यांचे अधिकार कमी झाले.
(२) कॅबिनेट पध्दतीचा विकास झाला.
(३) हाऊस ऑफ कॉमन्समध्ये लोकशाही मार्गाने येणाऱ्या सदस्यांची संख्या वाढली.
(४) हाऊस ऑफ कॉमन्सला हाऊस ऑफ लॉर्डस् पेक्षा वरचढ करण्यात आले आणि पक्ष पध्दतीचा उगम झाला.

जॉर्ज-I व जॉर्ज -II यांच्या काळात राजा त्यांच्या अधिकाराबाबत उदासीन राहिले. त्यांना इंग्लिश प्रथा-परंपरा माहीत नव्हत्या आणि सरतेशेवटी व्हिक्टोरिया राणीच्या काळात राजांनी नामधारी अधिकार वापरावेत अशी प्रथा विकसित झाली.

जॉर्ज-I या राजाने व्हॅलपोल यांनी कॅबिनेटचे अध्यक्ष पद भुषवावे असे घोषित केले व त्यांनी कॅबिनेटच्या माध्यमातून राजाला माहिती द्यावी असेही ठरविण्यात आले. या प्रक्रियेमधून ब्रिटनमध्ये पंतप्रधान या संस्थेचा उगम झाला.

अठराव्या शतकाच्या अखेरीस ब्रिटनमध्ये कॅबिनेट शासन पध्दती स्थापन झाल्यानंतर सन १८३२ मध्ये रिफॉर्म कायदा, सन १९१८ मध्ये प्रतिनिधित्वाचा कायदा व सन १९२८ च्या कायद्याप्रमाणे हाऊस ऑफ कॉमन्सला प्रातिनिधीक स्वरुप प्राप्त होऊन हाऊस ऑफ लॉर्डस् पेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले.

सन १९११ च्या कायद्याप्रमाणे हाऊस ऑफ लॉर्डस्चे अर्धे अधिकार कमी करण्यात आले. अशा प्रकारे कॉमन्स ही सर्वोच्च वैधानिक संस्था म्हणून उदयास आली. या घटनात्मक विकासाच्या पध्दतीमुळे ब्रिटनमध्ये पक्ष पध्दतीचा उगम झाला. स्टयूअर्ड राजवटीच्या काळात व्हिग्स व टोरी हे राजकीय पक्ष उदयास आले व ब्रिटनमध्ये द्विपक्ष पध्दती स्थापन झाली.

हॅनोवर राजाच्या काळात व्हॅलपोल हा इंग्लंडचा प्रथम पंतप्रधान बनला. सन १७१४ मध्ये आलेल्या जॉर्ज-I या राजाला इंग्रजी भाषा, प्रथा-परंपरा यांचे ज्ञान नव्हते व त्याचे वयही जास्त असल्याने तो कॅबिनेटच्या बैठकांना अनुपस्थित राहू लागला. त्यामुळे कॅबिनेटने त्यांचे नेतृत्व करण्यासाठी पंतप्रधानांची नियुक्ती करण्यास सुरुवात केली. पंतप्रधानांकडे शिस्त लावणे, धोरण ठरविणे इत्यादी जबाबदारी सोपविण्यात आली. अशा प्रकारे रॉबर्ट व्हॅलपोल हा इंग्लंडचा पहिला महान पंतप्रधान होऊन गेला. तो अत्यंत व्यवहारी होता. त्याने जबाबदार कॅबिनेट पध्दतीचा विकास केला. कॅबिनेट ही हाऊस ऑफ कॉमन्सला जबाबदार असल्याने त्याने कॅबिनेट मिटिंगचे अध्यक्ष पद भुषविणे, स्वत: प्रती इतर मंत्र्यांची जबाबदारी असावी या दृष्टिने प्रयत्न करणे आणि शेवटी कॅबिनेटची जबाबदारी हाऊस ऑफ कॉमन्सच्या माध्यमातून व्यक्त झालेल्या लोक भावनांशी असावी याकरिता प्रयत्न केले. अशा प्रकारे जॉर्ज-I या राजाच्या काळात कॅबिनेट पध्दतीचा उगम व राजा नामधारी होणे तसेच पंतप्रधानांकडे ब्रिटनचे नेतृत्व जाणे ही तत्त्वे उदयास आली.

पुढे पिट या अत्यंत धडाडीच्या व्यक्तिला पंतप्रधान म्हणून नेमण्यात आले. त्याच्या काळात कॅबिनेट पध्दती मजबूत झाली. त्याने राजघराण्याच्या अधिकाऱ्यांना कॅबिनेटमधून हाकलून दिले. जॉर्ज-III या राजाला त्याला मान्यता द्यावीच लागली.

अमेरिकन स्वातंत्र्याचा लढा आणि फ्रेंच राज्यक्रांती यामुळे राजघराण्यांचे सत्तेचे वलय संपुष्टात येऊन कॅबिनेट पध्दती बळकट झाली.

अठराव्या शतकाच्या अखेरीस कोणत्याही राजाने कॅबिनेटला आव्हान देण्याचा प्रयत्न केला नाही. एकोणिसाव्या शतकात कॅबिनेट पध्दती उत्तम प्रकारे काम करु लागली. या काळात ब्रिटनमध्ये रॉबर्ट पिल, पामरस्टोन व ग्लॅडस्टोन असे तीन महान पंतप्रधान होऊन गेले. त्यांची दूरदृष्टी वाखाणण्यासारखी होती.

त्यापैकी रॉबर्ट पिल यांना त्यांच्या नेतृत्व गुणामुळे इंग्लंडचे पहिले आधुनिक पंतप्रधान म्हणून ओळखले जाते. (सन १८४१-१८४६) त्यांच्या कारकिर्दीमध्ये पंतप्रधानांचा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा हे अत्यंत महत्त्वपूर्ण तत्त्व उदयास आले. शिवाय हाऊस ऑफ कॉमन्सला विसर्जित करण्याचा पंतप्रधानांचा अधिकार जे की आजच्या कॅबिनेट पध्दतीचे महत्त्वपूर्ण तत्त्व आहे ते सन १८४६ मध्ये उदयास आले.

तसेच ग्लॅडस्टोन यांच्या कारकिर्दीमध्ये कॅबिनेट व पंतप्रधानांचे स्थान अधिक बळकट झाले आणि परिणामस्वरुप राजा हा नामधारी राज्यकर्ता म्हणून, घटनात्मक प्रमुख म्हणून गणला जाऊ लागला. तसेच, त्यांच्या काळात कॅबिनेटचा मेंबर हा पार्लमेंटचा सदस्य असलाच पाहिजे असा नियम प्रस्थापित झाला आणि कॅबिनेटला पार्लमेंटचा पाठिंबा असला पाहिजे हेही तत्त्व प्रस्थापित झाले.

ग्लॅडस्टोनच्या काळात पार्लमेंटमध्ये बहुमत म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बहुमत हे महत्त्वपूर्ण तत्त्व उदयास आले. तसेच, मंत्रिमंडळाची सामुहिक जबाबदारी संसदेला राहील व पंतप्रधानांचा राजीनामा हा संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा असतो हे कॅबिनेट सिस्टम मधील मूलभूत तत्त्व विकसित झाले. कॅबिनेट या संस्थेने एक टिम म्हणून एकोप्याने काम करावे असे ठरले व पंतप्रधान हा नेता असेल हेही मान्य करण्यात आले. अशा प्रकारे कॅबिनेट ही एकसंघ संस्था म्हणून उदयास आली.

पुढे सन १९२३ मध्ये पंतप्रधान हे कनिष्ठ सभागृह म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्सचेच सदस्य असावेत अशी प्रथा विकसित झाली. लॉर्ड कर्झन हा हाऊस ऑफ लॉर्डस्‌चा मेंबर असल्याने त्यांना ब्रिटनचे पंतप्रधान पद नाकारण्यात आले.

सन १९३७ च्या क्राऊन कायद्याप्रमाणे पंतप्रधानांच्या पदाला कायदेशीर मान्यता मिळाली. ब्रिटिश पंतप्रधान हा खराखुरा कार्यकारी अधिकारी असतो हे तत्त्व पुढे आले व सर्व प्रशासनिक अधिकार त्याच्याकडे एकवटले गेले. अशा प्रकारे ब्रिटनमध्ये कॅबिनेट पध्दतीचा उगम झाला.

"ऑलिवर क्रॉमवेल" यांच्या नेतृत्वाखाली संसदीय कार्यपध्दतीसाठी राजाविरुध्द सातत्याने चाललेल्या ब्रिटीश जनतेच्या लढ्याची परिणीती संसदीय लोकशाही प्रस्थापित होण्यामध्ये झाली. यामध्ये प्रचंड मोर्चे, लोकांचा प्रतिरोध, राजाविरुध्द संघर्ष, राजाचा वध अशा विविध बाबींचा समावेश होता व अंतिमत: सन १६६० दरम्यान हाऊस ऑफ कॉमन्स हे लोकप्रतिनिधींचे सभागृह पुनर्स्थापित झाले. त्यावेळी मेंबर ऑफ पार्लमेंट ही सज्ञा दोन्ही

सभागृहांच्या सदस्यांकरिता वापरली जात होती. मात्र त्यानंतर ती केवळ हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्यांकरिता वापरली जाऊ लागली. या सभागृहांपैकी हाऊस ऑफ लॉर्डसचे सन १४६१ पासूनचे अभिलेख ज्ञात असून हाऊस ऑफ कॉमन्सचे प्रथमत: अभिलिखित कार्यवृत्तांत सन १५४७ पासूनचे आहेत.

**इंग्लंडच्या स्पीकरकडून विशेष हक्कांची मागणी**

इंग्लंडमधील काही विशेष हक्क संपूर्णपणे संसदेचे कायदे, प्रथा व परंपरा यांवर अवलंबून आहेत तर इतर काहींची परिनियमांद्वारा व्याख्या करण्यात आली आहे. पार्लमेंटच्या सुरुवातीस अध्यक्ष औपचारिकरित्या विशेष हक्कांची मागणी करतात. ती मागणी पुढील शब्दांत करण्यात येत असते. "कॉमन्सच्या नावाने व त्यांच्या वतीने पूर्वापार चालत आलेल्या संशयातीत हक्कांची व विशेषाधिकारांची, विशेष करुन अटक आणि सर्व प्रकारचा उपद्रव होणार नाही, चर्चेच्या वेळी भाषण स्वातंत्र्य राहील, जरुर पडेल तेव्हा राणी सरकारांना भेटता येईल आणि कॉमन्समधील सर्व कार्यवाहींचा राणी सरकारकडून सहानुभूतीपर अर्थ लावण्यात येईल, अशी मी नम्र प्रार्थना करतो." सभापतीच्या या विनंतीस लॉर्ड चॅन्सेलर उत्तर देतात व राजा अगर राणीतर्फे मान्यता कळवितात. सभापतीकडून अशा तऱ्हेने चार विशेषाधिकाराची मागणी करण्यात येते ते विशेषाधिकार म्हणजे,

(१) कोणत्याही सदस्यांस अटक किंवा स्थानबध्द करण्यात येऊ नये किंवा अन्य तऱ्हेने उपद्रव देण्यात येऊ नये.

(२) विधानमंडळाच्या सदनात प्रत्येक सदस्यास आपली मते निर्भीडपणे मांडण्याची मुभा असावी.

(३) विधानमंडळातील कार्यवाहीचा जास्तीत जास्त अनुकूल अर्थ लावण्यात यावा.

(४) कॉमन्सचा मनोदय राजास कळविण्यास परवानगी असली पाहिजे व त्यासाठी राजाकडे जाण्याची परवानगी असावी.

संसदीय विशेषाधिकारांचा विकास व इतिहास हेच दर्शवितो की, संसदीय विशेषाधिकार हे इंग्लंड मधील राजसत्तेविरुध्द तेथील सभागृहातील सदस्यांच्या (Commons) अधिकारासाठी असलेला सातत्यपूर्ण लढा व त्यातून ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्सचे निर्माण झालेले अधिकार व उन्मुक्ती व त्यासाठी चाललेल्या अविरत व सातत्यपूर्ण संघर्षाचे फलित आहे. विशेषाधिकार हा अनिर्बंध राजसत्तेच्या अधिकारांपासून लोकशाही व्यवस्थेला संरक्षण मिळविण्याचा संसदीय सभागृहातील सदस्यांचा अधिकार आहे. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर इंग्लंडमध्ये विशेषाधिकाराना मान्यता मिळाली.

सभागृहाचे विशेषाधिकार हे सभागृहाचे सदस्य, सभागृहे ह्यांनी एकत्रितपणे व वैयक्तिकरित्या धारण केलेले विशिष्ट असे अधिकार आहेत. विशेषाधिकारांशिवाय सन्माननीय सदस्य त्यांचे सभागृहांप्रती असलेले संसदीय कर्तव्य पार पाडूच शकत नाहीत. विशेषाधिकार हे जरी प्रस्थापित कायद्याचा भाग असले तरी एका विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रस्थापित सर्वसाधारण कायद्यांपासून त्यांना वगळलेले आहे. विशेषाधिकार हे सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे मुलभूत अधिकार असून त्यांना राजसत्तेच्या अनिर्बंध अधिकारांपासून संरक्षण देणारे, न्यायालयाच्या अधिकारीतेतून सभागृहात काम करण्यासाठी संरक्षण देणारे व त्यांची सभागृहाप्रती असलेली कर्तव्य पार पाडण्यासाठी अत्यावश्यक असलेले महत्वपूर्ण अधिकार आहेत.

सभागृहाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी विशेषाधिकार निर्माण झाले असून सभागृहाला त्याची कार्ये पार पाडणे केवळ सदस्यांच्या माध्यमातून शक्य होते व सदस्यांचे अविरत सहकार्य सभागृहाला प्राप्त व्हावे व ते सहकार्य देताना सदस्यांना संरक्षण मिळावे तसेच सभागृहाचे हक्क सुध्दा अबाधित व संरक्षित रहावेत हेच विशेषाधिकारांच्या प्राप्तीचे मूळ कारण आहे.

सभागृहाचा हा विशेषाधिकार आहे की त्याला त्याची कर्तव्ये कोणत्याही अडथळ्याशिवाय मुक्तपणे पार पाडता यावीत व सभागृहासमोरील विषय संसदीय कार्यपध्दतीने सार्वभौमपणे हाताळता यावा व याप्रमाणे संविधानिक तत्वांची सातत्यपूर्ण जपणूक करुन संविधानाचे संवर्धन करता यावे. सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा मुळ

विशेषाधिकार हा आहे की, त्यांना त्यांचे विचार मुक्तपणे मांडता आले पाहिजे. ज्याला अभिव्यक्ती स्वातंत्र म्हणून नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांना अटकेपासून संरक्षण मिळावे जेणेकरुन ते सभागृहाप्रती असलेले त्यांचे कर्तव्ये मुक्तपणे पार पाडू शकतील व या दोन्ही बाबी त्यांच्या सभागृहांच्या कर्तव्यांशी निगडित आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थात भाषण स्वातंत्र्याचा अधिकार हा सन १५४१ पासून राबविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे संसदीय सभागृहांना हायकोर्ट ऑफ पार्लमेंट असे सुध्दा संबोधले गेले आहे. जेणेकरुन या सभागृहाला त्याच्या अवमानाबद्दल शिक्षा करण्याचा त्याचप्रमाणे न्यायीक कार्यवाही करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. सभागृह हे त्याच्या विशेषाधिकारांचे संरक्षणकर्ते असून त्याच्या विशेषाधिकाराचे उल्लंघनाबाबतचे एकमेव निर्णयकार आहे. त्याचप्रमाणे सभागृहाच्या आदेशाचे, नियमांचे व कार्यपध्दतीचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत शिक्षा करण्याचा अधिकारसुध्दा सभागृहास प्राप्त झालेला आहे.

भारतीय संसद व विधानमंडळांचा विचार करता सभागृह ही संविधानामधून निर्माण झाली असून सभागृहाच्या शक्तींचा स्त्रोत संविधानामधून सभागृहाला प्राप्त झालेला आहे. त्यामुळे भारतामध्ये संसद अथवा विधीमंडळे ही सार्वभौम किंवा सर्वोच्च असल्याचा दावा करु शकत नाही. कारण लिखित संविधान हेच सार्वभौम व सर्वोच्च आहे व संविधानाच्या मर्यादेमध्ये राहूनच विधानमंडळांना किंबहूना शासनाच्या तीनही अंगाना (विधीमंडळे, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ) कार्य करावे लागते. याच संविधानामधून सभागृहांना विशेषाधिकाराची प्राप्ती संविधानाच्या अनुच्छेद १०५ व १९४ मधील तरतुदींच्या अधिनतेने झालेली आहे. त्याचप्रमाणे सभागृहाच्या आवारात कोणत्याही सदस्याला अटक करण्यास तसेच न्यायालयाची कोणतीही वैध आदेशिका (समन्स) बजावण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सभागृहाला बैठकीच्या वेळी कोणत्याही व्यक्तीस सभागृहात दाखल करुन घेण्यास, सभागृहातून निघून जाण्याचे सांगण्यास व सभागृहातून बाहेर काढण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. तसेच सभागृहाचे कार्यवृत्तावर सभागृहाचे नियंत्रण असून सभागृहाच्या अनुमतीशिवाय त्याची प्रसिध्दी करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

शिवाय संसदेला व विधीमंडळाला हक्कभंग व अवमान झाल्यास कोणत्याही व्यक्तीला अटक करुन तुरुंगात पाठविण्याचा हक्क आहे.

मात्र दावा केलेला विशेषाधिकार संविधानानुसार विधानमंडळाला प्राप्त झालेला आहे किंवा नाही याची तपासणी न्यायालये करु शकतात. संविधानाचा अर्थ लावण्याचे अधिकार हे न्यायालयांना प्राप्त झालेले आहेत. ( Power of Judicial review) त्याचप्रमाणे सभागृहांना सदस्यांचे सदस्यत्व रद्द करुन सदस्यांना काढून टाकण्याचे विशेषाधिकार सुध्दा सभागृहाला संविधानाच्या अनुच्छेद १०५ व १९४ नुसार प्राप्त झालेले आहेत.

विशेषाधिकार हा सभागृहांचा आत्मा असून विशेषाधिकारांशिवाय सभागृहे त्यांची मूलभूत कर्तव्ये पार पाडूच शकणार नाहीत व सदस्य सुध्दा विशेषाधिकारांशिवाय त्यांची संसदीय कर्तव्ये पार पाडू शकणार नाहीत म्हणून विशेषाधिकारांना, संसदीय लोकशाहीचा मूळ पाया व लोकशाहीचा गाभा म्हटल्यास निश्चितपणे अतिशयोक्ती होणार नाही.

विशेषाधिकार हे सदस्यांचे मौलिक घटनात्मक अधिकार असून विशेषाधिकारांचे संवर्धन व संरक्षण करणे हे सदस्यांचे व सभागृहाचे आद्य कर्तव्य आहे तरच विशेषाधिकारांचा प्रभाव संसदीय लोकशाहीमध्ये सदैव टिकून राहण्यास मदत होईल.

- **हॅक्सले प्रकरण -** सन १३९६-९७ मध्ये २० वा रिचर्ड दुसरा याच्या काळात एक प्रकरण उद्‌भवले ज्यामध्ये प्रथमत: विशेषाधिकाराचा भंग झाल्याचे निश्चित झाले आहे. यामध्ये हॅक्सले हा राजाचा क्लार्क म्हणून १३८२ पासून कार्यरत होता. त्याच्यावर राज घराण्याचा अवमान केल्याचा आरोप ठेवण्यात आला. या प्रकरणी राजपरिषदेकडे (किंग ईन कौन्सिलकडे ) निर्णय बदलण्याची विनंती संसदेद्वारे करण्यात आली. कारण प्रकरण संसदेपुढे प्रलंबित होते आणि त्यानुसार निर्णयाचा फेर विचार केला. हा निश्चितपणे सर्वोच्च न्यायीक अधिकार असलेल्या राजाद्वारे विशेषाधिकारांना मान्यता देण्याचा प्रारंभ होता.

**(1) Freedom of Speech :**

The rule of Freedom of Speech and debate in Parliament became established in Britain in the 17th century in the famous case of **Sir John Eliot.** Eliot was convicted by the Court of King's Bench for seditious speeches made in the House of Commons. The House of Lords reversed this decision on the ground inter alia that the words spoken in Parliament should only be judged therein. Finally, the Bill of Rights, 1688, laid down that the freedom of speech and debates or proceedings in Parliament ought not to be impeached or questioned in any court or place outside Parliament. A member may thus say whatever he thinks proper within the House and no action can be brought against him in any court for this.

**(2) PUBLICATIONS UNDER PARLIAMENTARY AUTHORITY**

In **Britain, in Stockdale v. Hansard** a book containing defamatory matter against the plaintiff published under the authority of the House of the Commons, was held to enjoy no privilege and damages were awarded to the plaintiff against the publisher. As a consequence thereof, the Parliamentary Papers Act, 1840, was passed which made the publication of any reports, papers, votes, or proceedings of a House of Parliament, ordered by the House, completely privileged whether the publication was only for the use of the Members of Parliament, or for a wider circulation.

**(3) Privileges of the Commons originally under the protection of the Lords**

Until they had fully established their position in Parliament, the Commons relied upon the Lords for the enforcement of their privileges. In **Thorpe's case,** the Lords, acting on the advice of the Judges, resolved that Thorpe, the Speaker of the House of Commons, should remain in prison notwithstanding any privilege of Parliament, and the Commons accepted the position and elected a new Speaker. It seems that the Commons did not claim a share even in the privilege jurisdiction of Parliament. It was not till Ferrers's case in 1543 that the Commons relied on their own authority to liberate one of their members. But by the time of Coke at the end of the century, the principle had been established that a matter concerning either House of Parliament ought to be decided in the House to which it relates and not elsewhere.

***(4) Haxey's Case.*** In the 20th Richard II (1396-97), a case occurred in which this ancient privilege was first violated, and afterwards signally confirmed. Haxey's, who had been a King's clerk since 1382, having displeased the King by offering a bill for reducing the excessive charge of the royal household, was condemned in Parliament as a traitor. But on the accession of Henry IV, Hexey exhibited a petition to the King in Parliament to reverse that judgment, as being 'against the law and custom

which had been before in Parliament'; and the judgment was reversed and annulled accordingly by the King, with the advice and assent of all the lords spiritual and temporal. This was unquestionably an acknowledgment of the privilege by the highest judicial authority-the King and the House of Lords; and in the same year the Commons took up the case of Haxey, and in a petition to the King affirmed 'that he had been condemned' against the law and course of Parliament, and in annihilation of the customs of the Commons'; and prayed that the judgment might be reversed, 'as well for the furtherance of justice as for the saving of the liberties of the Commons'. To this the King also assented, with the advice and assent of the lords spiritual and temporal; and thus the whole Legislature agreed that the judgment against Haxey, in derogation of the privileges of Parliament, 'should be annulled and held to be of no force or effect'.

***(5) Thomas Young's Case*, 1455.** Young had in 1451 proposed in the House of Commons that the Duke of York should be declared heir to the crown, and had been sent to the Tower by Henry VI. In 1455 he petitioned the Commons to secure compensation for himself in respect of his imprisonment. The King in reply ordered the Lords of the Council to provide a remedy.

Young’s petition, although it invoked ”the old liberte and fredom of the Comyns of this lande, had, enjoyed, and prescribed fro the tyme that no mynde is ... to speke and say in the House of their assemble, as to theym is thought convenient or reasonable without any maner challenge, charge or punycion’’ (g) was treated by the Commons as a private petition; and they appear to have made no complaint to the King about the violation of their collective privilege.

***(6) Strode's Case.*** In the 4th Henry VIII (1512), Strode, a member of the House of Commons, was prosecuted in the Stannary Court, for having proposed certain bills to regulate the tanners in Cornwall, and was fined and imprisoned in consequence. Upon which an Act was passed, which, after stating that Strode had agreed with others of the Commons in putting forth bills, ’the which here, in this High Court of Parliament, should and ought to be communed and treated of,’ declared the proceedings of the Stannary Court to be void, and further enacted that all suits and other proceedings against Richard Strode, and against every other member of the present Parliament or of any Parliament thereafter, ’for any bill, speaking, or declaring of any matter concerning the Parliament, to be communed and treated of, be utterly void and of none effect’. As the proceedings which had already taken place against Strode were declared to be void, it is evident that freedom of speech was then admitted to the Privilege of Parliament, and was not at that time first enacted; and that the statute was intended to have a general operation in future, and to protect all members, of either House, from any question on account of their Speeches or votes in Parliament.

In 1621 the Commons, in their protestation, affirmed 'that every Member hath freedom from all impeachment, imprisonment, or molestation, other than by censure of the House itself, for or concerning any bill, speaking, reasoning, or declaring of any matter or matters touching the Parliament or Parliament business'. In this protestation the Commons advanced their claims beyond the point established by Strode's case (1512). The Act of the 4th Henry VIII extended no further than to protect Members from being questioned, in other courts, for their proceedings in Parliament; but its principle should equally have saved them from the displeasure of the Crown. 'Molestation' comprised victimization or discriminatory action by the King or the executive, as in the cases of Mr. Strickland in 1571, of Mr. Cope, Mr. Wentworth and others in 1586, and of Sir Edwin Sandys in 1621. Dismissal from office was a means by which the King showed his displeasure 'without openly violating the Commons' claims of privilege, though in modern times any such action by the Crown (in respect of non-political office) might be regarded as an invasion of privilege. The last use of the exercise of the prerogative in this way was in the case of General Conway, who, in 1764, was dismissed from the King's service, not only as a groom of the bedchamber, but also as Colonel of a regiment, for opposing the ministry of George Grenville on the question of general warrants.

***(7) Bradlaugh's Case.*** One of the results of the confused dispute between Bradlaugh and the House of Commons, which was prolonged throughout the Parliament of 1880-85 was the unqualified recognition by the courts of their

incompetence to inquire into the internal proceedings of House of Parliament. Bradlaugh, at the beginning of the new parliament in May 1880, claimed to make affirmation under the Evidence Amendment Acts 1869 and 1870, instead of taking the oath. He was eventually permitted to make the affirmation ’subject to any liability by statute,’ and took his seat. Upon an action for penalties it was decided, finally by the House of Lords, that Bradlaugh had not qualified himself to sit by making the affirmation. On re-election, he attempted to take the oath, but was prevented by order of the House which eventually directed the Serjeant to exclude him from the House until he undertook to create no further disturbance. Bradlaugh then brought an action against the Serjeant in order to obtain a ’declaration that the order of the House was beyond the power and jurisdiction of the House and void, and secondly an order restraining the Serjeant at Arms from preventing Bradlaugh by force from entering the House’.

In this judgment Mr.Justice Stephen defined the relation between the jurisdiction of the courts and that of the House of Commons over the internal proceedings of the House as follows:-

"Suppose that the House of Commons forbids one of its members to do that which an Act of Parliament requires him to do, and, in order to enforce its prohibition, directs its executive officer to exclude him from the House by force if necessary, is such an order one which we can declare to be void and restrain the executive officer of the House from

carrying out ? In my opinion, we have no such power. I think that the House of Commons is not subject to the control of Her Majesty's Courts in its administration of that part of the statute-law which has relation to its own internal proceedings"

" It seems to follow that the House of Commons has the exclusive power of interpreting the statute, so far as the regulation of its own proceedings within its own walls is concerned; and that, even if that interpretation should be erroneous, this Court has no power to interfere with it directly or indirectly"

He assimilated the jurisdiction of the House over its own internal concerns to that of a court "whose jurisdiction is not subject to appeal"

The limits of the jurisdiction of the House in the particular case were defined as follows :-

"For the purpose of determining on a right to be exercised within the House itself, and in particular the right of sitting and voting, the House and the House alone could interpret the statute but as regarded rights to be exercised out of and independently of the House, such as the right of suing for a penalty for having sat and voted, the statute must be interpreted by this Court independently of the House."

On the other hand while recognizing that the rights of persons outside the House, i.e. Bradlaugh's constituents, were affected by the decision of the House, the learned judge denied the power of the courts to protect them so far as their rights were exercisable inside the House.

***(8) Bradlaugh V. Erskine Case.*** The Deputy Serjeant at Arms was held to be justified in committing the assault with which he was charged, since it was committed in Parliament, in pursuance of the order of the House, to exclude Bradlaugh from the House.

Just as Members in debating and voting the order would, as taking part in a proceeding in Parliament, not be amenable to the courts, so an officer in carrying out an order within the precincts of the House is taking part in a proceeding in Parliament, and is in the same position with regard to the courts as the Members who voted the order. As Lord Coleridge said, "The Houses cannot act by themselves as a body; they must act by officers"

On the other hand, it would be hard to show that a criminal act committed in the House by an individual Member was part of the proceedings of the House. As pointed out earlier, but for a few formal acts of a customary kind, a Member's contribution to the proceedings of the House is limited to speech and writing.

Apart from Eliot's case no charge against a Member of having committed a criminal act in Parliament has been heard by the ordinary courts. Owing to the lack of precedents there is no means of knowing what view the courts would take of a criminal act committed in Parliament, or whether they would distinguish action from speech in respect of amenability to the criminal law.

With regard to a crime committed in Parliament, the House in which it was committed might claim the right to decide whether to exercise its own jurisdiction or to hand the offender over to the criminal courts. In taking this decision, it would no doubt be guided by the nature of the offence, and the adequacy or inadequacy of the penalties, somewhat lacking in flexibility, which it could inflict.

**सदस्यांच्या वर्तनासंबंधी इंग्लंडमध्ये नेमलेली प्रवर समितीची माहिती.**

१९६० ते १९७० या दशकात श्री. जे. जी. एल. पौलसन यांचे नाव नामवंत शिल्पकार म्हणून गाजत होते. त्यांची किर्ती झपाट्याने युरोपमध्ये निरनिराळ्या देशात पसरली. त्याला बांधकामाचे अनेक कामे मिळत गेली. शिल्पकाराला आपल्या धंद्याची जाहिरात करता येत नाही. पण या नियमाला मुरड घालण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या कंपन्या काढल्या. सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना कंपन्यांचे डायरेक्टर तरी बनविले किंवा त्यांना कामे मिळवून देण्यासाठी त्यांच्याशी करार केले. लक्ष्मीचा वरदहस्त असल्यामुळे त्यांच्याकडे पैशाचा ओघ येत होता. थोड्याच काळानंतर लक्ष्मीने पाठ फिरविली हा कफल्लक झाला. निरनिराळ्या लोकांची कर्जे परत करता येईनात, म्हणून नादारी कोर्टात त्याने अर्ज दाखल केला.

नादारी कोर्टातील कामकाजाच्या वेळी अनेक खळबळजनक गोष्टी बाहेर येवू लागल्या. या वर्षाच्या काळात काही खासदारांनी आर्थिक लाभासाठी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन श्री. पौलसन यांचा फायदा करुन दिल्याची उदाहरणे साक्षीत उघडकीस आले. या कामकाजाच्या वृतान्तास वर्तमानपत्रात फार मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी मिळू लागली. प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी अनेकांकडून करण्यात येवू लागली. दिनांक १८ जुलै, १९७२ रोजी इंग्लंडचे पंतप्रधान श्री. एडवर्ड हीथ यांनी या प्रकरणाची

पोलिसांतर्फे कसून चौकशी करण्याची घोषणा केली. त्यावेळी गृहमंत्री म्हणून श्री. मौडलीग काम पाहत होते व मेट्रोपोलिटन पोलिस खाते त्यांच्या अखत्यारित होते. श्री. मौडलीग यांचे नाव या प्रकरणात गुंतले असल्यामुळे पंतप्रधानांच्या घोषणेनंतर त्यांनी राजीनामा दिला.

पोलिसांनी ंश्री.पौलसन यांच्या दहा वर्षातील आर्थिक व्यवहाराच्या प्रत्येक बाबीची चौकश्ी केली. पार्लमेंटच्या कामकाजाची प्रतिवृत्ते पाहून कोणकोणत्या सभासदांनी या प्रकरणात प्रश्न विचारण्यात अगर चर्चा घडवून आणण्यात पुढाकार घेतला याची नोंद घेण्यात आली. वर्तमानपत्रात जॉन बीन्स, लॉर्ड ग्लीनमोरा (पूर्वीचे एडवर्ड शार्ट), कार्डले, रेगीनाल मौडलीग (होम सेक्रेटरी) व आल्बर्ट रॉबर्टस या पाच सदस्यांची नावे प्रसिध्द होत होती.

दिनांक १ नोव्हेंबर, १९७६ रोजी या सदस्यांच्या वर्तनाची चौकशी करण्यासाठी १० सदस्यांची एक प्रवर समिती कॉमन्सच्या सभागृहाने नेमली. १९६४ ते १९७० या काळात श्री.कार्डले यांना श्री.पौलसन यांच्या एका कंपनीकडून पाच हजार पौंड कामाबद्दल मिळाले होते. श्री.मौडलीग हे पौलसन यांच्या एका कंपनीचे चेअरमन होते व त्याबद्दल वर्षाला १५०० पौंड देण्यात येत होते. श्रीमती मौडलीग ट्रस्टी असलेल्या एका संस्थेला श्री.पौलसन यांनी मोठी रक्कम दिली होती. श्री.अल्बर्ट रॉबर्टस यांना पौलसन कंपनीचे सल्लागार म्हणून दरमहा २०० पौंडाप्रमाणे चार वर्षे रक्कम देण्यात आली. या तीन सदस्यांनी ब्रिटिश सरकारने माल्टा बेटावर वेगवेगळ्या इमारती बांधण्यासाठी खर्चाची तरतूद करावी यासाठी कॉमन्सच्या सभागृहामध्ये प्रश्न विचारले होते व चर्चेत भाग घेतला होता. श्री. जॉर्ज बीन्स व लॉर्ड ग्लीनमोरा यांच्या विरुध्द कसलाही पुरावा मिळाला नाही म्हणून त्यांना दोषमुक्त करण्यात आले. राहिलेल्या तीन सदस्यांचे वर्तन सभागृहाच्या उच्च परंपरेला काळीमा आणणारे आहे असा समितीने निष्कर्ष काढला.

समितीने आपला अहवाल दिनांक १० जून १९७७ रोजी सभागृहास सादर केला व तो सभागृहाकडून दिनांक २६ जुलै, १९७७ रोजी संमत करण्यात आला. श्री. कार्डले यांचे

वर्तन सभागृहाचे हक्कभंग करणारे आहे असे सभागृहाने मत व्यक्त केले, परंतु श्री.कार्डले यांनी अगोदरच राजीनामा दिलेला असल्यामुळे त्यांच्याविरुध्द इतर कारवाई करता आली नाही. १९६०-७० या दशकात सभासदांनी आर्थिक लाभ मिळवण्यासाठी अयोग्य वर्तन केले. ते उघडकीस आले १९७२ साली व त्याच्यावर १९७६ साली कारवाई करण्यात आली.

- भाषण स्वातंत्र्याचा व चर्चा करण्याच्या स्वातंत्र्याचा अधिकार प्रथमत: सतराव्या शतकात ब्रिटनमध्ये प्रस्थापित झाला. सर जॉन इलिऑट यांना कोर्ट ऑफ किंग्स बेंचने, हाऊस ऑफ कॉमन्समध्ये त्यांनी केलेल्या भाषणासंबंधी अटक केली होती. दिनांक ८ जुलै, १६४१ रोजी हाऊस ऑफ कॉमन्सने, किंग्स बेंच मार्फत केलेली कार्यवाही रद्द केली व असे जाहीर केले की, सदर कार्यवाही संसदेच्या विशेषाधिकाराच्या विरुध्द आहे. त्यामुळे कोर्टाने सर जॉन इलिऑट, डेंझिल होलिस आणि बेंझामिन व्हॅलेंटाईन यांच्या विरुध्द दिलेला निकाल हा विशेषाधिकाराच्या विरुध्द असून हा निकाल बेकायदेशीर असल्याचे सांगितले. हॉऊस ऑफ लॉर्डसने सुध्दा दिनांक १५ एप्रिल, १६६८ रोजी हा निर्णय फेटाळून लावला व असे घोषित केले की, जे शब्द संसदेत उच्चारले जातील त्याचा निर्णय केवळ संसदच घेऊ शकतील. न्यायालयाला हा अधिकार असणार नाही. शेवटी बिल ऑफ राईट १६८८ या महत्वपूर्ण कायद्याने सदस्यांचा भाषण स्वातंत्र्याचा अधिकार मान्य करण्यात आला व यासाठी त्यांना कोणत्याही न्यायालयात बोलावले जाऊ शकत नाही, असे घोषित करण्यात आले.

- संसदेमध्ये/विधीमंडळांमध्ये मुक्तपणे, मोकळेपणे व कोणत्याही बाह्य शक्तीची भीती न बाळगता चर्चा करणे, मतदान करणे व त्यायोगे मत व्यक्त करणे हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे. संसद/विधीमंडळे ही मूलत: चर्चा करणारी व त्या माध्यमातून निर्णय घेणारी लोकशाहीतील महत्वपूर्ण संस्था आहे. त्यामुळे संसदेमध्ये भाषण स्वातंत्र असणे हे अत्यंत महत्वाचे आहे. भाषण स्वातंत्र्याच्या हक्कामुळे संसद व विधिमंडळ सदस्य

त्यांची मते मुक्तपणे व कोणत्याही बाह्य शक्तीच्या दडपणाविना व्यक्त करु शकतात. अन्यथा त्यांना त्यांच्या सभागृहातील भाषणासाठी शिक्षेची भीती वाटली असती. त्यामुळे भाषण स्वातंत्र्याचा विशेषाधिकार हा संसदीय लोकशाहीचा आत्मा म्हणता येईल.

- संसदेच्या अंतर्गत कामकाजावर फक्त संसदच नियंत्रण ठेऊ शकते. न्यायालयांना यात ढवळाढवळ करण्याचा कोणाताही अधिकार नाही. हा सुध्दा विशेषाधिकार ब्रिटीश संसदेमध्ये ब्रॅडलॉ विरुध्द गॉसेट या प्रकरणात प्रस्थापित झाला. ब्रिटनमध्ये कोणतीही न्यायालये सभागृहाच्या अंतर्गत कामकाजात हस्तक्षेप करीत नाही व सभागृहाच्या अंतर्गत कामकाजावर सभागृहाचा संपूर्ण अधिकार असतो. संसदेच्या सभागृहात जे काही बोलले गेले किंवा जे काही कृत्य केले याबाबत कोणत्याही न्यायालयात चौकशी केली जाऊ शकत नाही असा लॉर्ड कॉलरिज, मुख्य न्यायाधिश यांनी वरील प्रकरणात निकाल दिला.
- संसदेच्या अधिकाराने प्रसिध्द करण्यात आलेले कार्यवृत्त अथवा पुस्तक याबाबत संसदेचे नियंत्रण असते व असे कार्यवृत्त एखाद्याची बदनामी करणारे जरी असले तरी त्यासंदर्भात न्यायालयात कोणतीही कारवाई करता येत नाही. अशा प्रकारचा कायदा पार्लमेंटरी पेपर ॲक्ट १८४० हा ब्रिटीश संसदेने पारित केला. कारण स्टॉकडेल विरुध्द हॅन्सार्ड या प्रकरणात हा विशेषाधिकार न्यायालयाने मान्य केला नव्हता. मात्र व्हसन विरुध्द वॉल्टर १८६८ या प्रकरणात सभागृहाचे लिहिलेले कार्यवृत्त सदभावनेने (Good faith) प्रसिध्द केल्यास त्यासंदर्भात न्यायालयात कोणतीही कार्यवाही होऊ शकत नाही असा निर्णय देण्यात आला.

## २. ब्रिटीश संसदेचे विशेषाधिकार

## List of Parliamentary Privileges Exercised By The British House of Commons

Though the Privileges are not codified we are expected to look to precedents involving the British House of Commons. The most elaborate list of Parliamentary Privileges exercised by the British House of Commons has been compiled by Pritiosh Roy in his work Parliamentary Privilege in India which has been quoted in Raja Ram Pal's *c*ase and has been reproduced below :-

**(1) Privilege of freedom of speech, comprising the right of exclusive control by the House over its own proceedings. It is a composite privilege which includes:**

(i) The power to initiate and consider matters of legislation or discussion in such order as it pleases;

(ii) The privilege of freedom in debate proper- absolute immunity of members for statements made in debate, not actionable at law;

(iii) The power to discipline its own members;

(iv) The power to regulate its own procedure- the right of the House to be the sole judge of the lawfulness of its own proceedings;

(v) The right to exclude the jurisdiction of the Courts;

(vi) The right to exclude strangers;

(vii) The right to ensure privacy of debate;

(ix) The right to control or prohibit publication of its debates and proceedings;

**(2) Privilege of freedom from arrest or molestation, the claim of the Commons to freedom of members from arrest in civil action or suits during the time of the Parliament and during the period when a member journeys to or returns from the Parliament. This privilege includes:**

(i) Exemption of a member from attending Court as a witness- service of a civil or criminal process within the precincts of the House is a breach of privilege.

(ii) A member cannot be admitted as bail;

(iii) Exemption of a member from jury service

(iv) No such privilege claimed in respect of criminal offences or statutory detention;

(v) Right of the House to be informed of arrest of members on criminal charges;

(vi) Extension of the privilege to witnesses summoned to attend before the House or its committees, and to officers in immediate attendance upon the service of the House.

**(3) Privilege of freedom of access to the sovereign through the Speaker.**

**(4) Privilege of the House of receiving a favourable construction of the proceedings of the House from the sovereign.**

**(5) Power of the House to inflict punishment for contempt on members or strangers- a power akin to the powers possessed by the superior courts of justice to punish for contempt. It includes :**

(i) The power to commit a person to prison, to the custody of its own officers or to one of the State prisons, the keystone of Parliamentary privilege the commitment being for any period not beyond the date of the prorogation of the House;

(ii) The incompetence of the courts of justice to admit a person committed by the House to bail;

(iii) When the person is committed by the House upon a general or unspeaking warrant which does not state the particular facts constituting the contempt the incompetence of the courts of justice to inquire into the nature of contempt;

(iv) The power of the House to arrest an offender through its own officers or through the aid and power of the civil government;

(v) The power of the officers of the House to break open outer doors to effect the execution of the warrant of arrest;

(vi) The power of the House to administer reprimand or admonition to an offender;

(vii) The power of the House to secure the attendance, whether in custody or not, of persons whose conduct is impugned on a matter of privilege;

(viii) The power of the House to direct the Attorney General to prosecute an offender where the breach of privilege is also an offence at law and the extent of the power of the House to inflict punishment is not considered adequate to the offence;

(ix) The power of the House to punish a member by (a) suspension from the service of the House , or (b) expulsion, rendering his seat vacant.

**(6) Privilege of the House to provide for its own due constitution or composition. It includes:**

(i) The power of the House to order the issue of new writs to fill vacancies that arise in the Commons in the course of a Parliament;

(ii) The power of the House in respect of the trial of controverted elections of members of the Commons;

(iii) The power of the House to determine the qualifications of its members to sit and vote in the House in cases of doubt- it includes the power of expulsion of a member. A major portion of this ancient privilege of the House of Commons has been eroded by the statute.

(7) **The power of the House to compel the attendance of witnesses and the production of papers.**

However, we are only obliged to follow British precedents to the extent that they are compatible with our constitutional scheme. This is because the Legislatures in India do not have a wide power of self-composition in a manner akin to the British House of Commons.

(Ref:- (1) Raja Ram Pal *vs.* The Hon Speaker Lok Sabha & Others

(SCC (2007)3SCC184).

(2) Amrinder Singh *vs.* Spl.Committee,Punjab Vidhan Sabha

(2010) 2 SCC(Cri) 1343]

## ३. विशेषाधिकारांबाबत राज्यघटनेतील तरतुदी

### संसद व तिचे सदस्य यांचे अधिकार,विशेषाधिकार व उन्मुक्ती

### संसदेची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार, इत्यादी :-

१०५. (१) या संविधानाच्या तरतुदी आणि संसदेच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून; संसदेत भाषणस्वातंत्र्य असेल.

(२) संसदेचा कोणताही सदस्य, संसदेत किंवा तिच्या कोणत्याही समितीत त्याने केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही, आणि कोणतीही व्यक्ती संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकाराअन्वये किंवा त्याखाली कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतींत, संसदेचे प्रत्येक सभागृह आणि प्रत्येक सभागृहाचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती या, संसद, कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील, आणि त्याप्रमाणे निश्चित होईपर्यंत (त्या, सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना आणि समित्यांना "संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८" याचे कलम १५ अंमलात येण्याच्या लगतपूर्वी जशा होत्या तशा असतील.)

(४) खंड (१), (२) व (३) यांच्या तरतुदी जशा संसदेच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तशा त्या, या संविधानाच्या आधारे संसदेच्या कोणत्याही सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू असतील.

**१२१. संसदेतील चर्चेवर निर्बंध :-** सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत, यात यापुढे तरतुद केल्यानुसार, त्या न्यायाधीशास पदावरुन दूर करण्याची विनंती करणारे समावेदन राष्ट्रपतीस सादर करण्याचा प्रस्ताव आल्याशिवाय संसदेत कोणतीही चर्चा करता येणार नाही.

**१२२. न्यायालयांनी संसदेच्या कामकाजाबाबत चौकशी करावयाची नाही :-**

(१) कार्यपध्दतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे, या कारणावरुन संसदेतील कोणत्याही कामकाजाची विधीग्राह्यता प्रश्नास्पद करता येणार नाही.

(२) संसदेमधील कार्यपध्दतीचे किंवा कामकाज चालनाचे विनियमन करण्याचे अथवा संसदेत सुव्यवस्था राखण्याचे अधिकार या संविधानाद्वारे किंवा तदन्वये ज्याच्या ठायी निहित करण्यात आल्या आहेत अशा, संसदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने त्या अधिकारांच्या केलेल्या वापराबाबत तो कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणार नाही.

**राज्य विधानमंडळे व त्यांचे सदस्य यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती :-**

**१९४. विधानमंडळांची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार, इत्यादी:-**

(१) या संविधानाच्या तरतुदी आणि विधानमंडळाच्या कार्यपध्दतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून, प्रत्येक राज्याच्या विधानमंडळात भाषणस्वातंत्र्य असेल.

(२) राज्य विधानमंडळाचा कोणताही सदस्य, विधानमंडळात किंवा त्याच्या कोणत्याही समितीत त्याने केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही, आणि कोणतीही व्यक्ती अशा विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखाली प्रकाशित झालेला कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे कार्यवाहीस पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतींत, राज्य विधानमंडळाचे सभागृह आणि अशा विधानमंडळाच्या सभागृहाचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती या, ते विधानमंडळ कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील, आणि याप्रमाणे निश्चित होईपर्यंत, (त्या सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना आणि समित्यांना "संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८" याचे कलम २६ अंमलात येण्याच्या लगतपूर्वी जशा होत्या तशा असतील).

(४) खंड (१), (२) व (३) यांच्या तरतुदी जशा राज्य विधानमंडळाच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तशा त्या, या संविधानाच्या आधारे त्या विधानमंडळाच्या सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू असतील.

२११. **विधानमंडळातील चर्चेवर निर्बंध :-** सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत राज्याच्या विधानमंडळात कोणतीही चर्चा करता येणार नाही.

२१२. **न्यायालयांनी विधानमंडळाच्या कामकाजाबाबत चौकशी करावयाची नाही :-**

(१) कार्यपध्दतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे या कारणावरुन राज्य विधानमंडळातील कोणत्याही कामकाजाच्या विधिग्राह्यतेस आक्षेप घेता येणार नाही.

(२) राज्य विधानमंडळामधील कार्यपध्दतीचे किंवा कामकाजचालनाचे विनियमन करण्याचे अथवा विधानमंडळात सुव्यवस्था राखण्याचे अधिकार या संविधानाद्वारे किंवा तदन्वये ज्याच्या ठायी निहित करण्यात आले आहेत अशा, विधानमंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने त्या अधिकारांच्या केलेल्या वापराबाबत तो कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणार नाही.

**भारतीय संविधानातील विशेषाधिकाराबाबत तरतुदीतील मूळ आशय, म्हणजेच, ब्रिटिश संसदेला जे विशेषाधिकार आहेत तेच भारतीय संसदेला व राज्य विधानमंडळांना आहेत.** ह्या विशेषाधिकारांपैकी सर्वाधिक महत्वाचा विशेषाधिकार म्हणजे, संसदेतील भाषण स्वातंत्र्य.

**सभागृहात भाषण स्वातंत्र्याचा विशेषाधिकार (Freedom of Speech in the House)**

संसदीय कर्तव्य पार पाडतानाचा सर्वात महत्वाचा विशेषाधिकार म्हणजे भाषण स्वातंत्र्याचा आहे. अनुच्छेद १९ मध्येही नागरिकांना भाषण स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु, अनुच्छेद १०५ आणि १९४ मध्ये संसद व विधानमंडळांच्या सदस्यांच्या भाषण स्वातंत्र्यावर अधिक भर दिला आहे. अनुच्छेद १९ खाली दिलेल्या भाषण स्वातंत्र्यावर रास्त बंधने आहेत. जसे, लाइबल (Libel) कायदा, निंदाजनक वक्तव्याबद्दल सामान्य व्यक्तीविरुध्द कायदेशीर कार्यवाही तात्काळ सुरु करता येणे. परंतु सभागृहामध्ये किंवा तिच्या एखाद्या समितीमध्ये संसद सदस्याचे वक्तव्य, निंदा करणारे किंवा बदनामी करणारे आहे, या कारणावरुन त्याच्यावर कोणतीच कारवाई करता येत नाही. तो अशा कारवाईपासून उन्मुक्त असतो.

सन्माननीय सदस्यांच्या भाषण स्वातंत्र्याच्या अधिकाराबद्दल मा.सर्वोच्च न्यायालयाने पंडित एम.एस.एम.शर्मा याप्रकरणी असा निर्णय दिला की, संसदेचे/विधीमंडळाचे विशेषाधिकार (१०५/१९४) हे विशेष स्वरुपाचे असून नागरिकांना जे घटनेच्या अनुच्छेद १९(१) अन्वये प्राप्त झालेले मुलभूत अधिकार हे सर्वसाधारण आहेत. यात वाद निर्माण झाल्यास विशेषाधिकाराला प्राधान्य देणे आवश्यक आहे. (The Fundamental rights under Article १९(१) (a) has to yield to the privileges of Parliament and State Legislature under Article १९४(३)

भाषण स्वातंत्र्याच्या आधारे सदस्यांना सभागृहात लोकांची गाऱ्हाणी मांडावयाची असतात आणि सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधावयाचे असते. असे करताना त्यांच्यावर कोणतेच दडपण नसले पाहिजे. आपले विचार आणि आपली मते त्यांना

मोकळेपणाने मांडता आली पाहिजेत. सभागृहात किंवा संसदीय समित्यांमध्ये, सदस्याला हवे ते बोलण्याचे स्वातंत्र्य आहे. फक्त त्याने सभागृहातील वा संबंधित समितीतील अंतर्गत शिस्त पाळली पाहिजे. बाहेरच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला त्यात हस्तक्षेप करता येत नाही. कोणाचीही भीडमुर्वत न बाळगता किंवा कोणाच्याही रागलोभाची फिकीर न करता समित्यांमध्ये किंवा सभागृहात बोलता येण्यासाठी भाषण स्वातंत्र्य ही एक नितांत गरज असते. कायदेशीर कार्यवाहीपासून संपूर्ण उन्मुक्ती असल्याशिवाय, सदस्य निर्भीडपणे आणि मोकळेपणाने बोलेल अशी अपेक्षा करता येत नाही. म्हणून संसदेव्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात वा कोणत्याही प्राधिकरणासमोर संसद सदस्याविरुध्द संसदेच्या सभागृहात वा संसदेच्या समित्यांमध्ये त्याच्या कोणत्याही वक्तव्याबद्दल किंवा त्याने केलेल्या मतदानाबद्दल कोणतीही कारवाई करता येऊ नये अशी तरतूद संविधानात केलेली आहे. संसदेत किंवा संसदीय समितीत बोलल्याबद्दल सदस्याला धक्काबुक्की करणे किंवा त्याच्यावर कोणतीही कारवाई करणे वा कायदेशीर दावा करणे हा विशेषाधिकारभंगही आहे.

सुरुवातीला अधिनियमित करण्यात आलेल्या संविधानातील तरतुदींमध्ये अशी व्यवस्था होती की, संविधानाच्या सुरुवातीस ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन्स, त्यांचे सदस्य आणि समित्या यांचे जे विशेषाधिकार असतील तेच, आमची संसद कायद्याने अशा विशेषाधिकारांची पूर्णत: किंवा अंशत: व्याख्या करणार नाही तोपर्यंत चालू राहतील. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, संसदेने कधी कोणत्याही एखाद्या विशिष्ट विशेषाधिकाराची कायद्याने तरतूद केली, तर ब्रिटीशांची पूर्वोदाहरणे त्यां संबंधात आणि तेथवर आमच्या संसदेत लागू होणार नाहीत. परंतु १९७८ मध्ये खंड ३ मध्ये सुधारणा करून अशी तरतूद करण्यात आली की, संविधानातील विनिर्दिष्ट केलेल्या विशेषाधिकारांव्यतिरिक्त अन्य विशेषाधिकारांच्या बाबतीत, संसदेच्या प्रत्येक सभागृहाचे, त्यातील सदस्यांचे व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि उन्मुक्ती, ह्या संविधान - चव्वेचाळीसावे विशोधन अधिनियम, १९७८ (दिनांक २० जून १९७९ पासून अमलात) च्या

अगोदर सभागृह, सदस्य आणि समित्या यांच्या बाबतीत होत्या, त्याच असतील. खरे तर ह्या सुधारणेने केवळ, ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्स संबंधातील शब्द गाळून, फक्त शाब्दिक बदल केला. मूळ बाब तशीच राहिली. वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, संविधानात उल्लेखिलेले अधिकार, विशेषाधिकार यांव्यतिरिक्त, प्रत्येक सभागृहाला, त्यातील सदस्यांना आणि समित्यांना व्यवहारत: ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सला दिनांक २६ जानेवारी, १९५० ला जे अधिकार व विशेषाधिकार होते, तेच आहेत.

## ४. विशेषाधिकार

संसदीय विशेषाधिकारांची यादी करता येते, परंतु अशी कोणतीही यादी ही केव्हाच परिपूर्ण असणार नाही. सभागृहे, सदस्य आणि समित्या यांचे महत्वाचे विशेषाधिकार पुढील प्रमाणे आहेत.

- **भाषणस्वातंत्र्य व सभागृहाची कार्यवाही याबाबतचे विशेषाधिकार**
  **(भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १०५ (२) व १९४ (२) मधील तरतुदींनुसार)**

१. संसदेत भाषण स्वातंत्र्य असेल. (संविधानाचा अनुच्छेद १०५ (१) व १९४) ;

२. संसदेत किंवा तिच्या एखाद्या समितीत एखाद्या सदस्याने केलेले वक्तव्य वा केलेले मतदान याबद्दल कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीपासून उन्मुक्ती. (संविधानाचा अनुच्छेद १०५ (२) व १९४);

३. संसदेच्या अधिकारात प्रकाशित करण्यात आलेला, अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांबद्दल कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीपासून त्या व्यक्तीला उन्मुक्ती (संविधानाचा अनुच्छेद १०५(२) व १९४);

४. संसदेतील कामकाजाबाबत न्यायालयाने चौकशी करण्यास प्रतिबंध (संविधानाचा अनुच्छेद १२२ व २१२);

- **इतर विशेषाधिकार**
  **(भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १०५ (३) व १९४ (३) मधील तरतुदींनुसार)**

५. संसदेचे सत्र सुरु असताना किंवा सुरू होण्याच्या अगोदर ४० दिवस व संपल्यानंतर ४० दिवसांपर्यंत कोणत्याही दिवाणी प्रकरणी सदस्याला अटक न करता येणे (दिवाणी प्रक्रिया संहिता खंड १३५ अ)

६. सदस्यांना ज्युरी सदस्य म्हणून न राहण्याची मोकळीक;

७. सदस्याची अटक, स्थानबध्दता, अपराधसिध्दी, कारावास वा कारावासातून सुटका याबद्दल सभागृहाला तत्काळ माहिती मिळण्याचा हक्क.

८. अध्यक्षांच्या परवानगीशिवाय सभागृहाच्या परिसरात अटक करण्यावर किंवा वैध आदेशिका बजावण्यावर प्रतिबंध.

९. सभागृहाच्या गुप्त बैठकीतील निर्णय वा कार्यवाही उघड करण्यावर प्रतिबंध.

१०. सभागृहाच्या परवानगीशिवाय सभागृहातील सदस्य वा अधिकारी यांनी सभागृहातील कार्यवाहीसंबंधात न्यायालयात साक्ष न देणे किंवा त्यासंबंधीचे कागदपत्र न्यायालयात दाखल न करणे.

११. दुसऱ्या सभागृहासमोर वा त्याच्या समितीसमोर, किंवा राज्य विधानमंडळाच्या सभागृहासमोर वा त्याच्या समितीसमोर, सभागृहातील सदस्याने वा अधिकाऱ्याने त्या त्या अध्यक्षांच्या परवानगीशिवाय साक्षीदार म्हणून हजर राहू नये, आणि त्यांना त्यांच्या इच्छेविरुध्द हजर राहण्यास भाग पाडण्यात येऊ नये.

१२. समितीने करावयाच्या चौकशीसाठी, सर्वच समित्यांना संबंधित व्यक्तीला बोलावण्याचे वा संबंधित कागदपत्र वा अभिलेख मागवण्याचे अधिकार दिलेले आहेत. संसदीय समिती साक्षीदाराला हजर राहण्यास आदेशित करु शकते आणि समितीला उपयोगी पडतील असे दस्तावेज सादर करावयास भाग पाडू शकते.

१३. तिच्यासमोर तपासणी करण्यात येत असलेल्या साक्षीदाराला शपथ देऊ शकते किंवा प्रतिज्ञा करावयास सांगू शकते.

१४. सभागृहाच्या पटलावर ठेवण्याअगोदर, संसदीय समितीसमोर दिलेला कोणताही साक्षीपुरावा आणि समितीचा अहवाल वा कार्यवाही, कोणालाही उघड करता येत नाही वा प्रकाशित करता येत नाही.

वर उध्दृत केलेले विशेषाधिकार आणि उन्मुक्ती यांच्याशिवाय प्रत्येक सभागृहाला आपले विशेषाधिकार आणि उन्मुक्ती यांचे संरक्षण करण्याचे आवश्यक असे आनुषंगिक अधिकार आहेत ते असे.

१. व्यक्ती संसद सदस्य असो वा नसो, तिने जर विशेषाधिकाराचा भंग केला असेल किंवा सभागृहाचा अवमान केला असेल तर तिला अटक करणे;

२. साक्षीदारांना हजर राहावयास सांगणे, आणि कागदपत्रे व अभिलेख मागवणे ;

३. आपली कार्यपध्दती आणि कामकाज चालन यांचे विनियमन करणे. (संविधानाचा अनुच्छेद ११८ व २०८)

४. आपले वादविवाद आणि कार्यवृत्ते यांचे प्रसिध्दीकरण रोखणे;

५. बाहेरील व्यक्तींना सभागृहात येण्याची बंदी करणे.

**सदस्यांना अटकेपासून संरक्षण**

**सदस्यांना सभागृहाची/समितीची बैठक सुरू असतांना अटक करता येत नाही :**

दिवाणी प्रकरणांमध्ये सत्र चालू असताना किंवा ज्या सभागृहाचा अथवा ज्या समितीचा जो सदस्य असेल त्या सभागृहाची वा समितीची बैठक चालू असताना त्या सदस्याला अटक तर करता येत नाहीच, परंतु संसदेच्या अधिवेशनाच्या ४० दिवसांपूर्वी किंवा नंतरही, किंवा तो सभागृहात जाताना वा तेथून येतानाही त्याला अटक करता येत नाही. नव्या दिल्लीबाहेरील एखाद्या ठिकाणाहून तो संसदेच्या वा तिच्या समितीच्या कामकाजासाठी येत असताना त्याच्याशी दंगामस्ती करण्यात आली किंवा त्याला कोणताही प्रतिबंध करण्यात आला तर तोही विशेषाधिकाराचा भंग होतो.

ह्या विशेषाधिकाराचा हेतू हा आहे की, संसद सदस्याला संसदेत सुरक्षितपणे येता यावे व कामकाजासाठी उपस्थित राहता यावे. फक्त दिवाणी प्रकरणांमध्येच संसद सदस्याला अटकेपासून उन्मुक्ती आहे. फौजदारी प्रकरणात किंवा प्रतिबंधक स्थानबध्दता कायद्याखाली ती लागू नाही. तशा प्रकारची अटक झाल्याबरोबर तशा अटकेची, स्थानबध्दतेची, दोषसिध्दीची आणि कारावासात टाकल्याची वा तेथून मुक्त केल्याची माहिती सभागृहाला त्वरीत द्यायलाच हवी. सभागृहाचा तो हक्कच आहे. संबंधित प्राधिकाऱ्याने लोकसभेच्या सदस्याची अटक, स्थानबध्दता, कारावास इ. घटना अध्यक्षांना त्वरीत कळवल्याच पाहिजेत. तसे त्यांनी न केल्यास सभागृहाचा हक्कभंग होतो. ही माहिती होईल तितक्या लवकर कळवावयास हवी. अशा प्रकरणी सदस्य देशाच्या कोणत्याही भागात असो, त्याच्यासंबंधीच्या उपरोक्त बाबी तारेने आणि नंतर पत्राने कळवावयास हव्यात.

**सभागृहाच्या आवारात कोणतीही दिवाणी वा फौजदारी आदेशिका (समन्स) सदस्यावर बजावता येणार नाही..**

अध्यक्ष वा सभापती यांच्या परवानगीशिवाय कोणतीही दिवाणी वा फौजदारी आदेशिका (समन्स) संसदेच्या किंवा विधानमंडळाच्या आवारात सदस्यावर बजावता येत नाही आणि सदस्याला संसदेच्या/विधानमंडळाच्या आवारात अटक करता येत नाही, हा नियम लागू आहे. ही उन्मुक्ती संसदेच्या/विधानमंडळाच्या परिसीमेत खाजगी व्यक्तीलाही लागू आहे. संसदेच्या/विधानमंडळाच्या परिसरात, फक्त संसदेच्या सभागृहांचेच किंवा अध्यक्ष/सभापतींचेच आदेश लागू असावेत, विधानमंडळाच्या अन्य शासकीय प्राधिकाऱ्यांचे वा स्थानिक प्रशासनाचे आदेश लागू असू नयेत, यासाठी हा नियम आहे. संसदेच्या आवारात १४४ कलमदेखील जारी करता येत नाही. प्राधिकाऱ्यांनी तसे करण्याचा प्रयत्न केला तर तो विशेषाधिकाराचा भंग आणि सभागृहाचा अवमान ठरतो. संसद परिसरात कलम १४४ च्या सदृश असलेले अध्यक्षांचे आदेश जारी करता येणे, ही एक वेगळी गोष्ट आहे.

फौजदारी प्रकरणांमध्ये, ज्युरी म्हणून काम न करण्याची मोकळीक सदस्यांना असते. ज्या ठिकाणी ज्युरीची पध्दत असेल तेथे ज्युरर म्हणून बोलावल्यास जाणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असले तरी, संसद सदस्य आणि विधानमंडळ सदस्य यांना हा नियम लागू होत नाही.

**न्यायालयासमोर सभागृहाची कागदपत्रे सादर करणेबाबत..**

विधानमंडळ सचिवालयाचा अधिकारी वा अन्य व्यक्ती यांना सभागृहाच्या परवानगीशिवाय, सभागृहातील कार्यवाहीसंबंधातील कागदपत्रे सादर करण्यास किंवा, त्या संबंधात साक्ष देण्यास भाग पाडता येणार नाही. त्याचप्रमाणे तो ज्या सभागृहाशी संबंधित असेल, त्याव्यतिरिक्त अन्य सभागृहापुढे साक्षीदार म्हणून त्याने यावे यासाठी त्याच्यावर जबरदस्ती करता येणार नाही.

**व्यक्तींनी सभागृहासमोर/समितीसमोर साक्षीसाठी उपस्थित राहणेबाबत..**

व्यक्तींना आपल्यासमोर हजर राहण्यास सांगण्याचे किंवा कागदपत्रे वा अभिलेख सादर करण्यास सांगण्याचे अधिकार सर्वच संसदीय समित्यांना असतात. साक्षीदारांची पुढे नमूद करण्यात येणारी वर्तणूक ही विशेषाधिकारांचा भंग करणारी आणि समितीचा अवमान करणारी समजली जाते.

१. प्रश्नाची उत्तरे देण्यास नकार.

२. जाणीवपूर्वक खोटी साक्ष देणे, सत्य लपवणे किंवा समितीची दिशाभूल करणे.

३. समितीसमोर थिल्लरपणे वागणे आणि अवमानकारक उत्तरे देणे.

४. समिती करीत असलेल्या चौकशीसंबंधीची कागदपत्रे नष्ट करणे किंवा महत्वाची कागदपत्रे खराब करणे.

ससंदीय समितीचा संसदेइतकाच मान राखला पाहिजे. म्हणून जर कोणी संसदीय समितीच्या निर्णयावर टीकाटिप्पणी केली किंवा समितीच्या कार्यवाहीबद्दल अनुद्‌गार काढले तर तो हक्कभंग होतो व सभागृहाचा अवमान ठरतो.

याशिवाय विशेषाधिकार कायद्याचा भाग म्हणून अभिरक्षेतील सदस्याला अध्यक्षांशी किंवा संसदीय समितीच्या अध्यक्षांबरोबर कोणत्याही आडकाठीशिवाय संपर्क साधण्याचा व विचारविमर्शाचा अधिकार असतो. स्थानबध्द सदस्याने असे एखादे पत्र लिहिले असेल तर ते प्रशासनिक प्राधिकाऱ्यांना रोखून धरता येत नाही.

जेव्हा एखादी बाब संसदीय/विधानमंडळ समितीच्या विचाराधीन असेल आणि त्या संबंधात समिती दररोज आपल्या बैठकी घेत असेल तेव्हा, संसद सदस्यांसह/विधानमंडळ सदस्यांसह कोणतीही व्यक्ती त्या बाबतीत निवेदन करु शकत नाही वा ते प्रसिध्दीसही देऊ शकत नाही. संसदीय समितीचा ज्या प्रश्नावर विचार चालू असेल त्या प्रश्नावर जाहीर टीकाटिप्पणी करणे ही अत्यंत अयोग्य गोष्ट आहे, आणि तसे करण्याने सभागृहाचा अवमानही होऊ शकतो. समितीपुढे सादर केलेली कागदपत्रे वा लेख किंवा समितीच्या कार्याची वृत्ते प्रसिध्द करण्यानेही सभागृहाचा हक्कभंग होऊ शकतो.

**सभागृह, समित्या व सदस्य यांचा विशेषाधिकार भंग**

सभागृह किंवा त्यांच्या समित्या यांच्यावरील कोणत्याही प्रकारचा हल्ला, किंवा त्यांच्या विशेषाधिकारावर, हक्कांवर वा उन्मुक्तींवर आघात किंवा व्यक्तिश: सदस्यांवरील किंवा समिती सदस्यांवरील अशा प्रकारचे आघात यांमुळेही हक्कभंग होतो. सभागृह या गुन्ह्याबद्दल शिक्षाही करू शकते. यातील मूलभूत तत्व हेच आहे की, सभागृह, त्याच्या समित्या वा त्यातील सदस्य यांना आपली कर्तव्ये दक्षतेने आणि परिणामकारकतेने पार पाडण्याच्या आड किंवा आपले काम निर्भयपणे वा नि:पक्षपणे करण्याच्या आड ज्या कोणत्याही गोष्टी येत असतील, त्या संसदीय विशेषाधिकारांचा भंग करणाऱ्या ठरतात. एखाद्या सदस्याला, तो सभागृहाच्या बैठकीस जात असताना अडवण्यात आले तर तो विशेषाधिकारभंग होतो. संसद सदस्याला लाच देण्याचा प्रयत्न हाही विशेषाधिकाराचा भंग होतो. जाणीवपूर्वक सभागृहाची दिशाभूल करणे आणि माहिती खोटी आहे याची कल्पना असूनही, ती सभागृहाला पुरवणे हाही एक गंभीर गुन्हा आहे. विशिष्ट विशेषाधिकार भंगाशिवाय, सभागृहाचे प्राधिकार व प्रतिष्ठा यांविरुध्दचे, म्हणजे जसे त्यांचे आदेश न पाळणे, किंवा सभागृहांची, त्यांतील सदस्यांची, वा अधिकाऱ्यांची बदनामी करणे या सर्वांबद्दलही, सभागृहांच्या अवमानाबद्दल होते तशी शिक्षा होऊ शकते.

**सभागृहाचा अवमान :**

''सभागृहाचा अवमान'' याची सर्वसाधारण व्याख्या अशी करता येईल. संसदेची दोन्ही सभागृहे, त्यांचे सदस्य, वा त्यांच्या समित्या व त्यांचे अधिकारी यांना आपली कार्ये आणि कर्तव्ये परिणामकारकपणे आणि दक्षतेने पार पाडण्यात प्रतिबंध करण्याची वा अडथळा आणण्याची कोणतीही कृती वा अकृती किंवा सभागृह, त्याचे सदस्य वा समित्या यांची प्रतिष्ठा व सन्मान यांना क्षती पोचणारी कृती वा अकृती सभागृहाचा अवमान म्हटली जाते. विशेषाधिकारभंग आणि सभागृहाचा अवमान यांतील फरक फार सूक्ष्म आहे. सर्वसाधारणपणे, विशेषाधिकाराचा भंग हा सभागृहाचा अवमान ठरू शकतो. त्याचप्रमाणे सभागृहाच्या अवमानात विशेषाधिकाराचा भंग असतोच. तरीही,''सभागृहाचा अवमान'' या संकल्पनेची व्याप्ती मोठी आहे. क्वचित, कोणत्याही विशेषाधिकाराचा भंग न करताही

सभागृहाचा अवमान केला जाऊ शकतो. खरे पाहता अवमान ह्या शब्दाची नेमकी व्याख्या करता येत नाही वा त्या शब्दातील संकल्पनेच्या सीमा निश्चितपणे ठरविता येत नाहीत. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत केलेली एखादी कृती ही अवमाननिदर्शक नसेल वा अन्य परिस्थितीत ती तशी असेलही. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, अवमान झाला किंवा नाही याचा निर्णय देण्याचे काम संसदेच्या संबंधित सभागृहाकडेच सोपवणे इष्ट ठरते.

सर्वसाधारणपणे, संसदेच्या सभागृहांच्या किंवा तिच्या समित्यांच्या सर्वोच्चपणावर, प्राधिकारांवर किंवा प्रतिष्ठेवर करण्यात आलेल्या आघातांचा अंतर्भाव, ''अवमान'' या शब्दात होतो. सभागृहाचा अवमान झाल्याचे समजण्यात येते, अशा काही कृती पुढे दिल्या आहेत :

१. सभागृहे, त्यांच्या समित्या वा सदस्य यांची बदनामी होईल किंवा लोकांमधील त्यांचा आदर कमी होईल अशा प्रकारचे लिखाण वा भाषणे.
२. अध्यक्ष/सभापती त्यांची कर्तव्ये पार पाडत असताना, त्यांचे चारित्र्य वा त्यांचा नि:पक्षपणा याबाबत शंका घेणे.
३. संसदीय समितीचा अहवाल हा पक्षपात करणारा आहे असा आरोप करणे.
४. कार्यवाहीचे खोटेच वा विकृत अहवाल प्रसिध्द करणे.
५. सभागृहाच्या गुप्त बैठकीचे कार्यवृत्त वा अध्यक्षांनी कार्यवृत्तातून वगळण्यास सांगितलेले भाग प्रकाशित करणे.
६. सभागृहातील वर्तणुकीबद्दल सदस्यांवर हात टाकणे, किंवा सदस्य म्हणून ते आपले कर्तव्य पार पडीत असताना, किंवा सभागृहाच्या वा समितीच्या बैठकीस जात असताना, त्यांची वाट अडवणे.
७. संसदीय वर्तनावर प्रभाव पडेल अशा हेतूने सदस्यांना लाचलुचपत देऊ करणे.
८. संसदीय कार्यसंबंधात धाकदपटशा दाखवून त्यांना घाबरवणे.
९. सदस्याने किंवा साक्षीदाराने सभागृहाला वा त्या सभागृहाच्या समितीला जाणूनबुजून खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती वा पुरावा देणे.
१०. सभागृहापुढे किंवा त्यातील समितीपुढे येणाऱ्या साक्षीदाराला प्रतिबंध करणे वा त्याच्यावर हात टाकणे.

**विशेषाधिकार भंग, अवमान इ.बद्दल शिक्षा :**

संसदेचे प्रत्येक सभागृह आपला विशेषाधिकार सांभाळत असते. सभागृहाचा अवमान करणाऱ्या वा सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग करणाऱ्या व्यक्तीला खडसावण्याची वा दटावण्याची किंवा विशिष्ट कालावधीकरता कारावासाची शिक्षा, सभागृह देऊ शकते. स्वत:च्या सदस्यांकरिता आणखी दोन शिक्षा उपलब्ध असतात. त्या म्हणजे सभागृहाच्या सेवेतून निलंबित करणे किंवा सभागृहातून निष्कासित करणे. सदस्याला विशिष्ट कालावधीकरीता किंवा उर्वरित सत्रकालावधीकरिता सभागृहाच्या सेवेतून निलंबित करता येते किंवा अत्यंत विपरित परिस्थितीत त्याला सभागृहातून निष्कासित करता येते.

सभागृहाची शिक्षा देण्याची अधिकारिता ही त्या सभागृहातील सदस्यांपुरतीच किंवा सभागृहासमोर केलेल्या गुन्ह्यापुरतीच मर्यादित नसते, तर सभागृहाचे सर्वच अवमान या अधिकारितेच्या कक्षेत येतात, मग ते अवमान सदस्यांनी केलेले असोत वा इतरांनी केलेले असोत. असे अपराध सभागृहात केलेले असोत वा सभागृहाच्या परिसराबाहेर केलेले असोत, त्यामुळे काही विशेष फरक पडत नाही. आपल्या अवमानाबद्दल वा विशेषाधिकार भंगाबद्दल एखाद्या व्यक्तीला शिक्षा देण्याचा सभागृहाचा अधिकार, हा संसदीय विशेषाधिकारांची ''आधारशिला'' म्हटली पाहिजे. संसदेच्या विशेषाधिकारांना या अधिकारांमुळे खरा अर्थ प्राप्त होतो आणि संसदेचा सार्वभौम अधिकार सिध्द होतो. त्यामुळे संसदेची प्रतिष्ठा आणि तिचे सर्व अधिकार सुरक्षित राहतात.

सभागृहाचा अवमान वा विशेषाधिकारांचा भंग याविरुद्ध सभागृहाने वापरावयाचे दंडात्मक अधिकार यांचा वापर हा क्वचितच अत्यंत कसोटीच्या वेळी करावयाचा असतो. म्हणजे जेथे लोकांचा संसदेवरील विश्वास जाणीवपूर्वक नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो, संसदेला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो अशाच वेळी, हे अस्त्र वापरावयाचे असते. अशा अपराधांबद्दल बिनशर्त माफी मागितल्यावर वा दिलगिरी व्यक्त केल्यावर ती सभागृहाने स्वीकारली असाही एक पायंडा पडला आहे. सभागृह अशा प्रकरणी आपला मान राखण्यासाठी, मग त्या प्रकरणी कोणतीच दखल घेत नाही.

**सभागृहे विशेषाधिकारांच्या बाबतीत एकमेव निर्णयकार.**

यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या केशवसिंग या प्रकरणातील निर्णयाकडे (ए आय आर १९६५ च्या स. न्या. ७४५) पाहावयास सांगितले जाते, परंतु येथे हे सांगितले पाहिजे की हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय नव्हता. २६ मार्च १९६४ रोजी संविधानाच्या अनुच्छेद १४३ खाली भारताच्या राष्ट्रपतींनी विशेष रूपाने संदर्भीत केलेल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आपले मत यावेळी दिले होते. उत्तर प्रदेश विधानसभेने विशेषाधिकार भंगाबद्दल आणि सभागृहाचा अवमान केल्याबद्दल केशव सिंग या व्यक्तीला कारावासात टाकले होते. त्यावर त्याने आपल्याला मुक्त करण्याबद्दल अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे प्राधिलेख (Writ Petition) पाठवला होता. यातून पुढे उच्च न्यायालयाची आणि त्यातील न्यायमूर्तीची अधिकार कक्षा कोणती आणि राज्य विधान मंडळ आणि त्याचे सदस्य यांची कोणती, याबद्दल कायद्याचे अनेक महत्त्वाचे व गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होत गेले.

भारतातील न्यायालयांनी हे मान्य केले आहे की, कोणत्याही एखाद्या प्रकरणी विशेषधिकाराचा भंग झाला किंवा कसे याबाबतीत निर्णय घेण्यासाठी संसद सभागृह किंवा राज्य विधान मंडळ स्वत:च एकमेव प्राधिकारी आहे. त्यावेळी असेही ठरवण्यात आले की अवमानाबद्दल एखाद्याला तुरुंगात टाकण्याचा सभागृहाचा अधिकार हा हाऊस ऑफ कॉमन्सच्या अधिकाराच्या समकक्ष आहे आणि त्या अधिकाराचा वापर योग्य प्रकारे झाले किंवा नाही हे ठरवण्यास न्यायालय सक्षम नाही. राजा राम पाल यांच्या प्रकरणात सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने संसदेच्या, सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचे घटनेच्या १०५ अन्वये दिलेले विशेषाधिकार मान्य केलेले असून या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने विशेषाधिकाराचा उगम, व्याप्ती याचा सर्वंकष आढावा घेतलेला आहे.

**संसदीय विशेषाधिकार आणि वृत्तपत्रे**

वृत्तपत्रसृष्टी म्हणजे संसदेचेच एक व्यापक स्वरूप. संसदीय विधिविधानांचे सार वृत्तपत्रे लोकांना सांगतात आणि संसदेत काय घडत आहे तेही वृत्तपत्रांव्दारेच लोकांना कळते. संविधानात वृत्तपत्रस्वातंत्र्य स्पष्टपणे नमूद केले नाही. परंतु संविधानाच्या अनुच्छेद १९(१) (अ) खाली नमूद केलेले ''भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य'' या मूलभूत हक्कामध्ये

त्याचा समावेश गृहीत धरता येतो. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यात वृत्तपत्र स्वातंत्र्याचा अंतर्भाव होतो हे अनेक न्यायनिर्णयांव्दारे निश्चित झालेले आहे. सभागृहाने आपल्या कार्यवृत्तातून काढून टाकलेला मजकूर प्रकाशित करणे हा विशेषाधिकाराचा भंग व सभागृहाचा अवमान आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांतील कार्यवृत्ते प्रकाशित करण्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, असे प्रकाशन जर सभागृहाने प्राधिकृत केले असेल तर, कोणत्याही न्यायालयीन कारवाईपासून संविधानाने उन्मुक्ती दिलेली आहे (अनुच्छेद १०५(२)). मात्र ही उन्मुक्ती संसदीय कार्यवाहीच्या वृत्तपत्रांतील प्रकाशनांबाबत, दोन्ही सभागृहांनी तसे स्पष्ट अधिकार दिलेले असल्याखेरीज, लागू होणार नाही. संसदेच्या कोणत्याही सभागृहातील कोणत्याही कार्यवाहीचे मूलत:सत्य अहवाल वृत्तपत्रांतून प्रकाशित करण्यास किंवा बिनतारी संदेशवहन  व्यवस्थेव्दारे प्रक्षेपित करण्यास, कायदेशीर संरक्षण दिले गेले आहे. मात्र असे अहवाल हे लोकहितार्थ असावयास हवेत, त्यांचे प्रसारण वा प्रकाशन व्देषमूलक नसावे. (संविधानाचा अनुच्छेद ३६१ अ).

सभागृहाला, आपले वादविवाद किंवा अन्य कार्यवाही प्रकाशित करण्यावर स्वत:चे नियंत्रण ठेवण्याचा आणि तशीच गरज पडल्यास त्यांच्या प्रकाशनावर रोख लावण्याचा व त्यांसबंधातील आपल्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षा देण्याचा अधिकार आहे, या मर्यादांच्या अधीनच वर उल्लेखिलेले कायदेशीर संरक्षण आहे. साधारणत: सभागृहातील कार्यवाहीचे अहवाल प्रकाशित करण्यास कोणताही प्रतिबंध नसतो. परंतु असा अहवाल जर दुष्ट हेतूने दिला असेल किंवा त्यांच्या भाषणातील काही भाग मुद्दाम छापला नसेल, तर तो विशेषाधिकारभंग व सभागृहाचा अवमान ठरतो आणि असे करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र होते. शिवाय, कोणतीही कार्यवाही किंवा संसदीय समितीसमोर सादर केलेला पुरावा वा दस्तऐवज, सभागृहाला सादर करण्यापूर्वी वृत्तपत्रांनी प्रकाशित करण्यावर प्रतिबंध आहे. गुप्त बैठकीतील निर्णय वा त्या बैठकीची कार्यवाही, सभागृहाने गुप्ततेची बंदी काढून टाकल्याशिवाय कोणत्याही वृत्तपत्राला प्रकाशित करता येत नाही. तशी जर ती केली तर तो उघड उघड सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग ठरतो. त्याचप्रमाणे, वादविवादाचे जे

भाग अध्यक्षांच्या आदेशांनुसार, सभागृहाच्या कार्यवाहीतून काढून टाकलेले असतील, अशा भागाचे प्रकाशन हाही विशेषाधिकारभंग व सभागृहाचा अवमान ठरतो आणि दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरते.

विधान मंडळांच्या वैधानिक उणिवा दाखवणारे व त्यांवर रास्त टीका करणारे लेखक, वक्ते किंवा व्यंगचित्रकार हे विशेषाधिकाराच्या कक्षेत येतात का व त्यांच्याविरुद्ध कारवाई करता येते का, असा प्रश्न वारंवार विचारला जातो. संसद किंवा म्हटले तर कोणतेही विधानमंडळ त्यांच्याविरुद्ध केलेले व्देषमूलक लिखाण, भाषण इ.बद्दल आणि त्यांच्या किंवा त्यांच्या समित्यांच्या वा सदस्यांच्या कार्यपद्धतीवर शिंतोडे उडवणे वा हेत्वारोप करणे, याबद्दल अशी कृती करणाराविरुद्ध कारवाई करू शकतात याविषयी शंकाच नाही. परंतु जेव्हा टीका ही योग्य आणि सद्‌भावमूलक असते तेव्हा कोणत्याही प्रकारची कारवाई त्यांच्यावर सहसा करण्यात येत नाही.

याबाबतीत यू.के मधील हाऊस ऑफ कॉमन्सचा दृष्टिकोनच आपल्याकडील लोकसभेच्या विशेषाधिकारांबाबत सहसा स्वीकारला जातो, ही वस्तुस्थिती आहे.

हाऊस ऑफ कॉमन्सच्या (यू.के) पार्लमेंटरी विशेषाधिकार निवड समितीने (१९६७) पुढील शिफारस केली आहे.

**"सभागृहाला, त्यातील सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना त्यांची यथोचित कार्ये करण्यात खराखुरा हस्तक्षेप ठरेल असे अयोग्य अडथळे निर्माण केले जातील वा तसे करण्याचे प्रयत्न वा धमक्या दिल्या जात असतील, तरच सभागृहाने आपले दंडात्मक शिक्षा करण्याचे अधिकार वापरावेत, पण तेही होताहोईस्तोवर अत्यंत अल्प प्रमाणात वापरावेत."**

त्यानंतर, हाऊस ऑफ कॉमन्सच्या विशेषाधिकार समितीने आपल्या तिसऱ्या अहवालात (१९७६-७७) ही शिफारस पुन्हा नोंदवली आणि हाऊस ऑफ कॉमन्स (यू.के) नी ती दिनांक ६ फेब्रुवारी १९७८ ला स्वीकृत केली.

दुसऱ्या लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने आपल्या तेराव्या अहवालात अन्य बाबींबरोबरच असे नमूद केले की :

**"खरे तर, वृत्तपत्रांचा किंवा तसेच झाले तर, कोणत्याही नागरिकाचा, न्याय्य टीका करण्याचा अधिकार कोणीही अमान्य करणार नाही. परंतु अशी टीका ही सदस्याच्या**

**संसदेतील वर्तनाबद्दल त्याच्यावर व्यक्तिगत हल्ला करणारी असेल किंवा टीकेची भाषा ही गांवढळ आणि शिवराळ असेल, तर अशी टीका रास्त व न्याय्य टीकेच्या अर्थकक्षेत येत नाही. वृत्तपत्र आयोगानेही (१९५४) असभ्य आणि शिवराळ भाषेतील टीका योग्य नव्हे असेच म्हटले आहे. "सनसनाटी माजवणारी बेजबाबदार टीका" हिलाही "न्याय्य टीका" असे म्हणता येणार नाही."**

सहाव्या लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने आपल्या चौथ्या अहवालात नमूद केले आहे:

**"संविधानाच्या अनुच्छेद १९(१) (अ) खाली सर्व नागरिकांना बहाल केलेल्या मूलभूत स्वातंत्र्यात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य अंतर्भूत असून वृत्तपत्र स्वातंत्र्य हा त्या मूलभूत स्वातंत्र्याचा एक अविभाज्य भाग आहे, याची या समितीला जाणीव आहे. संसदीय पद्धतीत, संसदेच्या कार्यवाहीचा रास्त व यथातथ्य विश्वासार्ह अहवाल देण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य वृत्तपत्रांना असावे हे या समितीला महत्त्वाचे वाटते. परंतु ह्या स्वातंत्र्याचा दुष्ट हेतूने दुरुपयोग करण्यात आला, तर संसदेने अशा प्रकरणी हस्तक्षेप करणे हे संसदेचे कर्तव्य ठरते. परंतु त्याचबरोबर समितीला असेही वाटते की, संसदेच्या ह्या विशेषाधिकारामुळे कोणाच्या रास्त टीका करण्यावर व आपले मत मोकळेपणे मांडण्यावर बंधन येता कामा नये व अशी व्यक्ती हतोत्साह होता कामा नये."**

सातव्या लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने आपल्या पहिल्या अहवालात इतर अन्य बाबींबरोबर असे म्हटले आहे :

**"समितीला असे वाटते की लोकशाही पद्धतीमध्ये, सत्तेचा वापर संयमाने केला तर त्यामुळे सर्वांनाच प्रतिष्ठा मिळते. एखादी संस्था जितकी अधिक बलवान असेल, तितका तिने अधिक संयम बाळगला पाहिजे, विशेषकरून दंडात्मक अधिकारिता वापरताना."**

## ५. महाराष्ट्र विधानमंडळासंदर्भात विशेषाधिकारांबाबत संक्षिप्त माहिती

**विशेषाधिकार :**

संसदीय भाषेमध्ये विशेषाधिकार [Privileges] म्हणजे सभागृह आणि त्याच्या समित्या यांना सामुहिकपणे [Collective] आणि सभागृहाच्या सदस्यांना वैयक्तिकरित्या [Individual] प्रदान करण्यात आलेले खास अधिकार होय. या विशेषाधिकारांचा मुख्य उद्देश सभागृहाचे स्वातंत्र्य, सभागृहाचा अधिकार आणि शान व प्रतिष्ठा अबाधित राहावे हा आहे. संविधानाने सदस्यांवर सुपूर्द केलेली जबाबदारी आणि कर्तव्ये व्यवस्थितपणे सभागृहास; तसेच सदस्यांना वैयक्तिकरित्या, पार पाडता यावीत याकरिता विशेषाधिकार आवश्यक आहेत व म्हणून ते सभागृहास व सदस्यांना वैयक्तिकरित्या उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या विशेषाधिकारांपैकी सर्वात मूलभूत आणि महत्त्वाचा विशेषाधिकार हा विधान मंडळात भाषण स्वातंत्र्याचा आहे. हे विशेषाधिकार भारतीय घटनेच्या अनुच्छेद १९४ अन्वये प्रदान करण्यात आले असून त्यानुसार सदस्यांनी विधान मंडळाच्या सभागृहात किंवा त्याच्या कोणत्याही समितीत केलेले कोणतेही वक्तव्य अथवा भाषण अथवा मतदान हे कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होऊ शकत नाही. तसेच कोणतीही व्यक्ती सभागृहाच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखालील प्रकाशित झालेला कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कार्यवाही वृत्ताच्या प्रकाशनाबाबत कोणत्याही कारवाईस पात्र ठरू शकत नाही.

घटनेमध्ये नमूद करण्यात आलेला दुसरा विशेषाधिकार म्हणजे सभागृहाच्या कार्यवाहीबाबतचा. घटनेच्या अनुच्छेद २१२ अन्वये सभागृहाच्या कार्यपध्दतीत एखादी तथाकथित नियमबाहय गोष्ट घडली आहे या कारणावरून कोणत्याही न्यायालयात विधानमंडळातील कोणत्याही कामकाजास आव्हान देता येत नाही. तसेच सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्यांविरुध्द त्यांनी घटनेने दिलेल्या अधिकारानुसार सभागृहाचे कामकाज चालविताना केलेल्या कृतिसंबंधात कोणत्याही न्यायालयात कारवाई करता येत नाही.

घटनेमध्ये खास नमूद करण्यात आलेले इतर विशेषाधिकार पुढीलप्रमाणे आहेत :-

घटनेच्या अनुच्छेद २१२ (१) मध्ये म्हटले आहे की, सभागृहाच्या कार्यपध्दतीत एखादी तथाकथित चुकीची गोष्ट घडली आहे या कारणावरुन सभागृहाच्या कामकाजाची विधीग्राह्यता प्रश्नास्पद करता येणार नाही.

अनुच्छेद २१२ (२) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, सभागृहातील कार्यपद्धती किंवा कामकाज-चालनाचे विनियमन करण्याचा अथवा सभागृहात सुव्यवस्था राखण्याचे अधिकार ज्या पीठासीन अधिकाऱ्यांना दिले आहेत त्या अधिकारांच्या वापराबाबत त्यांचेविरुद्ध कोणत्याही न्यायालयात कारवाई करता येणार नाही.

यानंतर वेगवेगळया कायद्यामध्ये नमूद करण्यात आलेले विशेषाधिकार पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) सत्रकाळात तसेच सत्र सुरु होण्यापूर्वी ४० दिवस व सत्र समाप्ती नंतर ४० दिवस सदस्यांना दिवाणी प्रकरणांमध्ये [Civil Cases] अटक करता येत नाही [Civil Procedure Code-Section १३५-A].

(२) सभागृहाच्या कार्यवाही वृत्तांचा मूलत: वस्तुनिष्ठ वृत्तांत प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तिस दिवाणी वा फौजदारी कारवाईपासून संरक्षण [Parliamentary Proceedings (Protection of Publication) Act, १९५६, [Section ३] The Parliamentary Proceedings (Protection of Publication) Act, १९७७.

सभागृहाच्या नियमांमध्ये नमूद करण्यात आलेले विशेषाधिकार हे खालीलप्रमाणे आहेत :-

(अ) सदस्यांना करण्यात आलेल्या अटक, अटकाव, स्थानबद्धता आणि सुटका इत्यादीबाबतची माहिती सभागृहाला ताबडतोब मिळण्याचा हक्क. [महाराष्ट्र विधानसभा नियम २८५-२८६].

(ब) मा.अध्यक्षांच्या परवानगीशिवाय सभागृहाच्या आवारात सदस्यांस अथवा इतर कोणासही अटक करता येत नाही. [नियम २८८].

(क) मा. अध्यक्षांच्या परवानगीशिवाय सभागृहाच्या आवारात सदस्यांवर अथवा इतर कोणावरही फौजदारी स्वरूपाची किंवा दिवाणी स्वरुपाची अशी कोणतीही वैध आदेशिका बजावता येत नाही. [नियम २८९].

(ड) कोणाही सदस्यास मा. अध्यक्षांची आगाऊ परवानगी मिळविल्याशिवाय सभागृहापुढील किंवा सभागृहाच्या कोणत्याही समितीपुढील कोणत्याही कामकाजासंबंधीचा कोणताही पुरावा कोणत्याही न्यायालयापुढे किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्यापुढे देता येणार नाही. [नियम ३१५ (३)].

(३) आतापर्यंत चालत आलेले व उपलब्ध असलेले विशेषाधिकार खालीलप्रमाणे आहेत :-

(अ) सभागृहाचे सदस्य किंवा अधिकारी सभागृहाच्या कामकाजाशी संबंधित अशा कोठल्याही प्रकारचे कागदपत्र अथवा पुरावा सभागृहाच्या संमतीशिवाय न्यायालयात सादर करु शकत नाहीत.

(ब) सभागृहाच्या परवानगीशिवाय सभागृहाचे सदस्य किंवा अधिकारी हे दुसऱ्या सभागृहापुढे किंवा त्या सभागृहाच्या समितीपुढे अथवा इतर राज्याचे विधीमंडळ किंवा अशा विधीमंडळाच्या समितीपुढे साक्ष देण्यासाठी साक्षीदार म्हणून हजर राहू शकत नाहीत. तसेच अशी साक्ष देण्यासाठी सदस्यांची स्वत:ची संमती असणे देखील आवश्यक असते.

वर नमूद करण्यात आलेल्या विशेषाधिकार आणि उन्मुक्ती याव्यतिरिक्त सभागृहास आपल्या विशेषाधिकारांचे आणि उन्मुक्तींचे संरक्षण करण्याकरिता खालीलप्रमाणे अधिकार आहेत :-

(१) सभागृहाचा विशेष हक्कभंग किंवा अवमान प्रकरणी कोणाही व्यक्तीला ताब्यात घेणे मग ती व्यक्ती सभागृहाचे सदस्य असो अथवा नसो.

(२) साक्षीसाठी हजर रहाण्यास भाग पाडणे, तसेच संबंधित कागदपत्रे, माहिती देण्यास भाग पाडणे.

(३) सभागृहास आपली कार्यपद्धती आणि कामकाज-चालन यांचे विनियमन करण्याकरिता नियम तयार करणे.

(४) सभागृहाचे कामकाज, चर्चेचा वृत्तांत प्रकाशित करण्यावर बंधन.

(५) अनोळखी, अनाहूत व्यक्तिस सभागृहात येऊ देण्यास प्रतिबंध करणे.

**विशेष हक्कभंग :**

विशेष हक्क म्हणून उपलब्ध असलेल्या वैयक्तिकरित्या सदस्यांच्या आणि सामुदायिकरित्या सभागृहाच्या कोणत्याही विशेष हक्काचा आणि उन्मुक्तीचा मान राखण्यात येत नाही किंवा त्यावर टीका करण्यात येते अशी कोणतीही बाब की, जी सभागृहाला, समितीला किंवा सदस्यांना त्यांचे कार्य निर्भिडपणे, त्वरेने व परिणामकारकपणे बजावताना किंवा करताना आडकाठी, अडथळा किंवा अडवणूक करते ती बाब म्हणजे विशेष हक्कभंग होय. म्हणून एखाद्या सदस्याला सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यास प्रतिबंध करणे किंवा बसण्यास नकार देणे ही विशेष हक्कभंगाची बाब ठरू शकते. तसेच एखाद्या सदस्याला त्या कारणासाठी प्रलोभन दाखविणे किंवा लाच देणे ही बाबसुद्धा विशेष हक्कभंगाची ठरु शकते.

**विशेषाधिकाराचे प्रश्न :**

महाराष्ट्र विधानसभा नियम २७३ ह्या नियमाच्या अधीन राहून सदस्याला अध्यक्षांच्या संमतीने ज्यात सदस्यांच्या किंवा सभागृहाच्या किंवा सभागृहाच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न हक्कभंग प्रस्तावाव्दारे उपस्थित करता येतो. सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर सदस्याने हक्कभंग प्रस्तावाच्या लेखी सूचनांच्या तीन प्रती प्रधान सचिवांकडे दिल्या पाहिजेत.

सदस्यांस पुढील निर्बंधाच्या अधीन राहून विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करता येईल :-

(१) एका बैठकीत एकापेक्षा जास्त प्रश्न उपस्थित करता कामा नये.

(२) असा प्रश्न नुकत्याच घडलेल्या विशिष्ट बाबीपुरताच मर्यादित असला पाहिजे.

अध्यक्षांनी विशेषाधिकाराचा प्रश्न म्हणून बाब सभागृहात उपस्थित करण्याची संमती दिल्यावर ज्या सदस्यांनी नोटीस दिली असेल त्यांनी विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी सभागृहाची अनुमती मागताना संबंधित सदस्यांना विशेषाधिकाराच्या प्रश्नासंबंधी थोडक्यात निवेदन करण्याची परवानगी दिली जाते. अशी अनुमती देण्यास

हरकत घेण्यात आली तर अध्यक्ष जे सदस्य अनुमती देण्यास अनुकूल असतील अशा सदस्यांना उभे रहाण्याची विनंती करतात. २० किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य उभे राहिल्यास सभागृहाने विशेषाधिकाराची बाब उपस्थित करण्यास अनुमती दिली आहे असे समजून अध्यक्ष अनुमती असल्याची घोषणा करतात. अन्यथा अध्यक्ष बाब उपस्थित करण्यास परवानगी नाही असे सदस्यांना कळवतात.

सभागृहाने परवानगी दिल्यानंतर अध्यक्ष उक्त प्रश्न विशेष हक्क समितीकडे किंवा निर्णयासाठी सभागृहाकडे सोपवितात. अध्यक्ष प्रश्न समितीकडे सोपविताना अहवाल सादर करण्यासाठी कालावधी ठरवून देतात. प्रथेनुसार समितीला अहवाल पुढील अधिवेशनात सादर करण्याचा निदेश देण्यात येतो. काही वेळा असा निर्णय घेण्यापूर्वी अध्यक्ष असे सांगू शकतात की, बाब विशेष हक्क समितीकडे सोपविण्यापूर्वी ते विवक्षित मुद्यांवर संबंधितांकडून खुलासा मागवू इच्छितात व असा खुलासा आल्यावर तो विचारात घेऊन बाब विशेष हक्क समितीकडे अहवाल सादर करण्यासाठी सोपवावी किंवा नाही याचा निर्णय घेण्यात येतो.

**सदस्यांना अटक, स्थानबध्दता, सुटका इत्यादी :**

विधानमंडळाच्या सदस्यांना अटक झाल्यास अथवा त्यांना स्थानबध्द करण्यात आल्यास किंवा अटकाव करण्यात आल्यास त्याबद्दलची घोषणा अधिवेशन काळात सभागृहात करण्यात येते. अधिवेशन सुरु नसल्यास ही माहिती पत्रक भाग दोन व्दारे सर्व सदस्यांना देण्यात येते.

अटक झालेल्या, स्थानबद्ध करण्यात आलेल्या, अटकाव करण्यात आलेल्या तसेच सुटका करण्यात आलेल्या सदस्यांविषयी आवश्यक ती माहिती विधानसभा नियमातील अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये संबंधितांनी तात्काळ संबंधित मा.पीठासीन अधिकाऱ्यांना कळवावी लागते.

## ६. विशेषाधिकार संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील तरतूदी

### (अ) विशेषाधिकारासंबंधीचे प्रश्न

२४०. ह्या नियमांच्या तरतुदीस अधीन राहून, सदस्यास, ज्यात सदस्यांच्या किंवा विधानपरिषदेच्या किंवा तिच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न सभापतींच्या संमतीने उपस्थित करता येईल.

२४१. विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करू इच्छिणारा सदस्य, ज्या दिवशी त्याने प्रश्न उपस्थित करण्याचे योजिले असेल त्या दिवशी बैठक सुरू होण्यापूर्वी निदान एक तास अगोदर सचिवास लेखी सूचना देईल. उपस्थित केलेला प्रश्न जर एखाद्या कागदपत्रावर आधारित असेल, आणि जर ते कागदपत्र सदस्यांच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणाखाली असेल तर, नोटिशीबरोबर ते कागदपत्र जोडण्यात येतील.

२४२. विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार पुढील निर्बंधांस अधीन असेल :-

(एक) एका बैठकीत एकापेक्षा अधिक प्रश्न उपस्थित करण्यात येणार नाहीत,

(दोन) प्रश्न नुकत्याच घडलेल्या विशिष्ट बाबीपुरताच मर्यादित असेल.

२४३. (१) सभापतींनी जर नियम २४० अन्वये संमती दिली असेल तर आणि चर्चा करावयाची बाब नियमानुसार आहे असे त्यांचे मत असेल तर ते प्रश्न उपस्थित करण्यात आल्यानंतर आणि यादीतील कामकाज सुरू करण्यापूर्वी संबंधित सदस्यास पुकारतील, आणि तो सदस्य आपल्या जागेवर उठून उभा राहील व विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी अनुमती मागताना तत्संबंधी थोडक्यात निवेदन करील.

परंतु, जर सभापतींनी नियम २४० अन्वये आपली संमती देण्याचे नाकारले असेल किंवा जर चर्चा करण्याचे योजिलेली बाब नियमांनुसार नाही असे त्यांचे

मत असेल तर, त्यांना आवश्यक वाटल्यास, विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना वाचता येईल आणि आपण संमती नाकारली आहे किंवा विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना नियमानुसार नाही असे आपले मत आहे असे निवेदन करता येईल:

आणखी असे की, सभापतींची जर बाबीच्या निकडीबद्दल खात्री झाली असेल तर, प्रश्न निकालात काढल्यानंतर बैठकीच्या मुदतीत कोणत्याही वेळी विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यास संमती देता येईल.

(२) सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी विधानपरिषदेची परवानगी मागितल्यावर, विधानपरिषदेची सदस्यास अनुमती आहे किंवा कसे असे विचारतील. जर हरकत घेण्यात आली तर, जे सदस्य परवानगी देण्यास अनुकूल असतील त्या सदस्यांस आपापल्या जागी उभे राहण्याची सभापती विनंती करतील आणि जर त्याप्रमाणे साताहून कमी नाहीत इतके सदस्य उभे राहिले तर परवानगी देण्यात आली आहे असे सभापती कळवतील. जर साताहून कमी सदस्य उभे राहिले तर सभापती, विधानपरिषदेची परवानगी नाही असे त्या सदस्यास कळवतील.

**२४४.** नियम २४३ अन्वये परवानगी देण्यात आली असेल तर, सभापतींना आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, उक्त प्रश्न तपासणीसाठी व प्रतिवदेनासाठी म्हणून, विशेषाधिकार समितीकडे किंवा निर्णयासाठी सभागृहाकडे सोपविता येईल. सभापती, अशा रीतीने प्रश्न सभागृहाकडे विचारार्थ सोपवतील तेव्हा, सभागृहास उक्त प्रश्नावर विचारविनिमय करण्यास प्रारंभ करता येईल आणि ज्या सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित केला असेल त्या सदस्याच्या किंवा कोणत्याही सदस्याच्या प्रस्तावावर निर्णय घेता येईल.

**विशेषाधिकार समिती**

२४५. यथास्थिती विधानपरिषदेच्या अधिवेशनाच्या सुरूवातीस किंवा वेळोवेळी सभापती, विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त अकरा सदस्यांची एक विशेषाधिकार समितीनामनिर्देशित करतील. समितीचे सदस्य, नवीन समिती नामनिर्देशित करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

२४६. (१) समिती तिच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रश्नाची तपासणी करील आणि संबंधित व्यक्तीस आपले मुद्दे स्पष्ट करण्याची संधी दिल्यावर, प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या संदर्भात त्यात विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा कसे आणि होत असल्यास भंगाचे स्वरूप व तो होण्यास कारणीभूत झालेली परिस्थितीदेखील ठरवील आणि विधानपरिषदेकडे त्याविषयी अहवाल सादर करील.

(२) ह्या नियमाच्या पोट-नियम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, उक्त अहवालात समितीने केलेल्या शिफारशी अंमलात आणताना विधानपरिषदेने अनुसरावयाची कार्यपद्धतीही नमूद करता येईल.

२४७. (१) नियम १७३ मधील तरतुदींस अधीन राहून, विशेषाधिकार समितीप्रमुखांनी किंवा सचिवांनी सही केलेल्या आदेशाद्वारे साक्षीदारास बोलावता येईल आणि तो, समितीच्या उपयोगासाठी आवश्यक असतील असे कागदपत्र सादर करील.

(२) समितीपुढे सादर केलेला कोणताही पुरावा गुप्त किंवा गोपनीय समजणे हे समितीच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहील.

२४८. अहवाल सादर करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर, विशेषाधिकार समितीप्रमुख किंवा समितीचा कोणताही सदस्य त्या अहवालावर विचार करण्यात यावा असा प्रस्ताव मांडतील.

२४९. कोणत्याही सदस्यास, नियम २४८ मध्ये उल्लेख केलेल्या अहवालावर विचार करण्यासाठी मांडलेल्या प्रस्तावाच्या सुधारणेची सूचना, सभापतींना योग्य वाटेल अशा नमुन्यात देता येईल :

परंतु, उक्त प्रश्न एक तर मर्यादा न घालता किंवा कोणत्याही विवक्षित बाबीस अनुलक्षून समितीकडे पुन्हा सुपुर्द करण्यात यावा असा सुधारणेचा प्रस्ताव मांडता येईल.

२५०. सभापतींना, समितीतील किंवा विधानपरिषदेतील विशेषाधिकाराचा प्रश्न विचारात घेण्याशी संबंध असलेल्या सर्व बाबीसंबंधीच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी त्यांना आवश्यक वाटतील असे निदेश देता येईल.

२५१. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी सभापतींना विशेषाधिकाराचा कोणताही प्रश्न विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी, चौकशीसाठी किंवा अहवाल सादर करण्यासाठी सोपविता येईल.

**(ब) सदस्यास अटक, स्थानबद्ध वगैरे केल्याबद्दल आणि सुटका केल्याबद्दल सभापतींना कळविणे**

२५२. जेव्हा विधानपरिषदेच्या एखाद्या सदस्यास फौजदारी गुन्हा केल्याच्या आरोपावरून किंवा एखाद्या फौजदारी गुन्ह्यासाठी अटक करण्यात आली असेल किंवा त्यास न्यायालयाने कैदेची शिक्षा दिली असेल किंवा एखाद्या कार्यकारी आदेशान्वये त्यास स्थानबद्ध केले असेल तेव्हा ती कार्यवाही करणारा यथास्थिती, न्यायाधीश, दंडाधिकारी किंवा कार्यकारी प्राधिकारी ताबडतोब अशा गोष्टींची सूचना सभापतींना देईल आणि तीत यथास्थिती अशा अटक, स्थानबद्धता किंवा दोषसिध्दी यांबद्दलची कारणे तसेच, सदस्याच्या स्थानबद्धतेचे किंवा कैदेचे ठिकाण दुसऱ्या अनुसूचीत नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात दर्शविण्यात येईल.

२५३. जेव्हा विधानपरिषदेच्या सदस्यावर करण्यात आलेला खटला अनिर्णीत असताना किंवा त्याच्या दोषसिद्धीविरूद्ध त्याने केलेले अपील अनिर्णीत असताना किंवा अन्यप्रकारे त्याची जामीनावर सुटका करण्यात आली असेल तेव्हा संबंधित प्राधिकारी अशी गोष्ट सुद्धा दुसऱ्या अनुसूचीत नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात सभापतींना कळवील.

२५४. नियम २५२ किंवा नियम २५३ मध्ये उल्लेखिलेला पत्रव्यवहार सभापतींना मिळाल्यावर सभापती शक्य तितक्या लवकर पुढीलप्रमाणे त्या बाबतीत कार्यवाही करतील :-

(एक) अधिवेशन चालू असताना अशी अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबद्ध किंवा कैद करण्यात आले असेल तर सभापती ही गोष्ट सभागृहास कळवतील. त्यानंतर अधिवेशन चालू असतानाच, सदस्यांची सुटका करण्यात आली असेल तर अशी गोष्ट सुद्धा सभागृहास कळविण्यात येईल;

(दोन) ज्या कोणत्याही सदस्यास सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल तेव्हा अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबद्ध किंवा कैद करण्यात आले असेल त्या सदस्याचे अशा रीतीने अटकेत किंवा स्थानबद्धतेत किंवा कैदेत असणे सभागृहाचे अधिवेशन सुरू झाल्यावरही चालू असेल तर, सभापती, अशी गोष्ट सभागृहास कळवतील. त्यानंतर अधिवेशन चालू असतानाच सदस्यांची सुटका करण्यात आली असेल तर उक्त गोष्टसुद्धा सभागृहास कळविण्यात येईल.

(तीन) इतर सर्व बाबतीत अशाप्रकारचा पत्रव्यवहार विधानपरिषदेच्या सदस्यांच्या माहितीसाठी "पत्रकामध्ये" प्रसिद्ध करण्यात यावा असा सभापती निदेश देतील.

**(क) सभागृहाच्या आवारात वैध आदेशिका बजावण्याची आणि अटक करण्याची कार्यपद्धती**

२५५. सभापतींची परवानगी मिळविल्याशिवाय सभागृहाच्या आवारात कोणत्याही प्रकारे अटक करता येणार नाही.

२५६. सभापतींची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात दिवाणी स्वरूपाची किंवा फौजदारी स्वरूपाची अशी कोणतीही वैध आदेशिका बजाविण्यात येणार नाही.

**(महाराष्ट्र विधानपरिषद नियम पुस्तिका, पृष्ठ क्र. १२७-१३३)**

## ७. मा.सभापती, विधानपरिषपद यांचे निदेश

**निदेश क्रमांक ७**

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २५० मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीनी खालील निदेश काढले आहेत :-

१. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुध्द काही नसल्यास, या निदेशात,--

(अ) "समिती" या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २४५ अन्वये सभापतींनी नियुक्त केलेली समिती ;

(ब) "सभापती" या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती ;

(क) "समिती प्रमुख" या शब्दाचा अर्थ विशेष हक्क समिती प्रमुख

(ड) "बैठक" या शब्दाचा अर्थ विशेष हक्क समितीची बैठक ;

(ई) "सदस्य" या शब्दाचा अर्थ विशेष हक्क समितीचा सदस्य ;

(फ) "नियम" या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र विधानपरिषद नियम ;

२. समितीचे सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी, आणि समिती प्रमुखांनी बैठकींना उपस्थित राहण्याची विशेष परवानगी दिलेल्या इतर व्यक्ती यांव्यतिरिक्त सर्वजण समितीच्या बैठकीतून निघून जातील.

३. (अ) समितीच्या बैठकीत भाषण करु इच्छिणाऱ्या सदस्याने समिती-प्रमुखांना उद्देशून भाषण करावे, आणि इतर सदस्यांच्या बाबतीत द्यावयाचे अभिप्राय त्यांच्यामार्फत द्यावेत.

(ब) समिती-प्रमुखांनी सांगितल्याखेरीज सदस्यांनी भाषण करु नये.

(क) दुसरा एखादा सदस्य भाषण करीत असताना, कोणताही सदस्य त्यात अडथळा आणू इच्छित असल्यास, तसे करण्यास त्याला समिती-प्रमुखांची परवानगी घ्यावी लागेल.

(ड) कोणत्याही प्रश्नावर पुरेशी चर्चा झाली आहे असे समिती-प्रमुखांस वाटले तर अधिक चर्चा न होऊ देता तो प्रश्न मतास टाकण्याचा आणि निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार आहे.

(ई) समितीने आधीच निर्णय घेतला आहे असा कोणताही प्रश्न फेरविचारासाठी घेण्यात यावा अशी एखाद्या सदस्याची इच्छा असेल तर त्याला तसे करण्यासाठी सर्वप्रथम समिती-प्रमुखाची परवानगी मिळविली पाहिले.

४. समितीच्या सभांमधील कामकाज चालविताना ज्यासाठी नियमांमधून आणि निदेशांमधून खास करुन तरतूद केलेली नाही त्या गोष्टींचे नियमन करण्याचा समिती-प्रमुखास अधिकार राहील आणि त्यांनी समितीच्या सभा चालू असताना उपस्थित करण्यात आलेले कार्यपद्धतीविषयक सर्व प्रश्न आणि हरकतीचे मुद्दे, तशाच गोष्टीबाबत असतील ते निर्बंध लक्षात घेऊन, निकालात काढले पाहिजेत आणि त्यावरील त्यांचा निर्णय अखेरचा राहील.

५. (अ) समितीच्या कार्यवाहीचा शब्दश: वृत्तान्त सचिवाच्या कार्यालयाने लिहून ठेवला पाहिजे.

(ब) अशा कार्यवाहीच्या प्रती समिती-प्रमुखाच्या आदेशानुसार समितीच्या सर्व सदस्यांना देण्यात याव्यात.

६. (अ) समितीचा अहवाल किंवा तिने तात्पुरते किंवा अंतिमरित्या घेतलेले निर्णय यासहीत तिची कार्यवाही सभागृहाला सादर करण्यात येत नाही तोपर्यंत गोपनीय समजली गेली पाहिजे आणि समितीला कार्यवाहीचा सर्व किंवा एक भाग किंवा गोषवारा सभागृहासमोर ठेवण्याबाबत निदेश देण्याचा अधिकार आहे.

(ब) समितीच्या सदस्यांकडे "गुप्त" किंवा "गोपनीय" असा शिक्का मारुन पाठविलेल्या कोणत्याही कागदामधील किंवा दस्तऐवजामधील मजकूर सभापतींच्या परवानगीशिवाय सभागृहात किंवा अन्य प्रकारे प्रकट करता येणार नाही.

७. (अ) समितीची कार्यवाही चालू असता तिजकडे सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजात किंवा कोणाही सदस्याने व्यक्त केलेल्या अभिप्रायात किंवा अभिमतात असंसदीय व असंबद्ध असे शब्द, शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग आहेत किंवा त्या अभिप्रायाची किंवा अभिमतांची भाषा सौजन्यशील, शिष्टसंमत आणि संयमी नाही किंवा एक प्रकारे अयोग्य अशी आहे असे समिती प्रमुखाचे मत असेल तर त्यांना ते शब्द, शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग कार्यवाहीतून गाळून टाकण्यासाठी आदेश देण्याचा अधिकार आहे.

(ब) वर (अ) मध्ये काहीही असले तरी सभापतींना अशा परिस्थितीत कार्यवाहीतील कोणताही भाग गाळून टाकण्यासाठी आदेश देण्याचा तसेच गाळून टाकण्यासंबंधीच्या सर्व निर्णयांचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार आहे आणि त्यांचा निर्णय अखेरचा राहील.

८. सभापतींनी नियम २४४ किंवा २५१ खाली विशेषाधिकार भंगाचा प्रश्न विशेषाधिकार समितीकडे सोपविल्यानंतर ह्या समितीच्या प्रमुखाने शक्य तितक्या लवकर विशेषाधिकाराच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी समितीची प्राथमिक सभा बोलाविली पाहिजे आणि त्या संबंधात करण्यात आलेले खास नियम व निदेश लक्षात घेऊन चौकशीखालील विषयाबाबत तिच्या मते सामान्यत: अनुसरण्यात येणारी सर्वोत्तम कार्यपध्दती निश्चित केली पाहिजे.

९. या समितीसमोर ठेवण्यात आलेले संबंधित कागदपत्र पाहिल्यानंतर तिचे असे मत झाले की, सकृतदर्शनी विशेषाधिकार भंगाचे प्रकरण सिध्द झाले नाही तर तिला त्याप्रमाणे विधानपरिषदेकडे अहवाल सादर करता येईल.

१०. अधिक चौकशी करणे आवश्यक आहे असे समितीस वाटले तर तिला तसा पुरावा घेण्याचा, ती ठरवील त्या क्रमाने साक्षीदार तपासण्याचा आणि साक्षीदारांकडे विहित नमुन्यांत सूचना जारी करण्याचा अधिकार आहे.

११. समितीने विहित नमुन्यात शपथ घेण्यास लावून पुरावा घेतला पाहिजे.

१२. समितीला साक्षीदारांची साक्ष घेताना कार्यपद्धतीचे दृष्टीने आवश्यक वाटले तर देशातील सर्वसाधारण कायद्यांचा, उदाहरणार्थ दिवाणी प्रक्रिया संहिता, दंड प्रक्रिया संहिता, पुराव्यासंबंधीचा कायदा वगैरे आणि स्वाभाविक न्यायाची तत्वे यांचा अवलंब करता येईल.

१३. विचाराधीन असलेल्या चौकशीखाली प्रत्यक्षत: येत नसला तरी संबंधित अन्य माहिती आपणासमोर सादर करण्यास समितीस कोणाही साक्षीदारास सांगता येईल.

१४. संबंधित पक्षकारांचे म्हणणे त्यांनी नियुक्त केलेल्या वकिलामार्फत ऐकण्यास समिती सभापतींची परवानगी घेऊन, परवानगी देऊ शकेल.

१५. (अ) साक्षीदाराला किंवा साक्षीदारांना साक्षीचे ठिकाणी येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवास वगैरे कारणांवरुन होणारा खर्च त्यांना बोलविणाऱ्या पक्षकारांनी केला पाहिजे.

(ब) समितीने आपणहून बोलाविलेल्या साक्षीदारांबाबत, त्यांचा प्रवासखर्च खालील तरतुदींनुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला सोसावा लागेल :-

(एक) सरकारी नोकरांच्या निरनिराळ्या श्रेणींची तुलना करुन, समितीने बोलाविलेल्या साक्षीदाराचा किंवा साक्षीदारांचा दर्जा, यथास्थिति सचिवालय प्रथम निश्चित करील.

(दोन) वर दाखविल्याप्रमाणे, साक्षीदाराचा दर्जा निश्चित केल्यानंतर, तुलनात्मक दर्जाप्रमाणे सरकारी नोकराला, मुंबई नागरी सेवा नियमांखाली मिळण्यायोग्य असलेल्या दराप्रमाणे प्रवास भत्ता देण्यात येईल.

१६. (अ) समितीच्या अहवालाचा मसुदा सचिव तयार करतील आणि समितीप्रमुखांनी त्याला मान्यता दिल्यानंतर तो समितीसमोर ठेवण्यात येईल.

(ब) अहवालाच्या मसुद्यासंबंधात इतर कोणत्याही कागदपत्रांसहित, त्याच्या टंकलिखित, चक्रमुद्रित किंवा अंतिम मुद्रणपूर्व प्रती, त्यावर विचार करण्याचे वेळी किंवा विचार करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेपूर्वी समितीच्या सभासदांमध्ये प्रसृत करण्याचा समितीप्रमुख निदेश देतील.

१७. अध्यक्षांच्या, सभापतींच्या, समितीच्या किंवा सभागृहाच्या आदेशानुसार, यथास्थिती, कोणत्याही व्यक्तीवर बजाविण्यात यावयाच्या एखाद्या आदेशिकेसंबंधात, प्रत्येक बाबतीत आवश्यक असलेल्या परिस्थितीप्रमाणे त्यातील फेरबदलासहित, ती आदेशिका दुसऱ्या अनुसूचीत दर्शविलेल्या नमुन्याप्रमाणे बजावण्यात येईल. त्यात नमूद केलेल्या त्या त्या कारणांसाठी सदरहू नमुन्यांचा उपयोग करण्यात येईल.

**(महाराष्ट्र विधानपरिषद नियमांन्वये मा.सभापती यांनी दिलेले निदेश पुस्तिका पृष्ठ क्र.२०-२७)**

------------------

## ८. विशेषाधिकार संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमातील तरतूदी

### (अ) विशेषाधिकारासंबंधीचे प्रश्न

२७३. ह्या नियमांच्या तरतुदीस अधीन राहून सदस्यांस, ज्यात सदस्यांच्या किंवा विधानसभेच्या किंवा तिच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न अध्यक्षांच्या संमतीने उपस्थित करता येईल.

२७४. विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करू इच्छिणारा सदस्य, ज्या दिवशी ज्याने प्रश्न उपस्थित करण्याचे योजिले असेल त्या दिवशी बैठक सुरू होण्यापूर्वी निदान एक तास अगोदर सचिवास लेखी नोटीस देईल. उपस्थित केलेला प्रश्न जर एखाद्या कागदपत्रावर आधारित असेल आणि जर सदरहू कागदपत्र सदस्यांच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणाखाली असेल तर नोटीशीबरोबर ते कागदपत्र जोडण्यात येतील.

२७५. विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार पुढील निर्बंधांस अधीन असेल :-

(एक) एका बैठकीत एकापेक्षा अधिक प्रश्न उपस्थित करण्यात येणार नाहीत.

(दोन) असा प्रश्न नुकत्याच घडलेल्या विशिष्ट बाबीपुरताच मर्यादित असेल.

२७६. (१) अध्यक्षांनी, जर नियम २७३ अन्वये संमती दिली असेल तर आणि चर्चा करावयाची बाब नियमानुसार आहे असे त्यांचे मत असेल तर, ते प्रश्न उपस्थित करण्यात आल्यानंतर आणि यादीतील कामकाज सुरू करण्यापूर्वी संबंधित सदस्यास पुकारतील आणि सदरहू सदस्य आपल्या जागेवर उठून उभा राहील व विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी अनुमती मागताना तत्संबंधी थोडक्यात निवेदन करील:

परंतु जर अध्यक्षांनी नियम २७३ अन्वये आपली संमती देण्याचे नाकारले असेल किंवा जर चर्चा करण्याचे योजिलेली बाब नियमानुसार नाही असे त्यांचे मत असेल तर, त्यांना आवश्यक वाटल्यास, विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना वाचता येईल आणि आपण संमती नाकारली आहे किंवा विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना नियमानुसार नाही असे आपले मत आहे, असे निवेदन करता येईल.

आणखी असे की, अध्यक्षांची जर बाबींच्या निकडीबद्दल खात्री झाली असेल तर, त्यांना प्रश्नांची विल्हेवाट लागल्यानंतर बैठकीच्या मुदतीत कोणत्याही वेळी विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यात संमती देता येईल.

(२) सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी विधानसभेची अनुमती मागितल्यावर, विधानसभेची सदस्यांस अनुमती आहे किंवा कसे असे अध्यक्ष त्यास विचारतील. जर हरकत घेण्यात आली असेल तर, जे सदस्य अनुमती देण्यास अनुकुल असतील त्या सदस्यांस आपल्या जागी उभे राहण्याची अध्यक्ष विनंती करतील आणि जर त्याप्रमाणे २० सदस्य उभे राहिले तर अनुमती देण्यात आली आहे असे अध्यक्ष कळवतील. जर २० पेक्षा कमी सदस्य उभे राहिले तर अध्यक्ष, विधानसभेची अनुमती नाही असे त्या सदस्यांस कळवतील.

२७७. नियम २७६ अन्वये अनुमती देण्यात आली असेल तर, अध्यक्षांना, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार उक्त प्रश्न तपासणीसाठी व प्रतिवेदनासाठी म्हणून, विशेषाधिकार समितीकडे किंवा निर्णयासाठी सभागृहाकडे सोपाविता येईल, अध्यक्ष अशा रीतीने प्रश्न सभागृहाकडे विचारार्थ सोपवतील तेव्हा, सभागृहास उक्त प्रश्नांवर विचारविनिमय करण्यास प्रारंभ करता येईल आणि ज्या सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित केला असेल त्या सदस्यांच्या किंवा इतर कोणत्याही सदस्यांच्या प्रस्तावावर निर्णय घेता येईल.

**विशेषाधिकार समिती**

२७८. यथास्थिती, विधानसभेच्या अधिवेशनाच्या सुरूवातीस, किंवा वेळोवेळी, अध्यक्ष विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त **पंधरा सदस्यांची एक विशेषाधिकार समिती नामनिर्देशित करतील.**

२७९. (१) समिती, तिच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रश्नाची तपासणी करील आणि संबंधित व्यक्तीस आपले मुद्दे स्पष्ट करण्याची संधी दिल्यावर, प्रत्येक

प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या संदर्भात, त्यात विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा कसे आणि होत असल्यास भंगाचे स्वरूप व तो होण्यास कारणीभूत झालेली परिस्थितीदेखील ठरवील आणि विधानसभेकडे त्या विषयी अहवाल सादर करील.

(२) ह्या नियमाच्या पोट-नियम (१) च्या तरतुदींना अधीन राहून उक्त अहवालात, समितीने केलेल्या शिफारशी अंमलात आणताना विधानसभेने अनुसरावयाची कार्यपद्धतीही नमूद करता येईल.

२८०. (१) नियम १७८ च्या तरतुदींना अधीन राहून, समिती प्रमुखांनी किंवा सचिवांनी सही केलेल्या आदेशाद्वारे साक्षीदारास बोलावता येईल आणि तो समितीच्या उपयोगासाठी आवश्यक असतील असे कागदपत्र सादर करील.

(२) समितीपुढे सादर केलेला कोणताही पुरावा गुप्त किंवा गोपनीय समजणे हे तिच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहील.

२८१. अहवाल सादर करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर, समिती प्रमुख किंवा कोणताही सदस्य त्या अहवालावर विचार करण्यात यावा असा प्रस्ताव मांडतील.

२८२. कोणत्याही सदस्यास, नियम २८१ मध्ये उल्लेख केलेल्या अहवालावर विचार करण्यासाठी मांडलेल्या प्रस्तावाच्या सुधारणेची नोटीस, अध्यक्षांना योग्य वाटेल अशा नमुन्यात देता येईल: परंतु, उक्त प्रश्न एकतर मुदतीशिवाय किंवा कोणत्याही विवक्षित बाबीस अनुलक्षून समितीकडे पुन्हा सुपूर्द करण्यात यावा असा सुधारणेचा प्रस्ताव मांडता येईल.

२८३. अध्यक्षांस, समितीतील किंवा विधानसभेतील विशेषाधिकाराचा प्रश्न विचारात घेण्याशी संबंध असलेल्या सर्व बाबीसंबंधीच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी त्यांना आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील.

२८४. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अध्यक्षांना विशेषाधिकाराचा कोणताही प्रश्न विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी, चौकशीसाठी किंवा अहवाल सादर करण्यासाठी सोपविता येईल.

**(ब) सदस्यास अटक, स्थानबद्ध वगैरे केल्याबद्दल आणि मुक्त केल्याबद्दल सूचना देणे**

२८५. जेव्हा विधानसभेच्या एखाद्या सदस्यास फौजदारी गुन्हा केल्याचे आरोपावरून किंवा एखाद्या फौजदारी गुन्ह्यासाठी अटक करण्यास आली असले किंवा त्यास न्यायालयाने कैदेची शिक्षा दिली असेल किंवा एखाद्या कार्यकारी आदेशान्वये त्यास स्थानबद्ध केले असेल तेव्हा, ती कार्यवाही करणारा, यथास्थिती, न्यायाधीश, फौजदारी न्यायाधीश, किंवा कार्यकारी प्राधिकारी ताबडतोब अशा गोष्टीची अध्यक्षांस सूचना देईल आणि तीत यथास्थिती, अशी अटक, स्थानबद्धता किंवा दोषसिद्धी याबद्दलची कारणे तसे, स्थानबद्धतेचे किंवा कैदेचे ठिकाण दुसऱ्या अनुसूचित नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात दर्शविण्यात येईल.

२८६. जेव्हा विधानसभेच्या सदस्यांवर करण्यात आलेला खटला अनिर्णित असताना किंवा त्याच्या दोषसिद्धीविरूद्ध त्याने केलेले अपील अनिर्णित असताना किंवा अन्य प्रकारे त्याची जामीनावर सुटका करण्यात आली असेल तेव्हा संबंधित प्राधिकारी अशी गोष्टसुद्धा दुसऱ्या अनुसूचित नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात अध्यक्षांना कळवील.

२८७. नियम २८५ किंवा नियम २८६ मध्ये उल्लेखिलेला पत्रव्यवहार अध्यक्षांना मिळाल्यावर अध्यक्ष, शक्य तितक्या लवकर, पुढील रीतीने त्याबाबतीत कार्यवाही करतील :-

(एक) अधिवेशन चालू असताना अशी अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबध्द किंवा कैद करण्यात आली असेल तर अध्यक्ष ही गोष्ट सभागृहास कळवतील, अधिवेशन चालू असतानाच, त्यानंतर सदस्यांची सुटका करण्यात आली असेल तर उक्त गोष्टसुध्दा सभागृहास कळवण्यात येईल.

(दोन) ज्या कोणत्याही सदस्यास सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल तेव्हा अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबध्द किंवा कैद करण्यात आले असेल त्या सदस्यांचे अशा रितीने अटकेत किंवा स्थानबध्दतेत किंवा कैदेत असणे सभागृहाचे अधिवेशन सुरू झाल्यावरही चालू असेल तर, अध्यक्ष

अशी गोष्ट सभागृहास कळवतील. अधिवेशन चालू असतानाच, त्यानंतर सदस्यांची सुटका करण्यात आली असेल तर, उक्त गोष्टसुध्दा सभागृहास कळवण्यात येईल.

(तीन) इतर सर्व बाबतीत अशा प्रकारचा पत्रव्यवहार विधानसभेच्या सदस्यांच्या माहितीसाठी "बुलेटिनमध्ये" प्रसिध्द करण्यात यावा असा अध्यक्ष निदेश देतील.

**(क) सभागृहाच्या आवारात वैध आदेशिका बजावण्याची आणि अटक करण्याची कार्यपध्दती**

२८८. अध्यक्षांची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात कोणत्याही प्रकारे अटक करण्यात येणार नाही.

२८९. अध्यक्षांची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात फौजदारी स्वरुपाची किंवा दिवाणी स्वरुपाची अशी कोणतीही वैध आदेशिका बजावण्यात येणार नाही.

**(महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तिका, पृष्ठ क्र. ११६-१२०)**

-----------------

## ९. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे निदेश

**निदेश क्र. ७**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २८३ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी खालील निदेश काढले आहेत.

१. विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरुद्ध काही नसल्यास, या निदेशात, -

(अ) "समिती" या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २७८ अन्वये अध्यक्षांनी नियुक्त केलेली समिती;

(ब) "समिती प्रमुख" या शब्दाचा अर्थ विशेष हक्क समितीचे समिती प्रमुख ;

(क) "बैठक" या शब्दाचा अर्थ विशेष हक्क समितीची बैठक ;

(ड) "सदस्य" या शब्दाचा अर्थ विशेष हक्क समितीचा सदस्य ;

(ई) "नियम" या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र विधानसभा नियम.

२. समितीचे सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी आणि समिती प्रमुखांनी बैठकींना उपस्थित राहण्याची परवानगी दिलेल्या इतर व्यक्ती यांच्याव्यतिरिक्त सर्वजण बैठकीतून निघून जातील.

३. (अ) समितीच्या बैठकीत भाषण करू इच्छिणाऱ्या सदस्याने समिती प्रमुखांना उद्देशून भाषण करावे आणि इतर सदस्यांच्या बाबतीत द्यावयाचे अभिप्राय त्यांच्यामार्फत द्यावेत.

(ब) समिती प्रमुखांनी सांगितल्याखेरीज सदस्यांनी भाषण करू नये.

(क) दुसरा एखादा सदस्य भाषण करीत असताना, कोणताही सदस्य त्यात अडथळा आणू इच्छित असल्यास, तसे करण्यास त्याला समिती प्रमुखाची परवानगी घ्यावी लागेल.

(ड) कोणत्याही प्रश्नावर पुरेशी चर्चा झाली आहे असे समिती प्रमुखांस वाटले तर अधिक चर्चा न होऊ देता तो प्रश्न मतास टाकण्याचा आणि निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार आहे.

(ई) समितीने आधीच निर्णय घेतला आहे असा कोणताही प्रश्न फेरविचारासाठी घेण्यात यावा अशी एखाद्या सदस्याची इच्छा असेल तर त्याने तसे करण्यासाठी सर्व प्रथम समिती प्रमुखाची परवानगी मिळविली पाहिजे.

४. समितीच्या बैठकीमधील कामकाज चालविताना ज्यासाठी नियमांमधून आणि निदेशांमधून खासकरुन तरतूद केलेली नाही त्या गोष्टींचे नियमन करण्याचा समिती प्रमुखास अधिकार राहील आणि त्यांनी समितीच्या बैठकी चालू असता उपस्थित करण्यात आलेले कार्यपद्धतीविषयक सर्व प्रश्न आणि हरकतीचे मुद्दे, तशाच गोष्टीबाबत असतील ते निर्बंध लक्षात घेऊन निकालात काढले पाहिजेत आणि त्यावरील त्यांचा निर्णय अखेरचा राहील.

५. (अ) समितीच्या कार्यवाहीचा शब्दश: व वृत्तांत सचिवांच्या कार्यालयाने लिहून ठेवला पाहिजे.

(ब) अशा कार्यवाहीच्या प्रती समिती प्रमुखाच्या आदेशानुसार समितीच्या सर्व सदस्यांना देण्यात याव्यात.

६. (अ) समितीचा अहवाल किंवा तिने तात्पुरते किंवा अंतिमरित्या घेतलेले निर्णय यासहित तिची कार्यवाही सभागृहाला सादर करण्यात येत नाही तोपर्यंत गोपनीय समजली गेली पाहिजे आणि समितीला कार्यवाहीचा सर्व किंवा एक भाग गोषवारा सभागृहासमोर ठेवण्याबाबत निदेश देण्याचा अधिकार आहे.

(ब) समितीच्या सदस्यांकडे "गुप्त" किंवा "गोपनीय" असा शिक्का मारून पाठविलेल्या कोणत्याही कागदामधील किंवा दस्तऐवजामधील मजकूर कोणत्याही सदस्यास अध्यक्षांच्या परवानगीशिवाय सभागृहात किंवा अन्य प्रकारे प्रकट करता येणार नाही.

७. (अ) समितीची कार्यवाही चालू असता तिजकडे सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजात किंवा कोणाही सदस्याने व्यक्त केलेल्या अभिप्रायात किंवा अभिमतात असंसदीय, असंबद्ध असे शब्द, शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग आहेत किंवा त्या अभिप्रायांची किंवा अभिमतांची भाषा सौजन्यशील, शिष्टसंमत आणि संयमी नाही किंवा एकप्रकारे अयोग्य अशी आहे असे समिती प्रमुखांचे मत असेल तर त्यांना ते शब्द, शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग कार्यवाहीतून गाळून टाकण्यासाठी आदेश देण्याचा अधिकार आहे.

(ब) वर (अ) मध्ये काहीही असले तरी अध्यक्षांना अशाच परिस्थितीत कार्यवाहीतील कोणताही भाग गाळून टाकण्यासाठी आदेश देण्याचा तसेच गाळून टाकण्यासंबंधीच्या सर्व निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार आहे आणि त्यांचा निर्णय अखेरचा राहील.

८. अध्यक्षांनी नियम २७७ किंवा २८४ खाली विषेशाधिकारभंगाचा प्रश्न विशेषाधिकार समितीकडे सोपविल्यानंतर समिती प्रमुखाने शक्य तितक्या लवकर विशेषाधिकाराच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी समितीची प्राथमिक बैठक बोलाविली पाहिजे आणि त्या संबंधात करण्यात आलेले खास नियम व निदेश लक्षात घेऊन चौकशीखालील विषयाबाबत तिच्या मते सामान्यत: अनुसरण्यात येणारी सर्वोत्तम कार्यपद्धती निश्चिती केली पाहिजे.

९. समितीसमोर ठेवण्यात आलेली संबंधित कागदपत्र पाहिल्यानंतर सकृत दर्शनी विशेषाधिकारभंगाचे प्रकरण सिद्ध झालेले नाही असे तिचे मत झाले तर तिला त्याप्रमाणे विधानसभेकडे अहवाल सादर करता येईल.

१०. अधिक चौकशी करणे आवश्यक आहे असे समितीस वाटले तर तिला तसा पुरावा घेण्याचा, ती ठरविल त्या क्रमाने साक्षीदार तपासण्याचा आणि साक्षीदाराकडे विहित नमुन्यात सूचना जारी करण्याचा अधिकार आहे.

११. समितीने विहित नमुन्यात शपथ घेण्यास लाऊन पुरावा घेतला पाहिजे.

१२. समितीला साक्षीदारांची साक्ष घेताना कार्यपद्धतीचे दृष्टीने आवश्यक वाटले तर देशातील सर्वसाधारण कायद्यांचा, उदाहरणार्थ व्यवहार प्रक्रिया संहिता, दंड संहिता, पुराव्यासंबंधीचा कायदा वगैरे आणि स्वाभाविक न्यायाची तत्त्वे यांचा अवलंब करता येईल.

१३. विचाराधीन असलेल्या चौकशीखाली प्रत्यक्षत: येत नसला तरी संबंधित अन्य माहिती आपणासमोर सादर करण्यास समितीस कोणाही साक्षीदारास सांगता

येईल.

१४. संबंधित पक्षकारांचे म्हणणे त्यांनी नियुक्त केलेल्या वकिलामार्फत ऐकण्यास समिती अध्यक्षाची परवानगी घेऊन, परवानगी देऊ शकेल.

१५. (अ) साक्षीदाराला किंवा साक्षीदारांना साक्षीचे ठिकाणी येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवास वगैरे कारणांवरुन होणारा खर्च त्यांना बोलविणाऱ्या पक्षकारांनी केला पाहिजे.

(ब) समितीने आपणहून बोलाविलेल्या साक्षीदारांबाबत, त्यांचा प्रवास खर्च खालील तरतुदींनुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला सोसावा लागेल :-

(एक) सरकारी नोकरांच्या निरनिराळ्या श्रेणींची तुलना करून, समितीने बोलाविलेल्या साक्षीदाराचा किंवा साक्षीदारांचा दर्जा, यथास्थिति, सचिवालय प्रथम निश्चित करील.

(दोन) वर दाखविल्याप्रमाणे, साक्षीदाराचा दर्जा निश्चित केल्यानंतर, तुलनात्मक दर्जाप्रमाणे सरकारी नोकराला, मुंबई नागरी सेवा नियमांखाली मिळण्यायोग्य असलेल्या दराप्रमाणे प्रवास भत्ता देण्यात येईल.

१६. (अ) समितीच्या अहवालाचा मसुदा सचिव तयार करतील आणि समिती प्रमुखांनी त्याला मान्यता दिल्यानंतर तो समितीसमोर ठेवण्यात येईल.

(ब) अहवालाच्या मसुद्यासंबंधात इतर कोणत्याही कागदपत्रांसहित, त्याच्या टंकलिखित, चक्रमुद्रित किंवा अंतिम मुद्रणपूर्व प्रती, त्यावर विचार करण्याचे वेळी किंवा विचार करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेपूर्वी समितीच्या सभासदांमध्ये प्रसृत करण्याचा समिती प्रमुख निदेश देतील.

१७. अध्यक्षांच्या, सभापतींच्या, समितीच्या किंवा सभागृहाच्या आदेशानुसार, यथास्थिती, कोणत्याही व्यक्तीवर बजाविण्यात यावयाच्या एखाद्या आदेशिकेसंबंधात, प्रत्येक बाबतीत आवश्यक असलेल्या परिस्थितीप्रमाणे त्यातील फेरबदलासहित, ती आदेशिका दुसऱ्या अनुसूचीत दर्शविलेल्या नमुन्याप्रमाणे बजावण्यात येईल. त्यात नमूद केलेल्या त्या त्या कारणांसाठी सदरहू नमुन्यांचा उपयोग करण्यात येईल.

**(महाराष्ट्र विधानसभा नियमांन्वये मा.अध्यक्ष यांनी दिलेले निदेश पुस्तिका, पृष्ठ क्र.२२-२९)**

## १०. महाराष्ट्र विधानपरिषदेत विशेषाधिकार भंग सूचनांबाबत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती

मा.सभापती, विधानपरिषद यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम २५० मधील तरतुदीनुसार विशेषाधिकार भंगाच्या सूचनांबाबत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी सभागृहात दिलेले निदेश.

(१) ज्या व्यक्तीविरुध्द विशेष हक्क भंगाची सूचना दिलेली आहे. त्यांच्याकडून थेट खुलासा मागविण्यात येईल व सदरहू व्यक्ती जर शासकीय कर्मचारी/अधिकारी असेल तर, त्या संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय, तसेच त्या विभागाचे प्रमुख (सचिव, प्रधान सचिव) यांना खुलासा मागविण्याऱ्या पत्राची प्रत उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येईल.

(२) संबंधितांना खुलासा सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात येईल.

(३) १५ दिवसांत खुलासा प्राप्त न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे (Principle of natural justice) ७ दिवसात खुलासा सादर करण्याबाबत स्मरणपत्र पाठविण्यात येईल व त्या नंतरही खुलासा प्राप्त न झाल्यास द्वितीय स्मरणपत्र पाठवून ७ दिवसांत खुलासा प्राप्त न झाल्यास याबाबतची गंभीर दखल घेऊन संबंधितांना विशेषाधिकार भंगाच्या सूचनेसंबंधी काहीही म्हणावयाचे नाही असे गृहित धरुन पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

## ११. महाराष्ट्र विधानसभेत विशेषाधिकार भंग सूचनांबाबत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती

मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम २८३ मधील तरतुदीनुसार विशेषाधिकार भंगाच्या सूचनांबाबत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत दिनांक १९ एप्रिल, २०१० रोजी सभागृहात दिलेले निदेश.

(१) ज्या व्यक्तीविरुध्द विशेष हक्क भंगाची सूचना दिलेली आहे त्यांच्याकडून थेट खुलासा मागविण्यात येईल व सदरहू व्यक्ती जर शासकीय कर्मचारी/अधिकारी असेल तर, त्या संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय, तसेच त्या विभागाचे प्रमुख (सचिव, प्रधान सचिव,अपर सचिव) यांना खुलासा मागविण्याऱ्या पत्राची प्रत उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येईल.

(२) संबंधितांना खुलासा सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात येईल.

(३) १५ दिवसांत खुलासा प्राप्त न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे (Principle of natural justice) ७ दिवसात खुलासा सादर करण्याबाबत स्मरणपत्र पाठविण्यात येईल व त्या नंतरही खुलासा प्राप्त न झाल्यास द्वितीय स्मरणपत्र पाठवून ७ दिवसांत खुलासा प्राप्त न झाल्यास याबाबतची गंभीर दखल घेऊन संबंधितांना विशेषाधिकार भंगाच्या सूचनेसंबंधी काहीही म्हणावयाचे नाही असे गृहित धरुन पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

## १२. विधानपरिषद विशेषाधिकार समिती

**पूर्वोतिहास -** विशेष हक्क समिती प्रथम तत्कालीन मुंबई राज्यात दिनांक ३० मार्च, १९५३ रोजी स्थापन करण्यात आली. त्यावेळी ह्या समितीचे समिती प्रमुख श्री. के. के. शहा हे होते. लोकसभेत ही समिती प्रथम दिनांक १ एप्रिल, १९५० रोजी स्थापन करण्यात आली.

**(१) समितीची रचना -** विधानपरिषद नियमातील नियम २४५ अन्वये सभापती विधानपरिषदेच्या अधिवेशनाच्या सुरुवातीस अकरा सदस्यांहून अधिक नाहीत इतक्या सदस्यांची विशेष हक्क समिती नामनिर्देशित करतात.

समिती सदस्य, नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतात.

**(२) समितीचे कार्य -** समिती तिच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रश्नाची तपासणी केल्यानंतर नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधित व्यक्तीस आपले मुद्दे स्पष्ट करण्याची संधी दिल्यावर प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या संदर्भात त्यात विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा कसे आणि होत असल्यास विशेषाधिकाराच्या भंगाचे स्वरुप व तो होण्यास कारणीभूत झालेली परिस्थिती ठरविते आणि त्याविषयी आपल्या शिफारशींसह अहवाल सादर करते.

विशेषाधिकार समितीपुढे प्रकरण चौकशीसाठी आल्यावर अशा चौकशीसाठी साक्षीदारांस बोलावता येते किंवा त्यांना समितीच्या उपयोगासाठी आवश्यक ते कागदपत्र हजर करावे लागतात.

समितीपुढे सादर करण्यात आलेल्या संबंधित कागदपत्रांचा अभ्यास करुन त्यात सकृतदर्शनी हक्कभंग झाला नसल्याचे समितीचे मत झाले असेल तर त्यानुसार समिती सभागृहास कळवते.

अशा प्रकरणी सकृतदर्शनी हक्कभंग झाल्याचे आढळल्यास व या संदर्भात अधिक चौकशीची आवश्यकता आहे असे समितीचे मत झाले तर समिती ज्या व्यक्तीविरुध्द हक्कभंगाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला असेल त्याला कारणे दाखवा नोटीस पाठवून लेखी निवेदन मागवू शकते. अशा प्रकारे संबंधितांकडून लेखी निवेदन प्राप्त झाल्यानंतर त्यावर विचारविनिमय करुन समिती प्रकरणाबाबत विचारार्थ मुद्दे निश्चित करते. आवश्यक तेव्हा साक्षीपुराव्यासाठी संबंधितांना बोलावले जाते. साक्ष झाल्यावर किंवा पुराव्याचे कागदपत्र बघितल्यानंतर आणि विचारविमर्श पूर्ण झाल्यावर समिती प्रत्येक मुद्यांवर निष्कर्ष काढते. त्यानंतर अंतिम अहवाल तयार करुन त्यास समिती प्रमुखांची मान्यता घेऊन सभागृहात चर्चेसाठी ठेवला जातो. त्यानंतर सभागृहाने अहवालावर घेतलेल्या निर्णयानुसार आवश्यक ठरणारी पुढील कारवाई केली जाते.

समिती एखाद्या प्रकरणी विशेष हक्कभंग झाला असल्याच्या निष्कर्षाप्रत आल्यास दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तींना देण्यात यावयाच्या शिक्षेची शिफारस अहवालाव्दारे करते. सर्वसाधारणपणे शिक्षांचे स्वरूप खालीलप्रमाणे असते :-

(अ) सभागृहाची नापसंती दोषी व्यक्तीस कळविणे.

(ब) दोषी व्यक्तीस सभागृहासमोर आणून समज देणे.

(क) दोषी व्यक्तीस कारावासाची शिक्षा देणे.

(ड) वृत्तपत्रांबाबत -जाहीर दिलगिरी प्रदर्शित करणे/वार्ताहर गॅलरी पास रद्द करणे.

दोषी व्यक्तींनी क्षमायाचना केल्यास शिक्षेची शिफारस करण्यात येऊनही सभागृह त्याप्रकरणी सुनावलेली शिक्षा मोठया मनाने माफ करते अथवा कमी करते.

## १३. विधानसभा विशेषाधिकार समिती

**पूर्वोतिहास -** विशेषाधिकार समिती प्रथम तत्कालीन मुंबई राज्यात दिनांक ३० मार्च, १९५३ रोजी स्थापन करण्यात आली. त्यावेळी ह्या समितीचे समिती प्रमुख श्री. के. के. शहा हे होते. लोकसभेत ही समिती प्रथम दिनांक १ एप्रिल, १९५० रोजी स्थापन करण्यात आली.

**(१) समितीची रचना -** विधानसभा अध्यक्ष विधानसभेच्या अधिवेशनाच्या सुरुवातीस पंधरा सदस्यांहून अधिक नाहीत इतक्या सदस्यांची विशेषाधिकार समिती नामनिर्देशित करतात.

समिती सदस्य, नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतात.

**(२) समितीचे कार्य -** समिती तिच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रश्नाची तपासणी केल्यानंतर नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधित व्यक्तीस आपले मुद्दे स्पष्ट करण्याची संधी दिल्यावर प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या संदर्भात त्यात विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा कसे आणि होत असल्यास विशेषाधिकाराच्या भंगाचे स्वरुप व तो होण्यास कारणीभूत झालेली परिस्थिती ठरविते आणि त्याविषयी आपल्या शिफारशींसह अहवाल सादर करते.

विशेषाधिकार समितीपुढे प्रकरण चौकशीसाठी आल्यावर अशा चौकशीसाठी साक्षीदारांस बोलावता येते किंवा त्यांना समितीच्या उपयोगासाठी आवश्यक ते कागदपत्र हजर करावे लागतात.

समितीपुढे सादर करण्यात आलेल्या संबंधित कागदपत्रांचा अभ्यास करुन त्यात सकृतदर्शनी हक्कभंग झाला नसल्याचे समितीचे मत झाले असेल तर त्यानुसार समिती सभागृहास कळवते.

अशा प्रकरणी सकृतदर्शनी हक्कभंग झाल्याचे आढळल्यास व या संदर्भात अधिक चौकशीची आवश्यकता आहे असे समितीचे मत झाले तर समिती ज्या व्यक्तीविरुध्द हक्कभंगाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला असेल त्याला कारणे दाखवा नोटीस पाठवून

लेखी निवेदन मागवू शकते. अशा प्रकारे संबंधितांकडून लेखी निवेदन प्राप्त झाल्यानंतर त्यावर विचारविनिमय करुन समिती प्रकरणाबाबत विचारार्थ मुद्दे निश्चित करते. आवश्यक तेव्हा साक्षीपुराव्यासाठी संबंधितांना बोलावले जाते. साक्ष झाल्यावर किंवा पुराव्याचे कागदपत्र बघितल्यानंतर आणि विचारविमर्श पूर्ण झाल्यावर समिती प्रत्येक मुद्यांवर निष्कर्ष काढते. त्यानंतर अंतिम अहवाल तयार करुन त्यास समिती प्रमुखांची मान्यता घेऊन सभागृहात चर्चेसाठी ठेवला जातो. त्यानंतर सभागृहाने अहवालावर घेतलेल्या निर्णयानुसार आवश्यक ठरणारी पुढील कारवाई केली जाते.

समिती एखाद्या प्रकरणी विशेष हक्कभंग झाला असल्याच्या निष्कर्षाप्रत आल्यास दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तींना देण्यात यावयाच्या शिक्षेची शिफारस अहवालाव्दारे करते. सर्व साधारणपणे शिक्षांचे स्वरुप खालीलप्रमाणे असते :-

(अ) सभागृहाची नापसंती दोषी व्यक्तीस कळविणे.

(ब) दोषी व्यक्तीस सभागृहासमोर आणून समज देणे.

(क) दोषी व्यक्तीस कारावासाची शिक्षा देणे.

(ड) वृत्तपत्रांबाबत -जाहीर दिलगिरी प्रदर्शित करणे/वार्ताहर गॅलरी पास रद्द करणे.

दोषी व्यक्तींनी क्षमायाचना केल्यास शिक्षेची शिफारस करण्यात येऊनही सभागृह त्याप्रकरणी सुनावलेली शिक्षा मोठया मनाने माफ करते अथवा कमी करते.

## १४. विशेषाधिकार भंगाची काही प्रकरणे (विधानपरिषद)

आजतागायत सभागृहाने विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणी शिक्षा सुनावलेली काही प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत

**(१) "श्री. शर्मा" प्रकरण (विधानपरिषद - १९६९)** -दिनांक १६ जुलै १९६८ रोजी सर्वश्री एन. डब्ल्यू. लिमये, आर. पी. समर्थ, बी. व्ही. शेंडे, एम.एन. अंजिकर, एच. एस. बारमुख आणि पी. बी. मोरे. वि.प.स. यांनी श्री. आर. के. शर्मा, वि.प.स. हे दिनांक १३ जुलै, १९६८ रोजी नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी उपस्थित राहण्यास तेथे गेले असताना त्यांच्यावर जो हल्ला करण्यात आला त्या हल्ल्याचे नेतृत्व करणाऱ्या दोन प्राध्यापकांविरुध्द आणि नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या ज्या पाच विद्यार्थ्यांनी सदर हल्ल्यामध्ये भाग घेतला त्यांच्याविरुध्द विधानपरिषदेच्या विशेष हक्कभंगाचा व अवमानाचा प्रश्न उपस्थित करण्याची सूचना दिली. सदस्यांनी आपल्या सूचनेत असे आरोपित केले की, दिनांक २२ मार्च, १९६८ रोजी विधानपरिषदेच्या चर्चेमध्ये भाग घेताना श्री. शर्मा यांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याविरुध्द केलेल्या भाषणामुळेच त्यांच्यावर हल्ला केला होता.

हे प्रकरण सकृत दर्शनी विधानपरिषदेचा हक्कभंग व अवमान करणारे असल्याचे आढळून आल्याने मा. सभापतींनी हा प्रश्न उपस्थित करण्यास अनुमती दिली व त्यानुसार दिनांक १९ मार्च, १९६८ रोजी विशेष हक्कभंगाच्या सूचनेवर स्वाक्षरी करणाऱ्यापैकी एक विधानपरिषद सदस्य श्री.एन.डब्यू लिमये यांनी हा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केला होता. सभागृहाने अनुमती दिल्यानंतर मा. सभापतींनी हे प्रकरण त्यांची तपासणीकरून त्यावर अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे सुपूर्द केले.

समिती समोर बाब तपासणीसाठी प्रलंबित असतानाच प्राध्यपकांनी व विद्यार्थ्यांनी लेखी क्षमायाचना सादर केली.

क्षमायाचना मागितली आहे हे लक्षात घेता या प्रकरणाचा अधिक काळ पाठपुरावा करण्याची आवश्यकता नाही असा निष्कर्ष समितीने आपल्या अहवालामध्ये काढला. म्हणून

समितीने सभागृहास अशी शिफारस केली की, या प्रकरणात आणखी कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये.

दिनांक २२ ऑगस्ट १९६९ रोजी मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावावरुन हा अहवाल सभागृहाने स्वीकृत केला.

**(२) "डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया" प्रकरण (विधानपरिषद - १९६९) -** डॉ. व्ही. आर. पंडित, विधानपरिषद सदस्य यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडियाच्या पुणे शाखेने पाठविलेल्या ज्ञापनातून उद्‌भवणाऱ्या विशेष हक्कभंगासंबंधीचा प्रश्न उपस्थित करण्याची आपली इच्छा असल्याची सूचना दिनांक १ ऑगस्ट १९६९ रोजी मा. सभापतीना दिली. या सूचनेसोबत सदस्यांनी, विधानपरिषदेत दिनांक २७ जून १९६९ रोजी उत्तरीत झालेल्या श्री. ज. ग. भावे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३९११ ची एक प्रत पाठविली होती. या प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे होती.

डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडियाच्या पुणे शाखेद्वारे महात्मा ज्योतीराव फुले माध्यमिक शाळा नावाची माध्यमिक शाळा. ८९६, नाना पेठ, पुणे येथे चालविण्यात येते. मार्च १९६९ मध्ये सदर संस्थेने माध्यमिक शाळेच्या शिक्षकांकडून प्रतिज्ञापत्रे भरून घेतली त्यात इतर गोष्टीबरोबरच शाळेच्या साधन संपत्तीत वाढ करण्याकरिता ठेवी आणि देणग्या मिळवून देण्याची जबाबदारी पत्करण्याचा अंतर्भाव होता.

श्री. ज. ग. भावे. वि.प.स. यांनी दिनांक २७ जून १९६९ रोजी सदरहू प्रतिज्ञापत्रासंबंधी एक तारांकित प्रश्न विचारला होता सदर प्रश्नाला शासनाने दिलेल्या उत्तरामध्ये सभागृहाला अशी माहिती देण्यात आली की, प्रतिज्ञापत्रान्वये पगारातून देणगीच्या रुपाने पैसे कापून घेऊ नये अशी सक्त ताकीद संस्थेला देण्यात आलेली होती.

त्यानंतर संस्थेने तिच्या हितचिंतकांची एक बैठक घेतली आणि श्री. भावे, वि.प,स. यांनी मांडलेल्या विधानपरिषद प्रश्नाविरूध्द तीव्र निषेध व्यक्त करून प्रश्न विचारण्याच्या

त्यांच्या कृतीबद्दल त्याना दूषण दिले होते. त्यानंतर संस्थेने बैठकीचे कार्यवृत्त समाविष्ट असणारे आणि श्री. भावे यांच्या उपरोक्त कृतीबद्दल तीव्र खेद व्यक्त करणारे एक परिपत्रक-ज्ञापन निर्गमित केले. या ज्ञापनाद्वारे संस्थेने शिक्षण प्रेमी लोकांना सदर संस्थेला भेट देऊन तेथील वातावरण पाहण्यासाठी आणि सूचना करण्याकरिता निमंत्रित केले आणि भेट देणाऱ्या शिक्षणप्रेमी लोकांच्या सूचना मन:पुर्वक कार्यान्वित केल्या जातील असे आश्वासन दिले. या संदर्भात डॉ. व्ही. आर. पंडित यानी श्री. जी. बी. शिंदे (संस्थेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष) आणि इतर १५ जणांच्या सहीचे आणि त्या संस्थेचा शिक्का असलेले एक चक्रमुद्रित केलेले असे पत्रक विधानपरिषद सभागृहाजवळ असलेल्या त्यांच्या टपालखणात आढळून आले असल्याचे आरोपित केले आणि त्यानंतर त्यांनी तत्परतेने विशेष हक्कभंगाची सूचना दिली.

डॉ. पंडित यांच्या म्हणण्यानुसार उपरोक्त ज्ञापनामुळे सन्माननीय सदस्यांचा आणि सभागृहाचा विशेष हक्कभंग खालील कारणांमुळे झाला असल्याचे आपल्या सूचनेत नमूद केले होते.

(१) या ज्ञापनात श्री. ज. ग. भावे यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत त्यांचेवर हेत्वारोप करण्यात येऊन त्यांचा निषेध करण्यात आलेला आहे.

(२) या प्रश्नाविषयी वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्याबाबत देखील सदस्यांना (श्री. ज. ग. भावे) जबाबदार धरले होते.

(३) सदर ज्ञापन जनतेस उद्देशून प्रचारार्थ व प्रसारार्थ काढलेले होते.

सभागृहाने ही सूचना त्याच दिवशी विचारार्थ घेतली आणि सभागृहाच्या अनुमतीने विशेष हक्कभंगासंबंधीचा प्रश्न परीक्षण करण्यासाठी आणि त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे पाठविला.

समितीने उपरोक्त संस्थेचे प्रमुख कार्यवाह आणि खजिनदार यांचेकडून खुलासा मागविला. त्यांनी जवळ जवळ एक सारखाच खुलासा सादर करुन त्यात त्यांनी असे नमूद केले होते की, विधानपरिषदेत प्रश्न विचारण्याच्या सदस्यांच्या हक्काबाबत कोणताही

आक्षेप घेतलेला नाही किंवा त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा हेत्वारोपही केलेला नाही. श्री. भावे, वि.प.स. यांचा निषेध करण्याची कल्पना देखील त्यांच्या मनात नव्हती किंवा त्यांचा अनादर करण्याचा उद्देश देखील नव्हता. शेवटी त्यांनी असे नमूद केले की, या प्रकरणी श्री. भावे किंवा इतर कोणत्याही सदस्यांच्या मनात गैरसमज निर्माण झाला असल्यास त्याबद्दल ते मन:पूर्वक खेद व्यक्त करीत आहेत.

या संपूर्ण प्रकरणाचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर समितीचे असे मत झाले की, सभागृहाने आपल्या प्रतिष्ठेचा अधिक विचार करुन या प्रकरणी पुढे कोणतीही कारवाई न करण्याचा निर्णय घ्यावा असेच हे प्रकरण होते. समितीने त्यानुसार शिफारस केली.

उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार सभागृहाने दिनांक १८ डिसेंबर,१९६९ रोजी अहवाल स्वीकारला.

**(३) "श्री. एन. डी. पाटील "प्रकरण (विधानपरिषद - १९७३) -** विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य सर्वश्री उत्तमराव पाटील, विठ्ठलराव हांडे व दत्ता ताम्हाणे यांनी दिनांक १९ ऑक्टोबर १९७२ रोजी सन्माननीय सदस्य श्री. एन.डी.पाटील यांना झालेल्या अटकेच्या वेळेबाबत ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी विधानपरिषदेच्या सभापतींना चुकीची माहिती दिली होती त्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द दिनांक २१ नोव्हेंबर १९७२ रोजी विशेष हक्कभंगाचा प्रश्न उपस्थित केला.

हे प्रकरण सभागृहात उपस्थित करण्यास अनुमती देण्यात आली होती. सभागृहाने यावर चर्चा केल्यानंतर हे प्रकरण परीक्षणासाठी आणि त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे पाठविण्यात आले.

समितीने आपला अहवाल दिनांक २७ मार्च १९७३ रोजी सभागृहाला सादर केला. समितीने या प्रकरणी विशेष हक्कभंग झाल्याचा निष्कर्ष काढला परंतु संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी उक्त प्रकरणी खेद आणि दिलगिरी व्यक्त केल्याचे लक्षात घेऊन हे प्रकरण संपविण्यात यावे अशी समितीने शिफारस केली.

दिनांक ३० मार्च १९७३ रोजी मा. मुख्य मंत्र्यांनी सभागृहात प्रस्ताव मांडल्यानंतर उपरोक्त अहवाल सभागृहाने एकमताने स्वीकृत केला.

(४) **"लोकमत" प्रकरण (विधानसभा/विधानपरिषद-१९७४-१९७५) -** "प्रशस्ती" या मराठी साप्ताहिकाच्या संपादकांना विधानसभेचा विशेष हक्कभंग व अवमान केल्याबद्दल दोषी ठरविण्यात आल्यामुळे त्यांना दिनांक १६ नोव्हेंबर, १९७३ रोजी विधानसभेने संमत केलेल्या ठरावान्वये ३० दिवसांच्या तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली. दिनांक १८ नोव्हेंबर १९७३ रोजी नागपूर येथील "लोकमत" या मराठी दैनिकात "महाराष्ट्र विधानसभेचे अप्रशस्त वर्तन" या शीर्षकाखाली एक अग्रलेख प्रसिध्द झाला. या लेखात सदर संपादकांना तुरुंगवासाची शिक्षा देण्याचा निर्णय विधानसभेत ज्या पध्दतीने घेण्यात आला होता त्यावर टिका करण्यात आली होती. सदस्यांनी अध्यक्षांच्या अनुमतीने, उपरिनिर्दिष्ट अग्रलेखाच्या प्रसिध्दीमुळे उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाचा प्रश्न दिनांक २२ नोव्हेंबर १९७३ रोजी सभागृहात उपस्थित केला. सभागृहाने अनुमती दिल्यानंतर मा. अध्यक्षांनी हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे सोपविले. तसे करताना मा. अध्यक्षांनी सभागृहाला असे सांगितले की, "लोकमत" चे मुख्य संपादक हे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य होते व म्हणून अशा प्रकरणी अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने, सभासद या नात्याने या बाबींशी त्यांचा जितपत संबंध आहे तितपत हे प्रकरण विचारार्थ विधानपरिषदेच्या सभापतींकडे पाठवावे लागेल. कारण या ठरावामध्ये इतर गोष्टींबरोबरच अशी तरतूद आहे की, एका सभागृहाचा सदस्य दुसऱ्या सभागृहाच्या अभिकथित विशेष हक्कभंग प्रकरणी गोवला गेला असल्यास, त्या सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्यांकडे पाठवतील आणि ते पीठासीन अधिकारी, त्या प्रकरणावर जणू काही त्या सभागृहाच्या विशेष हक्कभंगाचेचे प्रकरण असल्याप्रमाणे कार्यवाही करतील व ज्या पीठासीन अधिकाऱ्यांकडून ते प्रकरण प्राप्त झाले असेल त्यांना चौकशीबाबतचा अहवाल व त्या प्रकरणी केलेली कारवाई कळवतील.

वरील ठरावानुसार आणि विधानसभेकडून हे प्रकरण प्राप्त झाल्यानुसार विधानपरिषदेच्या मा. सभापतींनी, लोकमतचे मुख्य संपादक, जे विधानपरिषद सदस्य होते ,त्यांचा या प्रकरणी जितपत संबंध येतो तितपत याप्रकरणी विचार करण्याकरिता हे प्रकरण विधानपरिषदेच्या विशेष हक्क समितीकडे पाठविले.

दोन्ही सभागृहांच्या संबंधित पीठासीन अधिकाऱ्यांनी असे निदेश दिले की, याप्रकरणातील वस्तुस्थिती व कायदेविषयक बाबीसंबंधीच्या समान मुद्यासंबंधी समान कारणे तयार करावी लागतील. विधानसभा व विधानपरिषदेच्या दोन्ही विशेष हक्क समित्यांची एकत्र बैठक घ्यावी व तयार केलेल्या मुद्यांची व समित्यांसमोर उपस्थित असलेल्या साक्षीदारांची तपासणी करावी, मात्र या समित्यांनी आपले स्वतंत्र अहवाल संबंधित सभागृहांना सादर करावेत.

विधानसभा विशेष हक्क समितीने आपल्या अहवालात असा निष्कर्ष काढला की, सदर दैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक यांनी सभागृहांचा विशेषाधिकार भंग व अवमान केला आहे म्हणून समितीने अशी शिफारस केली की, त्यांना विधानसभेसमोर बोलावून समज देण्यात यावी. मात्र मुद्रक व प्रकाशक यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये.

मा. मुख्य मंत्र्यांनी दिनांक २० डिसेंबर १९७४ रोजी सदर अहवाल स्वीकृत करण्यासंबंधीचा प्रस्ताव सभागृहात मांडला. सुधारणेसह सदर प्रस्ताव संमत झाला, त्यानुसार संपादकाने सदर अग्रलेखामुळे विशेष हक्कभंग व सभागृहाचा अवमान केल्याबद्दल सभागृहाने त्यास दोषी ठरविले, तसेच त्यांच्या वर्तनाबद्दल नापसंती व सदर प्रकाशनाबद्दल नाराजी व्यक्त केली व अशी शिफारस केली की, मुद्रक व प्रकाशक यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये.

विधानपरिषद विशेष हक्क समितीने आपल्या अहवालात असा निष्कर्ष काढला की, मुख्य संपादकांनी सभागृहाचा विशेषाधिकार भंग व अवमान केला आहे व अशी शिफारस केली की, विधानपरिषदेची नापसंती त्यांना कळविण्यात यावी व सभागृहासमोर त्यांना बोलवून समज देण्यात यावी.

दिनांक ९ ऑगस्ट १९७५ रोजी संसदीय कार्य मंत्री यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार विधानपरिषदेने एकमताने असा ठराव केला की, मुख्य संपादक श्री. दर्डा हे महाराष्ट्र विधानसभेच्या विशषाधिकार भंग व अवमान केल्याबद्दल दोषी होते, म्हणून विधानपरिषदेने त्यांच्या वर्तनाबद्दल नापसंती व सदर अग्रलेखाच्या प्रकाशनाबद्दल नाराजी व्यक्त केली.

**(५) "सन १९८२ ची स्पेशल केस क्र.२४" प्रकरण (विधानपरिषद-१९८६) -** मा.सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक २ एप्रिल, १९८५ रोजी रामदास श्रीनिवास नायक विरुध्द अब्दुल रेहमान अंतुले (सन १९८२ ची स्पेशल केस क्र.२४) या प्रकरणाच्या संदर्भात दिनांक ७ फेब्रुवारी, १९८५ रोजी मुंबई येथील उच्च न्यायालयामध्ये तीन दस्तऐवज सादर करण्याच्या बाबतीत "सचिव महाराष्ट्र सचिवालय, विधान भवन, मुंबई" यांच्या नावे पाठविलेल्या आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या शिरस्तेदारांच्या वतीने स्वाक्षरी केलेल्या एका विनंतीपत्रामधून उद्भवणारे एक प्रकरण विशेषहक्क समितीकडे सोपविले. हे पत्र दिनांक ७ फेब्रुवारी, १९८५ रोजीच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामध्ये प्राप्त झाले होते असे आढळून आले. हे पत्र मा.सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या पुढे ठेवल्यानंतर त्यांनी प्रश्नाधीन दस्तऐवजांचे परीक्षण केले आणि या प्रकरणाच्या संबंधित बाबींचा सर्वांगीण विचार केल्यानंतर संदर्भाधीन तीन दस्तऐवजांपैकी दोन दस्तऐवज महाराष्ट्र विधानपरिषदेशी संबंधित असल्यामुळे त्यासंबंधीची माहिती सभागृहाला पुढील बैठकीच्या वेळी द्यावी आणि हे प्रकरण विशेषहक्क समितीकडे सुपूर्द करावे असे त्यांना वाटले.

समितीकडे प्रकरण विचारार्थ आल्यानंतर विधानमंडळ सचिवालयाने समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, प्रश्नाधीन दस्तऐवज तत्संबंधी इतर काही कागदपत्रे तत्कालीन सभापती (श्री. रा. सू. गवई) आणि तत्कालीन अध्यक्ष (श्री.शरद दिघे) यांच्या व्यक्तिगत ताब्यात संयुक्तपणे होती आणि ती तत्कालीन सभापती आपल्या पदावरुन मुक्त झाल्यानंतर म्हणजे दिनांक २४ डिसेंबर, १९८३ रोजी या सचिवालयाकडे प्रथमच सुपूर्द करण्यात आली होती, समितीने संबंधित कागदपत्रांची पाहणी करुन विधानमंडळ आणि विधानमंडळ सचिवालय यांच्याशी संबंधित दस्तऐवज न्यायालयात सादर करण्याच्या बाबतीत सर्वसामान्यपणे जे निकष लावले जातात त्या अनुषंगाने त्यावर विचार केला, तेव्हा समितीला असे वाटले की, उच्च न्यायालयाने विधानमंडळ सचिवालयाकडे दस्तऐवज सादर करण्यासाठी विनंती करताना तसे करण्यामागील हेतू व आवश्यकता अधिक

सुस्पष्टपणे नमूद करण्याची गरज आहे, समितीच्या असेही निदर्शनास आले की, उच्च न्यायालयाच्या पत्रातील अनुक्रमांक १ मध्ये नमूद केलेला दस्ताऐवज म्हणजे "अन्न व नागरी पुरवठा" विभागाकडून आपणास प्राप्त झालेल्या व ज्यावर श्री.व्ही.टी.चारी, सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक ११ डिसेंबर, १९८१ चे शेरे नमूद करण्यात आले होते. त्या ९ फाईलीची पावती होती, समितीच्या निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे संदर्भाधीन कोणतीही फाईल सचिव, विधानमंडळ सचिवालय यांच्याकडे प्राप्त झालेली नसल्याने तसेच श्री. व्ही. टी. चारी यांनी देखील कोणतेही शेरे नमूद केल्याचे दिसून न आल्याने सदर दस्तऐवजांची ओळख अधिक ठामपणे सिध्द होण्याच्या दृष्टीने या मुद्यांवर देखील उच्च न्यायालयाकडून स्पष्टीकरण मागण्याचा समितीने निर्णय घेतला. त्याप्रमाणे दिनांक ११ जून, १९८५ रोजी उच्च न्यायालयाला एक पत्र पाठविण्यात आले. दोन स्मरणपत्रे (दिनांक १४ ऑगस्ट, १९८५ व दिनांक १८ डिसेंबर, १९८५) पाठवून देखील उच्च न्यायालयाने कोणतेही उत्तर पाठविले नाही. साहजिकच समितीला आपला अहवाल सादर करण्याची मुदत मिळावी म्हणून सभागृहाला वारंवार विनंती करण्याची पाळी आली.

न्यायालयाकडून या बाबतीत कोणतेही उत्तर न आल्याने तसेच उच्च न्यायालयाकडून लवकर उत्तर मिळण्याची कोणत्याही प्रकारे आशा दिसून न आल्याने अधिक काळजीपूर्वक विचारांनी समिती या निष्कर्षाप्रत आली की, या प्रकरणी सभागृहास अहवाल सादर करण्याच्या बाबतीत कालमर्यादा वाढवून देण्याकरीता प्रत्येक वेळी सभागृहास विनंती करण्याऐवजी तूर्तास तरी हे प्रकरण संपविण्यात यावे.

समितीने आपल्या अहवालात आणखी अशीही शिफारस केली की, भविष्यकाळामध्ये उच्च न्यायालयाने याबाबत फेरविनंती करुन आवश्यक ते स्पष्टीकरण या सचिवालयास दिल्यास तसेच सभागृहाने हे प्रकरण समितीकडे सोपविल्यास या प्रकरणाला पुन्हा चालना देऊन त्यावर फेरविचार करता येईल.

दिनांक २८ जुलै, १९८६ रोजी अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आणि तो दिनांक ३१ जुलै, १९८६ रोजी सभागृहात स्वीकृत केला.

**(६) " रेल्वे प्रकरण " (विधानपरिषद १९८७-१९८८) -** दिनांक ९ डिसेंबर १९८६ रोजी श्री.दे.मा.कराळे, विधान परिषद सदस्य व त्यावेळचे विरोधी पक्षनेते, यांनी मध्य

रेल्वेचे कर्मचारी व इतर यांचेकडून आमदारांना देण्यात आलेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे उद्‌भवलेल्या प्रकरणांसंबंधात विशेष हक्कभगांचा प्रश्न उपस्थित करण्याची त्यांची इच्छा दर्शविणारी सूचना दिली, त्यात त्यांनी म्हटले की, सभागृहाची बैठक संपल्यानंतर, आपल्या मतदार संघात जाण्यासाठी नागपूर रेल्वे स्थानकांवर ते आले असता त्यांनी सर्वस्वी आमदारांसाठीच राखून ठेवलेल्या क्र.८११३ या खास बोगीमध्ये त्यांना आरक्षण देण्यात यावे अशी विनंती गाडीचे कंडक्टर श्री.बी.एस.वर्मा यांना केली. तथापि, त्यांच्या आरक्षित शायिका सदस्यांना देण्याऐवजी श्री.वर्मा यांनी आमदारांसाठी राखून ठेवलेल्या बोगीमध्ये नागपूर येथील विभागीय वाणिज्यिक अधिक्षक ह्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नातेवाईक व सेवक मिळून एकूण २७ व्यक्तींना अनधिकृतपणे बसण्याची परवानगी दिली. सदर व्यक्तींनी आमदारांना शिवीगाळ केली व त्यांना धक्काबुक्की केली आणि त्यांना अपमानास्पद वागणूक देऊन आमदारांच्याबद्दल लोकांच्या मनात गैरसमज निर्माण केला व याद्वारे त्यांनी आमदारांच्या विशेषाधिकाराचा भंग व सभागृहाचा अवमान केला असल्याचे सूचनेत आरोपित करण्यात आले.

दिनांक १० डिसेंबर १९८६ रोजी सभागृहाने अनुमती दिल्यावर मा. सभापतींनी ही बाब त्याची तपासणी करुन त्यावर अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे सोपविली.

समितीने संपूर्ण प्रकरणाची चौकशी केल्यानंतर दिनांक १८ नोव्हेंबर १९८७ रोजी सभागृहाला सादर केलेल्या आपल्या अहवालात असे निष्कर्ष काढले की, महिला प्रवासी, श्रीमती झिगर, श्रीमती ग्रोव्हर आणि श्रीमती पराशर (२) श्री. फत्तेपुरिया आणि (३) रेल्वे कर्मचारी सर्वश्री खैरकर, देसराज, तिरपुडे व वर्मा यांनी सदस्यांचा विशेषाधिकार भंग व सभागृहाचा अवमान केला आहे व श्री. गावंडे हे सभागृहाचा विशेषाधिकार भंग किंवा अवमान केल्याबद्दल दोषी असल्याचे समितीस आढळत नाही म्हणून,---

(१) महिला प्रवासी श्रीमती झिगर, ग्रोव्हर व पराशर यांचे वर्तन पराकोटीचे आक्षेपार्ह असले तरी त्यांना शिक्षा देण्याइतपत समितीला मनाचा कोतेपणा दाखवायचा नाही. या महिलांनी समितीपुढे बिनशर्त माफी मागितली ही बाब विचारात घेऊन आणि या सर्व प्रकरणांतून त्यांनी पुरेसा धडा घेतला असेल अशी आशा बाळगून समिती स्वत:ची अंगभूत प्रतिष्ठा ध्यानात घेता, संबंधित महिलांना कोणत्याही शिक्षेची शिफारस न करता हे प्रकरण येथेच संपवू इच्छिते.

(२) श्री. फत्तेपुरीया यांना ३० दिवसांची सक्त मजुरीची शिक्षा द्यावी व ही शिक्षा त्यांनी यथास्थिती एका किंवा अधिक अधिवेशनकाळात भोगावी, ही शिक्षा भोगताना श्री. फत्तेपुरीया अशाच गुन्ह्यांच्या बाबतीत दुसऱ्या कोणत्याही प्राधिकृत संस्थेने दिलेल्या शिक्षेबरोबर ही शिक्षा जोडण्यात येऊ नये.

(३) श्री. खैरकर व श्री.देसराज या रेल्वे अधिकाऱ्यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून त्यांना समज द्यावी व ज्या दिवशी त्यांना समज देण्यात आली त्या दिवशी सभागृहाची बैठक संपेपर्यंत त्यांना ताब्यात घ्यावे.

(४) श्री. वर्मा व श्री. तिरपुडे यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून समज द्यावी अशा प्रकारच्या शिफारशी समितीने आपल्या अहवालात केल्या.

समितीच्या या प्रकरणातील अहवाल विचारात घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.समिती प्रमुखांनी दिनांक २६ जुलै, १९८८ रोजी सभागृहात मांडला. त्यानुसार अहवाल विचारात घेण्यात आला व तद्नुषंगाने अहवालातील निष्कर्षांशी सहमती दर्शवून तथापि, त्यातील शिफारशींमध्ये श्री. विनोद फत्तेपुरिया यांना सात दिवसांच्या कारावासाची शिक्षा तर, श्री.देस राज, तत्कालीन वरिष्ठ विभागीय लेखाधिकारी, श्री.एस.आर.तिरपुडे, मुख्य आरक्षण निरीक्षक व श्री. बी. एस. वर्मा, कंडक्टर या मध्य रेल्वेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून समज देण्याची, शिक्षा देण्याची सुधारणा सुचविणारा मा. मुख्य मंत्र्यांनी सभागृहात मांडलेला प्रस्ताव सभागृहाने एकमताने संमत केला.

त्याचप्रमाणे, अशा प्रकारचे प्रसंग भविष्यात उद्भवू नयेत या दृष्टीने काळजी घेण्याकरीता समितीने सदर अहवालात रेल्वे प्रशासनास आणखी काही इतर शिफारशी सुचविल्या. त्या पुढीलप्रमाणे ----

## इतर शिफारशी

समितीने तपासणीसाठी मागविलेल्या कागदपत्रांची, उदा. जादा कोचमधील आरक्षणाची स्थिती दाखविणारा तक्ता व दिनांक ५ डिसेंबर १९७६ रोजी नागपूर येथून मुंबईकडे गेलेल्या गाडयांवरील प्रथम वर्गाच्या आरक्षणाचा तक्ता, तपासणी करताना

विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना रेल्वे कर्मचाऱ्यांद्वारा सांगण्यात आले की, इमर्जन्सी कोटा, डी. सी. एस. कोटा, व्ही. आय. पी. कोटा, स्टेशन कोटा इ. विविध प्रकारच्या कोटयातून आरक्षण देताना वेगवेगळे दंडक (परिशिष्ट-सात) घालण्यात आले आहेत. उक्त महितीवरुन ही गोष्ट स्पष्ट आहे की, इमर्जन्सी कोटा देताना खासदार, स्वातंत्र्य सैनिक, कर्करोगपिडीत, आमदार, विभागीय/झोनल रेल्वे युजर्स संधटनेचे सदस्य, सल्लागार समितीचे सदस्य, शासकीय कर्मचारी अशा क्रमाने प्राथम्य दिले जाते. या दंडकामध्ये वापरलेला "आमदार" हा शब्दप्रयोग व्यापक अर्थाने असून त्यात विधानपरिषद सदस्यांचा अंतर्भाव होतो हे स्पष्ट आहे. तथापि या बाबतीत व्यक्त केल्या जाणाऱ्या शंकेचा विचार हे शब्दप्रयोग अधिक सुस्पष्ट होण्याच्या दृष्टीनै एम,एल,सी. किंवा "विधानमंडळाचे सदस्य" असे शब्दप्रयोग त्या ठिकाणी भरीला घालणे योग्य ठरेल.

केंद्र शासनाने सदस्यांच्या बाबतीत प्राथम्याने वा प्राधान्याने विचार करण्यामागे हे सूत्र अनुस्यूत आहे की, जेणेकरुन सदस्यांना संसद किंवा विधानमंडळ यांचे प्रती आपले कर्तव्य निर्वेधपणे बजाविणे शक्य व्हावे म्हणून अशी अट घालून दंडकांची योग्य ती अंमलबजावणी करण्यामध्ये दुर्लक्ष करणे म्हणजे पर्यायाने त्या सदस्याला त्याचे कर्तव्य बजावणीपासून वंचित करणे होय आणि तसे घडताना, बऱ्याच वेळा, सदस्य अशा परिस्थितीत सापडतात की, ज्यामुळे त्यांची प्रतिमा आणि प्रतिष्ठा यांना बट्टा लागतो आणि त्याचा परिणाम म्हणून सदस्यांशी असे दुरवर्तन करणारे विशेषाधिकार भंगाच्या व सभागृहाच्या अवमानाच्या कक्षेत आल्याशिवाय राहणार नाहीत.

समितीचे असे मत आहे की, भविष्यकाळात ज्या ज्या वेळी सदस्य पुरेसा कालावधी उपलब्ध नसताना एखाद्या गाडीवर आरक्षणासाठी विनंती करतील त्याची ते करीत असलेल्या कामाचे महत्व पाहून त्यांना उच्चतम प्राधान्य देण्यात यावे. याबाबतीत ही गोष्ट आवश्यक आहे की, सदस्यांना आरक्षण देताना अधिक काळजी घ्यावी व त्यांच्याकडे दुर्लक्ष करु नये. त्याकरिता प्रशासनाची मदत घ्यावी.

समितीला याबाबतीत आणखी काही उपाय सुचवावयाचे आहेत :-

(१) ज्यावेळी दुसऱ्या स्थानकावरुन संदेश येतात त्यावेळी विवक्षित प्रवासाकरिता केलेल्या आरक्षणाची तारीख व वेळ काळजीपूर्वक तपासावी.

(२) रेल्वे प्रवासाकरिता देण्यात येणाऱ्या आरक्षणासाठी इमर्जन्सी कोटा, डी.सी.एम.कोटा, स्टेशन कोटा, इ. विविध संवर्गातील दंडकाद्वारा आरक्षण देताना विधानमंडळ सदस्यांना ते प्राधान्य द्यावे व त्यानंतरच आरक्षणाचा तक्ता बनवावा.

(३) रद्द तिकिटाच्या जागी आरक्षण (रिझर्व्हेशन अगेन्स्ट कॅन्सलेशन) देताना विधानमंडळ सदस्यांचे नाव प्रतिक्षा यादीवर कोणत्या क्रमांकावर आहे हे न पाहता आमदारांना प्राधान्य देण्यात यावे.

(४) ज्यावेळी सदस्यांना ऐनवेळी प्रवास करावा लागतो आणि त्यांच्याकडे आरक्षण नसेल तर गाडीवर (ट्रेन सर्व्हिस) मिळणाऱ्या पहिल्या उपलब्ध जागेसाठी सदस्यांचा विचार करण्यात यावा.

समिती अशा ठाम निर्णयाप्रत आलेली आहे की, वर सुचविलेल्या मार्गांचा मागोवा घेऊन व तशी व्यवस्था करुन त्यांचे काटेकोरपणे व जाणीवपूर्वक पालन केल्यास त्याचे इष्ट परिणाम होतील आणि अकारण उद्भवणारे संधर्षाचे प्रसंग टाळण्यास त्यामुळे फारच मदत होईल. समितीपुढे असेही मत आहे की, रेल्वे प्रशासन व विधान मंडळ यांच्या एकमेकांच्या सहकार्याने एखादी संयुक्त सल्लागार समिती नेमल्यास सदस्यांची गैरसोय न होता या बाबतीत समाधानकारक तोडगा काढणे शक्य होईल.

**(७) "श्री. अप्पलवार" प्रकरण (विधनपरिषद १९८८-१९८९) -** दिनांक ९ एप्रिल, १९८७ रोजी श्री.अनंतकुमार पाटील, विधानपरिषद सदस्य यांनी अकोला जिल्हा परिषदेचे त्यावेळचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मो.ब.अप्पलवार यांच्याविरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना दिली. त्यात सदस्यांनी असे म्हटले की, त्यांनी अकोला जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याबद्दल प्रश्न विधानपरिषदेमध्ये उपस्थित केल्यामुळे, अकोला जिल्हा परिषदेचे त्यावेळचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अप्पलवार यांनी स्वत:च आयोजित केलेल्या

भोजन समारंभाच्या वेळी विधानपरिषदेच्या सदस्यांबाबत, ते काही काम नसलेले, नपुंसक आणि बनावट असे सदस्य आहेत असे अवमानजनक भाष्य केले. विधानपरिषद हे बनावट सभागृह असून ते लोकांचे प्रश्न सोडविण्यास असमर्थ आहे, त्यामुळे सदस्यांनी असे आरोपित केले की, श्री.अप्पलवार यांनी विधानपरिषद सदस्यांविषयी अवमानजनक भाष्य करुन सदस्यांचा विशेष हक्कभंग आणि सभागृहाचा अवमान केला आहे.

सभागृहाने अनुमती दिल्यावर मा.सभापतींनी ही बाब त्याची तपासणी करुन त्यावर अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे सोपविली.

समितीने दिनांक २३ डिसेंबर, १९८८ रोजी उक्त प्रकरणी सभागृहाला सादर केलेल्या आपल्या अहवालात असा निष्कर्ष काढला की, समितीला सादर केलेले कागदपत्र आणि तिच्यापुढे नोंदविण्यात आलेला साक्षीपुरावा यावरुन समितीला श्री.अप्पलवार यांच्याविरुध्द प्रकरण साधार असल्याचे दाखविण्याबाबत पुरेसा पुरावा मिळू शकला नाही.

भोजन समारंभाच्या वेळेस विधीमंडळ सदस्यांबाबत कोणतेही अवमानकारक असे भाष्य केल्याचे श्री. अप्पलवार व त्यांनी सादर केलेले साक्षीदार यांनी ठामपणे नाकारले. तसेच सूचना देणारे सदस्य श्री.अनंतकुमार पाटील यांना समितीसमोर साक्ष देण्यासाठी अनेक संधी दिलेल्या असतानासुध्दा त्यांनी त्याचा फायदा घेतला नाही. त्याचप्रमाणे सूचनेवर सही करणाऱ्या सदस्या श्रीमती लतिफा काझी यांनी समितीसमोर साक्ष देण्याचे पसंत केले नाही. यासर्व बाबींवरुन श्री.अप्पलवार यांचेविरुध्द हे प्रकरण प्रस्थापित झाले नाही व तथाकथित अवमानजनक भाष्य केल्याचा आरोप त्यांचेवर ठेवण्याइतका पुरावा समोर आला नाही. त्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेचा विशेष हक्कभंग व अवमान झाल्याचे प्रस्थापित होऊ न शकल्याने सदर प्रकरण येथेचे संपविण्याबाबत समितीने शिफारस केली.

दिनांक २६ एप्रिल, १९८९ रोजी मा.मुख्य मंत्र्यांनी समितीच्या शिफारशीनुसार सदर प्रकरण येथेच संपविण्याविषयी मांडलेल्या प्रस्तावाद्वारे सदरहू अहवाल सभागृहाने एकमताने स्वीकारला.

**(८) "नवशक्ती" प्रकरण (विधानपरिषद - १९८९) -** दिनांक २० जुलै, १९८७ रोजी सर्वश्री अरूण मेहता, माधवराव धायगुडे आणि श्रीमती निर्मला ठोकळ, वि.प.स. यांनी नवशक्ती या मुंबईच्या मराठी दैनिकाच्या दिनांक २० जुलै, १९८७ च्या अंकामध्ये "प्रश्न-चोरीच्या निमित्ताने विधिमंडळाचे रेट" या शीर्षकाखाली प्रसिद्ध केलेल्या लेखामुळे उद्‌भवणाऱ्या विशेष हक्कभंगाचा प्रश्न उपस्थित करावयाची सूचना दिली. सूचनेत सदस्यांनी असे नमूद केले की, विधानमंडळातील कर्मचारी वर्ग आणि अधिकारी यांच्याविरुद्ध ते प्रश्न, ठराव, लक्षवेधी सूचना, अशासकीय विधेयके, स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्यासाठी सदस्यांकडून तसेच प्रश्नांची सूचना ज्यांच्याशी संबंधित आहे त्या पार्टीकडून पैसे घेतात असा भ्रष्टाचाराचा आरोप श्री.प्रकाश गुप्ते यांनी आपल्या लिखाणामध्ये केला होता. म्हणून सदस्यांनी असे आरोपित केले की, आमदारांविरुद्ध अशा प्रकारचे आरोप केल्याने सभागृहाप्रति आापली वैधानिक कर्तव्ये पार पाडण्यापासून ते परावृत्त झाले आणि यामुळे त्यांचा विशेष हक्कभंग झाला. सदस्यांनी आणखी असेही ठाम प्रतिपादन केले की, अशा प्रकारचे आरोप करून असे दर्शविण्यात आले होते की, सदस्यांकडे काम करण्याची क्षमता नव्हती आणि म्हणून त्यांना उपलब्ध असलेली विविध संसदीय आयुधे वापरण्यासाठी ते विधानमंडळ सचिवालयातील कर्मचारी वर्गावर अवलंबून होते. तसेच सूचना मान्य करण्याचा किंवा अमान्य करण्याचा संपूर्ण अधिकार केवळ पीठासीन अधिकाऱ्यास असताना सूचना मान्य किंवा अमान्य करण्यासाठी विधानमंडळातील कर्मचारीवर्गाने हातचलाखी केली असे म्हणणे म्हणजे मा.सभापतींवर ठपका ठेवल्यासारखे होते. म्हणून त्याद्वारे मा.सभापतींचा व सभागृहाचा विशेष हक्कभंग आणि अवमान होतो. म्हणून सदस्यांनी हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे पाठविण्याबाबत यावे अशी विनंती केली.

मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांना सकृतदर्शनी हे विशेष हक्कभंगाचे प्रकरण असल्याबद्दल त्यांचे समाधान झाल्यानंतर या प्रकरणी तपासणी करून त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी हे प्रकरण दिनांक २२ जुलै, १९८७ रोजी विशेष हक्क समितीकडे पाठविले.

समितीने दिनांक २१ एप्रिल, १९८९ रोजी सभागृहाला सादर केलेल्या अहवालामध्ये खालील निष्कर्ष नमूद केले :-

(१) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील कर्मचारी व अधिकारी हे सन्माननीय सभागृहाप्रति आपली कर्तव्ये बजावण्यापासून परावृत्त होतील इतक्या गंभीर स्वरुपाचे आणि निराधार असे भ्रष्टाचाराचे आरोप लिखाणात केलेले आहेत असा निष्कर्ष काढण्यात समितीला कोणताही संदेह वाटत नाही. म्हणून या लिखाणामुळे विशेष हक्कभंग होतो असा निर्णय समिती देत आहे.

(२) पूर्वी निदर्शनास आणल्याप्रमाणे सदर लिखाणामुळे मा.सभापतींच्या चारित्र्यावर व सचोटीवर ठपका येतो आणि यामुळे स्पष्टपणे सभागृहाचा विशेष हक्कभंग व अवमान होतो.

(३) अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्याविरुद्ध केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे सदस्यांच्या चारित्र्यावर आवश्यकपणे ठपका येतो. लेखामध्ये केलेल्या काही विवक्षित आरोपांवरून आपली वैधानिक कर्तव्ये बजावणाऱ्या सदस्यांवर टीका करण्यात आली आहे हे स्पष्टपणे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या टीकेतून जनमानसामध्ये विधानमंडळ सदस्यांची खिल्ली उडविण्याची लेखकाची वृत्ती प्रकट होते. म्हणूनच समितीचे असे मत आहे की, अशा प्रकारच्या टीकेमुळे जनमानसामध्ये सदस्यांची प्रतिमा खालावली आणि त्यामुळे त्यांना सभागृहाप्रति आपली कर्तव्ये बजावण्यापासून परावृत्त करण्यात आले आणि म्हणून याद्वारे सभागृहाचा निश्चितपणे विशेष हक्कभंग आणि अवमान होतो.

दैनिकाचे संपादक, त्याप्रमाणे मुद्रक व प्रकाशक यांनी नि:संदिग्ध शब्दात व्यक्त केलेली दिलगिरी आणि व्यक्त केलेली लेखी क्षमायाचना विचारात घेता समितीने अशी शिफारस केली की, त्यांना सभागृहाची नापसंती कळविण्यापलिकडे त्यांच्याविरुद्ध कोणतीही पुढील कारवाई करण्यात येऊ नये. सदरहू लेखाचे लेखक श्री.प्रकाश गुप्ते यांची समिती पुढील वागणूक व दृष्टिकोन हा असहकार्याचा व उद्दामपणाचा होता म्हणून समितीने त्यांना ३० दिवसांची कारावासाची शिक्षा देण्याची शिफारस केली.

सभागृहाने दिनांक २६ एप्रिल, १९८९ रोजी समितीच्या निष्कर्षाशी सहमती व्यक्त करून सभागृहाने वार्ताहर (श्री. गुप्ते) यांच्या बाबतीत औदार्यपूर्वक असा ठराव केला की, समिती पुढील त्यांच्या उर्मट व अशोभनीय वर्तनास क्षमापित न करता त्यांना सभागृहाची तीव्र नापसंती कळविण्यात यावी. संपादक, मुद्रक आणि प्रकाशक यांच्या विषयी सभागृहाने असा ठराव केला की, त्यांनाही सभागृहाची नापसंती कळविण्यात यावी.

**(९) "सोबत" प्रकरण (विधानपरिषद-१९८९) -** दिनांक १९ डिसेंबर, १९८८ रोजी सर्वश्री वि.ग.हांडे, विरोधी पक्षनेते, विजय सावंत आणि विरेंद्र देशमुख, वि.प.स. यांनी "सोबत" या साप्ताहिकाच्या दिनांक ११ डिसेंबर, १९८८ च्या अंकामध्ये हा कसला महात्मा फुले म्हणवणारीही केवळ दुर्गंधी या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या लेखाचे लेखक डॉ.बाळ गंगाल व "सोबत" चे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री.ग.वा.बेहरे यांच्याविरुद्ध विशेष हक्क भंगाचा प्रश्न उपस्थित करण्याची इच्छा दर्शविणारी सूचना दिली. त्यात सदस्यांनी असे म्हटले की, महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा विधान भवनासमोर उभारावा अशा प्रकारचा सभागृहाने जो निर्णय घेतला होता. त्या निर्णयावर सदर लेखाद्वारे टिका केल्यासारखे होते. म्हणून सदस्यांनी असे आरोपित केले की, लेखकाने सदर लेख लिहून आमदारांच्या निर्णयावरच संदेह व्यक्त केला आणि जनमानसात विधानमंडळाची प्रतिष्ठा कमी केली आणि त्याद्वारे सभागृहाचा विशेष हक्कभंग केलेला आहे.

सभागृहाने एकमताने अनुमती दिल्यावर मा.सभापतींनी दिनांक २० डिसेंबर, १९८८ रोजी हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे तपासणीकरिता व त्यावरचा अहवाल सादर करण्याकरिता पाठविले.

दिनांक २० ऑक्टोबर, १९८९ रोजी सभागृहात सादर केलेल्या आपल्या अहवालात समितीने असे मत व्यक्त केले की, सदर पुतळा त्यासंबंधात एकमताने ठराव संमत केल्यानंतर उभारण्यात आला होता किंवा कसे या तांत्रिक मुद्याशी समितीचा काही संबंध

नाही. परंतु लोकशाहीच्या सभागृहापुढे महात्माचा पुतळा उभारण्याबाबत दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या सारासार विवेक बुद्धीचा समिती गौरव करते. म्हणून समितीच्या मते मुद्दा एवढ्यापुरताच सदस्यांना त्यांचे लक्ष्य बनविले होते काय? या प्रश्नाला डॉ.गांगल समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत म्हणून समिती अशा निष्कर्षाप्रत आली आहे की, लेखकाने विधानमंडळ सदस्यांच्या सारासार विवेक बुद्धीवर न रूचणारा असा हल्ला करण्याचे धारिष्ट्य केले आहे एवढेच नाहीतर रशियन लोकांनी स्टॅलीनच्या बाबत जे केले त्याप्रमाणेच महात्मा फुलेंच्या कार्याचे पुनर्मुल्यांकन करून त्यांचा पुतळा उखडून टाकण्याचा विचार केल्यामुळे सभागृहाचा विशेष हक्कभंग व अवमान झाला आहे, तथापि, डॉ.गांगल यांनी लेखात वापरलेल्या भाषेविषयी खेद व्यक्त केल्यामुळे आणि अशा प्रकारचा लेख लिहिण्याबद्दल विधानमंडळ सदस्य व समितीकडे लेखी स्वरुपात क्षमायाचना केली असल्याने डॉ. गांगल यांच्याबद्दल सभागृहाने तीव्र नापसंती व्यक्त करून हे प्रकरणे संपविल्यास ते न्यायोचित ठरेल अशी समितीने शिफारस केली.

सोबतचे संपादक (श्री.बेहरे) यांचेबाबत समितीला असे आढळून आले की, समितीस लेखी निवेदन सादर करण्यात आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांचे निधन झाले म्हणून समितीने असे नमूद केले की, हा विशेष हक्कभंग एका विशिष्ट व्यक्तीविरुद्ध होता आणि ती व्यक्ती हयात नसल्यामुळे त्यांच्याविरुद्ध विशेष हक्कभंगाचा प्रश्न आता शिल्लक राहात नाही.

या संबंधातील अहवाल सभागृहामध्ये चर्चेकरीता आला नाही.

**(१०) "श्री. रामदास नायक आणि श्री. धरमचंद चोरडिया" प्रकरण (विधानपरिषद - १९९०-१९९१)**

सर्वश्री बी. ए. देसाई, मदन बाफना,दिलीप सोपल, सुनील शिंदे, अनील वऱ्हाडे, रमेश दुबे, एकनाथ गायकवाड आणि सय्यद अहमद, वि.स.स यांनी श्री. रामदास नायक आणि श्री. धरमचंद चोरडिया यांनी दिनांक १९ जून, १९९० रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत

काढलेल्या उद्‌गारांमुळे उद्‌भवणाऱ्या विशेष हक्क भंगाचा प्रश्न उपस्थित करण्याची इच्छा दर्शविणारी सूचना दिनांक २० जून, १९९० रोजी दिली.

सदस्यांनी सदर पत्रकार परिषदेबाबत वृत्तपत्रांत आलेल्या वृत्तांचा संदर्भ देऊन असे प्रतीपादन केले की श्री. रामदास नायक व श्री. धरमचंद चोरडिया यांनी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष, मा. श्री. मधुकरराव चौधरी यांच्याविरुध्द आक्षेपार्ह भाष्य तसेच टिका करुन सभागृहाचा हक्कभंग व अवमान केलेला आहे.

तालिका सभापती यांनी हे प्रकरण तपासणी करुन त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी विशेषाधिकार समितीकडे सुपूर्द केले.

समितीने दिनांक ७ डिसेंबर १९९० रोजी सभागृहास सादर केलेल्या आपल्या अहवालात असा निष्कर्ष काढला की, सन्मान्य दंडाधिकाऱ्यांचा अभिप्राय विचारात घेता कोणतीही समंजस व्यक्ती, मा. अध्यक्ष श्री. मधुकरराव चौधरी यांच्यावर दंडाधिकाऱ्यांनी काही ठपका ठेवला आहे असा निष्कर्ष काढणार नाही. कारण त्या निकालात पदाचा गैरवापर केल्याचा कोणताही आरोप करण्यात आलेला नाही. श्री. मधुकरराव चौधरी ज्या काळात अध्यक्ष पदावर नव्हते किंवा ते सभागृहाचे सदस्यही नव्हते त्या काळातील हे प्रकरण आहे. म्हणून त्या पदाचा गैरवापर करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, माननीय अध्यक्षांची प्रतिमा डागाळण्यासाठी सदर निकालास विपर्यस्त स्वरुप देण्याचा श्री. रामदास नायक आणि श्री. धरमचंद चोरडिया यानी जाणूनबुजून प्रयत्न केला होता आणि परिणामत: मुद्यांची अनावश्यक गल्लत करुन मा. अध्यक्षांच्या उच्च पदावर ठपका ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

म्हणून समितीला श्री. नायक आणि श्री. चोरडिया यांनी मा. अध्यक्ष या पदाचा तसेच महाराष्ट्र विधानसभेचा विशेषाधिकार भंग आणि अवमान केला आहे असे वाटले आणि त्याबद्दल समितीने श्री. रामदास नायक आणि श्री. धरमचंद चोरडिया यांना दिवाणी तुरुंगात चौदा दिवसांची कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस केली.

त्यानंतर श्री. रामदास नायक यांनी विशेष हक्क समितीच्या सर्व सदस्यांना पाठविलेल्या पत्रात वापरलेली अशिष्ट भाषा व लिखाण विचारात घेतल्यानंतर श्री. रामदास नायक यांनी समितीचा अवमान केल्याप्रकरणी आणखी दोषी ठरविण्यात आले.

म्हणून समितीने श्री. रामदास नायक यांना एक अतिरिक्त दिवसासाठी दिवाणी तुरुंगात पाठविण्यात यावे अशी शिफारस केली.

दिनांक २९ जुलै १९९१ रोजी मा.मुख्य मंत्र्यांनी सदर शिफारशी संमत करण्याविषयीचा ठराव मांडला. सभागृहाने श्री.रामदास नायक आणि श्री.धरमचंद चोरडिया यांना मा.अध्यक्ष या पदाचा तसेच महाराष्ट्र विधानसभेचा विशेषाधिकार भंग तसेच अवमान केल्याबाबत दोषी ठरविण्यात आलेल्या प्रस्तावात सुधारणा करुन मान्य करण्यात आला व श्री.रामदास नायक व श्री.धरमचंद चोरडिया यांना दिवाणी तुरुंगात एक दिवसाची करारावासाची शिक्षा देण्याचे ठरविण्यात आले.

**(११) "राजशिष्टाचार अधिकारी" प्रकरण (विधानपरिषद १९९३-१९९४) -** विधानपरिषद सदस्य डॉ. श्रीकांत जिचकार व श्री. मधुकरराव वासनिक यांनी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातील राजशिष्टाचार अधिकाऱ्यांनी मुंबई येथील सांताक्रुझ विमानतळावर मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा अवमान केल्याबद्दल आणि त्यायोगे महाराष्ट्र विधानपरिषदेचा विशेषधिकार भंग केल्याबाबत हक्कभंगाची सूचना दिनांक १६ मार्च, १९९२ रोजी दिली. सदस्यांनी सूचनेत म्हटले की, दिनांक ६ मार्च, १९९२ रोजी मा. सभापती,

श्री. जयंतरावजी टिळक महाराष्ट्र विधानसभेच्या सुवर्ण महोत्सव समितीच्या वतीने आयोजित केलेल्या कै. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याच्या अनावरणाचा कार्यक्रम आणि विधान भवनाच्या विस्ताराच्या कामाचा शिलान्यास जो मा. पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या हस्ते नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता त्यास उपस्थित राहणार होते. तथापि, विमानतळावर पोहोचल्यानंतर बोर्डिंग कार्ड घेताना त्यांना ७ व्या

रांगेतील आसन देण्यात आल्याचे आढळून आले. वास्तविक पाहता शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राजशिष्टाचारविषयक अग्रकमाबद्दल काढलेल्या आदेशानुसार उच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशानंतर मा. सभापतींचा क्रम येत असताना त्या उड्डाणामध्ये पहिल्या सर्व जागा मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री व त्यांचे स्वीय सहाय्यक यांना दिल्याचे दिसून आल्याने मा. सभापतींनी राजशिष्टाचार अधिकारी श्री. देशमुख व श्री. जाधव यांना त्यासंबंधीची तपासणी करण्यास सांगितले असता सदर अधिकाऱ्यांनी "सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे अति महत्वपूर्ण व्यक्ती (व्ही.आय.पी.) नाहीत त्यामुळे त्यांना अग्रकम देण्याचा प्रश्न येत नाही." असे उत्तर दिले. उपरोक्त राजशिष्टाचार अधिकाऱ्यांचे उत्तर कदाचित अज्ञान व गैरसमजुतीपोटी दिले असावे अशी शंका आल्यामुळे मा. सभापतींनी त्यांना ती यादी पुन्हा पडताळून पाहा असे सांगितले असता सर्वश्री देशमुख व जाधव यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले. "आम्हाला सर्व माहिती आहे. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे अतिमहत्त्वपूर्ण व्यक्ती नाहीत तेव्हा पुन्हा यादी तपासण्याची जरुरी नाही." राजशिष्टाचार अधिकाऱ्यांचे सदर वर्तन हे केवळ अपमानास्पद किंवा आक्षेपार्ह नसून महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिपत्य करणाऱ्या मा. सभापतींचा विशेषाधिकार भंग व अवमान करणारे असल्याचे सूचनेमध्ये आरोपित करण्यात येऊन सदर प्रकरण चौकशी करुन त्यावर अहवाल देण्यासाठी विशेषाधिकार समितीकडे पाठविण्याची त्यात विनंती करण्यात आली.

सदर प्रकरण सकृतदर्शनी विशेषाधिकार भंगाचे असल्याबाबत समाधान झाल्याने मा. उपसभापतींनी सन्मानीय सदस्य डॉ. श्रीकांत जिचकार यांना सदरहू बाब सभागृहात उपस्थित करण्याची अनुमती दिली. तद्नुसार डॉ. जिचकार यांनी ही बाब दिनांक १७ मार्च, १९९२ रोजी सभागृहात उपस्थित केली आणि सभागृहाने त्यास एकमताने संमती दिली व हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे त्यावर विचार करुन अहवाल सादर करण्यासाठी पाठविण्यात आले.

सूचना देणाऱ्या सदस्यांपैकी डॉ. श्रीकांत जिचकार यांची राज्यसभेवर निवड झाल्याने डॉ. श्रीकांत जिचकार ह्यांना समितीपुढे साक्ष देण्यासाठी अनुमती देण्याबाबत राज्यसभेच्या माननीय सभापतींनी विनंती करण्यासंबंधी माननीय सभापतींनी केलेली विनंती राज्यसभेने मान्य केली आणि त्यानुसार डॉ. श्रीकांत जिचकार यांचा साक्षीपुरावा समितीसमोर नोंदविण्यात आला.

श्री. जे. व्ही. देशमुख, अवर सचिव व श्री. सी. के. जाधव, कक्ष अधिकारी व विशेष राजशिष्टाचार अधिकारी यांनी मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचेबाबत केलेल्या वर्तनामुळे मा. सभापतींचा व पर्यायाने सभागृहाचा अवमान झाला असल्याचा निष्कर्ष समितीने दिनांक २७ डिसेंबर, १९९३ रोजी सभागृहास सादर केलेल्या आपल्या अहवालात नमुद केला आणि त्याबद्दल समितीने श्री. देशमुख व श्री. जाधव यांना दोषी ठरविले. तथापि त्यांनी समितीपुढे क्षमायाचना केली असल्याने त्यांच्या गंभीर प्रमादाबाबत कठोर कारवाई न सुचविता समितीने त्यांचे प्रस्तुत प्रकरणातील वर्तन हा ठपका म्हणून त्यांच्या गोपनीय अभिलेखात नोंद घेण्याची, त्यांना सक्त ताकीद देण्याची तसेच त्यांना यापुढे राजशिष्टाचार विभागात न ठेवण्याची शिफारस केली.

दिनांक १२ एप्रिल, १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सभागृहाने अहवालातील शिफारशी एकमताने संमत केल्या.

**(१२) "श्री. अणे " प्रकरण (विधानपरिषद - १९९३-१९९४) -** नागपूर हायकोर्टाच्या बार असोसिएशनने त्यांच्या दिनांक १२ डिसेंबर १९९१ रोजीच्या बैठकीत तत्कालीन विधानपरिषद सदस्य डॉ.श्रीकांत जिचकार यांच्या सभागृहातील भाषणाबाबत त्यांचा निषेध करणारा ठराव मंजूर करुन सदर भाषण सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्याची मागणी केल्यासंबंधात सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी आणि विजय मोरे यांनी नागपूर अधिवेशन १९९१ मध्ये नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष, पदाधिकारी व इतर सदस्य यांचे विरुध्द विशेषाधिकारभंगाची सूचना दिली. सूचनेत आरोपीत करण्यात आले की, सभागृहाचे सन्माननीय सदस्य डॉ. श्रीकांत जिचकार यांनी दिनांक ९ डिसेंबर १९९१ रोजी सभागृहात, पूरक मागण्यांवरील चर्चेच्या वेळी केलेल्या भाषणाबाबत त्यांचा

निषेध करणारा ठराव नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनच्या दिनांक १२ डिसेंबर १९९१ रोजी झालेल्या  सभेत संमत करण्यात येऊन, सदस्यांना त्यांची सभागृहातील कर्तव्ये निर्भयपणे पार पाडण्यापासून वंचित करुन त्यांचा आणि पर्यायाने सभागृहाचा विशेषाधिकार भंग करुन अवमान केला.

नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांकडून याबाबत खुलासा मागविण्यात आला. आपल्या खुलाशात पदाधिकाऱ्यांनी कळविले की, सदस्य डॉ.जिचकार यांनी सभागृहात केलेल्या भाषणाची प्रत त्यानी स्वत:च बार असोसिएशनच्या सदस्यांना वितरीत केल्याने त्यांना विशेषाधिकार भंगाचे संरक्षण उपलब्ध नाही. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी सुप्रिम कोर्टाच्या जतिशचंद्र घोष विरुध्द हरिसदन मुखर्जी प्रकरणी देण्यात आलेल्या निकालाचा आधार घेतला. त्यांनी उधृत केलेल्या या प्रकरणासंबंधात त्याना कळविण्यात आले की, घटनेच्या कलम १९४(१) आणि (२) अन्वये सदस्यांना सभागृहात भाषणाचे पूर्ण स्वातंत्र्य असून त्यांनी केलेल्या भाषणाबाबत त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करता येत नाही. तथापि, सभागृहाच्या कामकाजाबाबत हेत्वारोप करणारे भाष्य करणे अथवा मजकूर प्रसिध्द करणे किंवा एखादी अशी कृती की, जिच्यामुळे अप्रत्यक्षरीत्या का होईना सभागृहाची सकृतदर्शनी मानहानी होते त्या सर्व बाबी विशेषाधिकारभंगाच्या समजल्या जातात हे त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले. त्यानंतर वकील श्री.श्रीहरी अणे यांचे व्यतिरिक्त इतर सर्वांनी दिलगिरी व्यक्त करुन बिनशर्त माफी मागितली. त्यामुळे श्री.अणे यांचे व्यतिरिक्त इतरांची नावे या प्रकरणी वगळण्यात आली.

दिनांक १४ जुलै १९९२ रोजी सभागृहाने अनुमती दिल्यानंतर मा. सभापतींनी सदर प्रकरण विशेष हक्कभंग समितीकडे सुपूर्द केले.

समितीने दिनांक १८ डिसेंबर १९९३ रोजी सभागृहास सादर केलेल्या आपल्या अहवालात असा निष्कर्ष काढला की, नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनच्या आपल्या बैठकीत सदर ठराव संमत करुन केलेली कृती ही सदस्य डॉ.श्रीकांत जिचकार तसेच मा.सभापती आणि सभागृहाच्या अधिकाराचा अधिक्षेप करणारी ठरते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी विधानपरिषदेचा विशेषाधिकार भंग आणि अवमान झाला आहे. म्हणून समितीने ॲड.श्री.अणे यांना दोषी ठरविले. तथापि, श्री.अणे यांचे समितीच्या कार्यवाही संदर्भातील

एकूण वर्तन निर्दोष व उल्लेखनीय होते. त्यांची वागणूक विनम्र विनयशील होती. समितीसमोर येणाऱ्या इतर अवमान कर्त्यापेक्षा सर्वस्वी वेगळी भूमिका होती. त्यांचे वागणे म्हणजे अवमान कर्त्यांची समितीपुढे कशी वागणूक असावी याचा उत्तम नमुना होता. म्हणून विशेषाधिकाराचा भंग झाल्याचे स्पष्ट असूनही त्यांना कोणतीही औपचारिक शिक्षा न सूचविता केवळ सभागृहाची नापसंत्ती कळविणे पुरेसे आहे असे समितीचे मत झाले व त्याप्रमाणे समितीने शिफारस केली.

दिनांक १३ एप्रिल १९९४ रोजी मा.मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, सभागृहाने अहवालातील शिफारशी एकमताने संमत केल्या.

(१३) **"उर्दू टाईम्स प्रकरण" (विधानपरिषद १९९३-९४)** - दै.उर्दू टाईम्स या वृत्तपत्रात सभागृहात केलेल्या भाषणाबाबत सन्माननीय सदस्यांवर हेत्वारोप करणारा मजकूर प्रसिध्द केल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी "दै. उर्दू टाईम्स" या वृत्तपत्राचे संपादकांना सभागृहासमोर बोलावून समज देण्यात आली.

(१४) **"आपलं महानगर" प्रकरण (विधानपरिषद १९९८-२००२)** - "आपलं महानगर" या सायंदैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. निखिल वागळे यांना " विधानपरिषदेतील विद्वान" तसेच "माफी कशासाठी" या संपादकीयांतून उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणी १ दिवस दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

(१५) **"श्री. मनेश मसंद" प्रकरण (विधानपरिषद २००८-२००९)** - श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल, मुंबई यांनी श्री. हसन मुश्रीफ, मा. विधी व न्याय राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जसलोक हॉस्पिटलला भेट देऊन रुग्णांचा रेकॉर्ड मागितला असता त्यांनी रुग्णांचा रैकॉर्ड देण्यास नकार दिल्याने उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणी श्री.मनेश मसंद यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलविण्यात येऊन समज देण्यात आली.

----------------

## १५. विशेषाधिकार भंगाची काही प्रकरणे (विधानसभा)

आजतागायत सभागृहाने विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणी शिक्षा सुनावलेली काही प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

### (१) "टाईम्स ऑफ इंडिया प्रकरण" (विधानसभा)

विधानसभेत दिनांक २६ मार्च १९५३ रोजी श्री. एम. बी. शहा, वि.स.स. यांनी दंडाधिकारी व न्यायाधिश यांनी दारू परवाने बाळगणे यासंबंधी विचारलेल्या तारांकित प्रश्नाचे उत्तर वित्त, दारूबंदी व उद्योग मंत्री यांनी दिले होते. ज्या न्यायाधिशांना असे परवाने देण्यात आले होते त्यांची नावे सदस्यांनी पुरवणी प्रश्नाद्वारे विचारली असता या पुरवणी प्रश्नाचे उत्तर देखील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सदस्यांना मिळणे आवश्यक आहे असे मा.अध्यक्षांनी सांगितल्यावरून त्याबाबतीची माहिती देण्यात आली.

सभागृहातील यासंबंधीच्या कार्यवाही वृत्तावर "टाईम्स ऑफ इंडिया" या दैनिकाच्या दिनांक २८ मार्च १९५३ रोजीच्या अंकातील "अवमानकारक" ह्या शीर्षकाखालील अग्रलेखात कडक टीका करण्यात आली होती. सदरहू अग्रलेखात "अवमानकारक", "योजनाबद्ध प्रयत्न", "हीन दर्जाचे कट कारस्थान", "जनतेच्याद्वारे निर्भत्सनेसाठी दंडाधिकारी व न्यायाधिश यांना अलग पाडणेची कृती ही जाणीपूर्वक प्रयत्नाचा भाग आहे. या पद्धतीत साहजिकच काही विशिष्ट हेतू दडलेला आहे." "क्षुद्र व दुय्यम दर्जाची कार्यपद्धती दुष्ट हेतूने व निंदा-नालस्ती करण्याच्या उद्दिष्टाने प्रेरित असलेली अशा प्रकारची ही संपूर्ण कार्यपद्धती" एकेकाळी आघाडीवर असलेल्या या राज्याच्या विधानमंडळाला शोभणारी नाही. परंतु, ज्यांना कोणतेही आदर्श व नियम माहिती नाहीत आणि त्यांचे ज्यांच्याकडून पालनही होत नाही अशा लोकांकडून मुलभूत शिष्टाचाराची व उत्तम अभिरूचीची अपेक्षा करणे कदाचित अतिशयोक्तीच ठरेल. असे शब्द वापरण्यात आले होते. शिवाय अशा प्रकारचा प्रश्न अमान्यच करावयास हवा होता असे देखील सदर अग्रलेखात सुचविण्यात आले होते.

सदरहू प्रकरण विशेषाधिकार समितीकडे सोपविण्यात आल्या नंतर समिती समोर महाअधिवक्ता व संपादकांचा सल्लागार या दोघांनी मांडलेला युक्तीवाद तसेच संपादकाने

सादर केलेले बचावात्मक स्पष्टीकरण यांचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर समितीने बहुमताने असा निष्कर्ष काढला की, अग्रलेखात विशेषकरुन सदस्यांवर आणि सर्वसाधारणपणे सभागृहावर हेत्वारोप केले असल्याने अग्रलेखातील टीकेने सभ्याचार, रास्त आणि संयुक्तिक भाष्य यांची मर्यादा ओलांडली गेली आहे, आणि अग्रलेखाचा संपूर्ण कल विधानमंडळाची प्रतिष्ठा जनमानसात कमी करण्याचा होता. समितीने संपादकास विशेषाधिकारभंगासाठी दोषी ठरविले व अशी शिफारस केली की, उक्त अग्रलेख प्रसिध्द करण्याच्या संपादकांच्या कृतिबद्दल सभागृहाने नापसंती व्यक्त करावी आणि जोपर्यंत "टाईम्स ऑफ इंडिया" बिनशर्त क्षमायाचना करीत नाही आणि ती प्रसिध्द करीत नाही तोपर्यंत सदरहू वर्तमानपत्रास देण्यात येणाऱ्या सुविधा काढून घेण्यात याव्यात. सभागृहाने दिनांक १६ एप्रिल,१९५३ रोजी ठराव पारित करुन त्याद्वारे सदरहू संपादकाने माफी न मागितल्यामुळे टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रासाठी देण्यात आलेल्या सुविधा काढून घेण्यात आल्या.

१७ वर्षाच्या कालावधीनंतर टाईम्स ऑफ इंडियाच्या संपादकांनी दिनांक ११ फेब्रुवारी १९७० रोजी एक पत्र पाठविले व त्यात असे नमूद केले की, या वृत्तपत्राने १७ वर्षे इतक्या प्रदीर्घ कालावधीची शिक्षा भोगली असून सदर कालावधीत त्याचे वर्तन देखील १९५३ साली विधानसभेने पारित केलेल्या ठरावाचा हेतू साध्य होईल असेच होते म्हणून टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रास वृत्तपत्रासाठीच्या सुविधा पूर्ववत सुरु करण्यात याव्यात अशी सदर पत्राद्वारे विनंती केली होती. फेरविचारानंतर आणि मुख्यमंत्र्यांनी दिनांक ८ मे १९७० रोजी प्रस्ताव मांडून तो सभागृहाने पारित केल्यावर टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रास वृत्तपत्रासाठीच्या सुविधा पूर्ववत सुरु करण्यात आल्या होत्या.

**(२) 'प्रभात' प्रकरण (विधानसभा)**

पुणे येथील 'प्रभात' दैनिकाच्या दिनांक १४ जून १९५७ च्या अंकात "मुंबई राज्याचे कायदेमंडळ व समितीचे आमदार" या मथळयाखाली एक अग्रलेख प्रसिध्द करण्यात आला. तो अग्रलेख समग्र न देता त्यातील काही उतारे पुढीलप्रमाणे होते: " मुंबई राज्याच्या नव्या कायदेमंडळाची बैठक लवकरच येत्या १७ तारखेस सुरु होईल. प्रश्न असा उपस्थित होतो की, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभासदांचे धोरण काय असावे

?...महाराष्ट्रावर व मराठी जनतेवर नेहरु सरकारने व मोरारजींच्या सरकारने जबरदस्त अन्याय केला आहे. ही गोष्ट समितीच्या प्रतिनिधींनी सर्व काळ लक्षात ठेवली पाहिजे व या प्रश्नावर मराठी लोकमत किती जागृत, प्रक्षुब्ध आणि संतप्त आहे याची जाणीव अर्थात याचा चटका काँग्रेस मंत्रिमंडळाला हरघडी बसत राहील असेच वर्तन ठेवले पाहिजे. ज्याला पार्लमेंटरी रीतिरिवाज व शिष्टाचार म्हणतात त्याची सुध्दा तमा बाळगण्याचे कारण नाही.. संदर्भ असो नसो, प्रस्तुत विषयाचा संबंध असो नसो, गोळीबारांचा व स्थानबध्दतेचा उल्लेख हरघडी समितीच्या सभासदांनी करावा, मंत्री अथवा त्याचे पाठीराखे सभ्यतेचा व जबाबदारीचा आव आणून जेंव्हा जेंव्हा बोलू लागतात तेंव्हा तेंव्हा 'अहो शिष्टराज, त्या गोळीबाराच्या चौकशीचे काय करता?' असा गिल्ला आमच्या आमदारांनी केला पाहिजे, कायदेमंडळाला मंडईचे अथवा मच्छीबाजाराचे स्वरुप आणून दिले पाहिजे, अध्यक्षांनी अशा प्रसंगी कसलेही रुलिंग दिले तरी ते धाब्यावर बसविले पाहिजे. सभागृह सोडून जाण्याचा हुकूम दिला तरी तो धुडकावून लावला पाहिजे, कायदेमंडळाची बैठक चालु असताना दररोज असले प्रसंग आमचे आमदार उपस्थित करतील तरच ते आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावीत आहेत असे मराठी जनता समजेल."

**हक्कभंग प्रस्ताव**

दिनांक २१ जून, १९५७ रोजी मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांनी या अग्रलेखामुळे निर्माण झालेल्या (विधानसभेच्या) विशेषाधिकारासंबंधी प्रश्न उपस्थित केला. सदरील अग्रलेखात सभागृहातील समितीच्या सभासदांना पुढील गोष्टी करण्यास प्रवृत्त करण्याचा अथवा त्या त्यांच्याकडून करविण्याचा प्रयत्न करण्यात आला असे त्यासंबंधीच्या प्रस्तावात म्हटले आहे :

(अ) सभागृहाबद्दल आणि विशेषत: सभागृहाच्या माननीय अध्यक्षांबद्दल अनादर व्यक्त करणारी कृत्ये करणे.

(ब) सभागृहाचे कामकाजात ज्यामुळे अडथळा येण्याचा संभव आहे अशी कृत्ये करणे.

(क) सभागृहाच्या आणि विशेषत: सभागृहाच्या माननीय अध्यक्षांच्या निदेशांचे उल्लंघन होईल अशी कृत्ये करणे.

(ड) विधानमंडळातील शिष्टाचाराची आणि रीतिरिवाजांची आणि माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाची सर्वसाधारणपणे उपेक्षा करणे व ते धुडकावून लावणे, अशा तऱ्हेने सभागृहाच्या कामकाजात पूर्णपणे गोंधळ निर्माण करणे.

सदरहू प्रश्न सभागृहात उपस्थित करण्याची परवानगी मिळण्यासंबंधी मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव-सूचना दिली व त्या प्रस्तावावर सभागृहाचे मत अध्यक्षांनी विचारले. पंचवीसपेक्षा जास्त सदस्य मतदानाच्या वेळी उभे राहिल्याने प्रस्ताव मांडण्यास परवानगी दिली. ही सर्व बाब विशेषाधिकार समितीकडे सोपविण्यात आली. ही समिती दहा सदस्यांची नियुक्त करण्यात येऊन समितीला अहवाल सादर करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत देण्यात आली. दिनांक २४ जून १९५७ रोजी समितीने संबंधित दैनिकाचे संपादक, मुद्रक, प्रकाशक यांना त्यांनी विधानसभेच्या विशेषाधिकारांचा भंग केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द योग्य तो इलाज योजण्याची शिफारस का केली जाऊ नये याविषयी कारण दाखविण्यासाठी व दिनांक २९ जून, १९५७ रोजी समितीच्या बैठकीसमोर हजर राहण्यासाठी व पुरावा देण्यासाठी नोटीस दिली. प्रभात दैनिकाचे संपादक श्री.वा.रा.कोठारी व प्रकाशक आणि मुद्रक श्री. चंदुलाल गांधी यांनी आपली निवेदनपत्रे दिली; परंतु समितीच्या कोणत्याही बैठकीस ते हजर राहिले नाहीत.

**'प्रभात' प्रकरणातील मुद्दे**

त्यांनी आपल्या निवेदनात प्रामुख्याने दोन प्रश्न उपस्थित केले :

**(१)** दिनांक १४ जून १९५७ रोजी योग्य रीतीने व कायदेशीरपणे स्थापन झालेली विधानसभा अस्तित्वात नव्हती.

**(२)** मुंबई विधानसभा नियमाप्रमाणे ही बाब म्हणजे नुकताच घडलेला प्रसंग नाही व त्यामुळे या बाबीची तपासणी करणे योग्य व कायदेशीर ठरणार नाही.

त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा समितीने सखोल विचार केला. समितीच्या मते पहिल्या प्रश्नाला फारसा आधार नाही. कारण सन १९५१ च्या लोकप्रतिनिधित्वाबाबत अधिनियम याच्या ७३ व्या कलमानुसार सार्वत्रिक निवडणुकीनंतर नियुक्त केलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत अधिसूचना काढण्यात येते व अशी

अधिसूचना काढण्यात आल्यावर त्या लोकसभेची किंवा विधानसभेची योग्य रीतीने रचना करण्यात आली असे समजण्यात येते. सार्वत्रिक निवडणुकीनंतर नियुक्त केलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात दिनांक ५ एप्रिल, १९५७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती व त्या तारखेपासून विधानसभेची योग्य रीतीने रचना झालेली होती. पहिल्या प्रश्नाच्या निकालावरुन दुसऱ्या प्रश्नातील समस्या शिल्लकच राहत नाही. समितीने निरनिराळ्या उताऱ्यांचा आधार घेऊन श्री. कोठारी व श्री. गांधी यांना दोषी ठरविले. मुद्रक व प्रकाशक यांना सभागृहाच्या न्यायासनापुढे बोंलावून त्यांची कडक कानउघडणी करण्याची समितीने शिफारस केली. संपादकांच्या बाबतीत समितीने वेगळा दृष्टीकोन घेऊन संपादकांना सभागृहाच्या न्यायासनापुढे बोलावून त्यांना त्यांच्या कृत्याबद्दल बिनशर्त माफी मागण्यास सांगावे अशी शिफारस केली. समितीने आपला अहवाल तयार केला व श्री. अहमदमिया शेख व आमदार साळोखे यांनी अहवालास भिन्न मतपत्रिका दिल्या.

**'प्रभात' प्रकरणी शिक्षा**

दिनांक २० जुलै, १९५७ रोजी संपादक व मुद्रक यांना विधानसभेत हजर राहण्यास कळविले. सुरुवातीस समितीचे अध्यक्ष आमदार भिरुड यांनी समितीचा अहवाल विचारात घ्यावा असा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर सभापती यांनी श्री.कोठारी यांना सभागृहात बोलावून आपले म्हणणे मांडण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणे श्री.कोठारी यांनी सभागृहास उद्देशून एक छोटेसे भाषण केले. या भाषणानंतर त्यांना सभागृहाबाहेर थांबण्यास सांगण्यात आले. मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी श्री.कोठारी व गांधी यांना सभागृहासमोर बोलावून त्यांच्या कृत्याबाद्दल त्यांची 'कडक कानउघाडणी ' करण्याबाबत एक प्रस्ताव साभागृहासमोर मांडला. सभागृहाच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न असून त्याचा विचार पक्षातीत भुमिकेवरून व्हावा असे त्यानी आवाहन केले. विरोधी पक्षाने पक्षीय दृष्टिकोनातून या प्रस्तावाचा विचार करण्याचे ठरविल्याचे दिसले, पण विरोधी पक्षाचे नेते श्री. एस्.एम्. जोशी हे मात्र अपवाद ठरले. सभागृहाची प्रतिष्ठा टिकविण्याची आवश्यकता असल्याचे सांगून त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या ठरावाला पाठिंबा दिला. प्रस्तावात नमूद केलेली शिक्षा ही सौम्य करावी व कडक कानउघाडणी ऐवजी

कानउघाडणीची शिक्षा करावी अशी सूचना केली. ती सूचना मान्य करण्यात येऊन प्रस्तावावर मतदान घेण्यात आले. प्रस्तावास २१० अनुकूल व ८६ प्रतिकूल मते पडून प्रस्ताव संमत झाला. त्यानंतर अध्यक्षांनी श्री. कोठारी व श्री. गांधी यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून सभागृहाच्या वतीने सभागृहाने सुचविलेली शिक्षा सुनाविली.

**(३) सभागृहाच्या कामकाजात अडथळा**

सभागृहाच्या कामाकाजात कित्येक वेळा तिऱ्हाईत इसमाकडून अडथळा आणला जातो. असे प्रकार सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने गुन्हे ठरविण्यात आले आहेत. मध्य प्रदेशात कूंदनमल नावाच्या इसमाने प्रेक्षकांच्या गॅलरीतून सभागृहात पत्रके टाकली. सदर इसमास पकडण्यात येऊन त्यास विधानसभेच्या अधिवेशनापर्यंत कारागृहाची शिक्षा देण्यात आली. राजस्थान विधिमंडळात १९५८ साली असे दोन प्रकार घडले. दिनांक १९ फेब्रुवारी १९५८ रोजी श्री. कल्याण सहाई नावाचा सरकारी कर्मचारी प्रेक्षकांच्या गॅलरीत बसला होता. सभागृहात चर्चा चालू असता तो आपल्या जागेवर उभा राहिला व मोठमोट्याने ओरडू लागला. दिनांक ११ एप्रिल १९५८ रोजी श्री. शर्मा नावाच्या इसमाने प्रेक्षकांच्या गॅलरीतून सभागृहाच्या कामाकाजात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. सभागृहाची चर्चा इंग्रजी भाषेतून का करता ? असा प्रश्न त्याने गॅलरीतून विचारला. या दोन्ही प्रसंगी संबंधित इसमांनी दिलगिरी प्रदर्शित केल्यामुळे विधानसभेने त्यांना सक्त ताकीद दिली.

**(४)** विधानसभेचे सदस्य श्री. आर. एस. पटेल यांना दिनांक १३ सप्टेंबर १९५३ रोजी अटक करण्यात आली. ही अटक वॉरंटशिवाय केलेली आहे व सन्माननीय सदस्यांना सभागृहात उपस्थित राहण्यास प्रतिबंध केला गेल्यामुळे ह्क्कभंग झाला आहे अशा अर्थाची नोटीस श्री. नौशेर भरूचा यांनी दिली विशेषाधिकार समितीने या प्रकरणाची चौकशी करून ह्क्कभंग नसल्याचे आपले मत जाहीर केले.

**(५)** विधानसभेचे सदस्य डॉ. आर. बी. चौधरी यांना दिनांक १३ फेब्रुवारी १९५८ रोजी अटक करण्यात आली. त्यांच्या अटकेची माहिती सभापतींना संबंधित अधिकाऱ्यांनी दिली नाही व त्यामुळे हक्कभंग झाल्याची नोटीस देण्यात आली. समितीने अनेक साक्षीदारांच्या

जबान्या घेतल्या व समितीपुढे आलेल्या पुराव्यावरून डॉ. चौधरीना अटकच केलेली नव्हती असा निष्कर्ष विधानसभेस कळविला.

**(६) जुलै १९६३** च्या अधिवेशनास विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मंत्रिमंडळाविरूध्द अविश्वासाच्या ठरावाची नोटीस दिली. तो ठराव सभापतीनी दाखल करून घेतला व ठरावाच्या चर्चेसाठी आठ दिवसांनंतरचा एक दिवस मुक्रर केला. दिनांक २ सप्टेंबर १९६३ रोजी प्रस्ताव मांडण्याची विधानसभेची रीतसर संमती देण्यात आली. दिनांक ३ सप्टेंबर १९६३ रोजी मुंबईच्या 'लोकसत्ता' दैनिकात निरर्थक व हास्यास्पद ठराव' या मथळ्याखाली एक अग्रलेख प्रसिध्द करण्यात आला. दिनांक ६ सप्टेंबर १९६३ रोजी विरोधी पक्षाचे नेते श्री. कृष्णराव धूळूप यांनी ह्क्कभंगाची नोटीस दिली. दिनांक १८ एप्रिल १९६४ रोजी लोकसत्ताचे संपादक श्री. ह. रा. महाजनी यांनी दिलगिरी प्रदर्शित केली. त्यामुळे ' लोकसत्ता ' चे संपादक व प्रकाशक यांच्याविरुध्द यापेक्षा जास्त कारवाई करण्याची आवश्यकता नाही असे समितीने सुचविले.

**(७) मुंबई महापालिकेकडून अवमान**

मुंबई महापालिकेने तहकुबीचा प्रस्ताव संमत केल्याने विधानसभेच्या हक्कभंगाचा प्रकार उद्‌भवला. दिनांक ३१ जुलै १९६४ रोजी महाराष्ट्र विधानसभेत वांद्रा येथील भाभा हॉस्पिटलच्या पडझडीच्या अनुषंगाने महापलिका व तिची शासनयंत्रणा यांच्यावर कडक टीका करण्यात आली. या चर्चेत श्री. पिंटो, डॉ. मंडलिक, डॉ. झकेरिया, श्री. खेर व श्रीमती कमर अहमद यांनी भाग घेतला, या चर्चेचा वृत्तान्त दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात प्रसिध्द झाला. दिनांक ३ ऑगस्ट १९६४ रोजी महापालिकेची बैठक ठरलेली होती, विधानसभेतील सदस्यांच्या भाषणाच्या निषेधार्थ त्या बैठाकीत तहकुबीचा प्रस्ताव संमत करण्यात आला. महापालिकेची बैठक महापौर श्री. इसाकभाई बंदुकवाला यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तहकुबीचा प्रस्ताव मांडला सभागृहाचे नेते श्री. एम. माधवन यांनी व त्यास श्री. वामन बापट यांनी अनूमोदन दिले. विधानसभेतील चर्चेने महापालिकेच्या प्रतिष्ठेला धक्का बसला, राज्य सरकारला महापालिकेच्या कारभारात

हस्तक्षेप करता येत नाही इत्यादी मुद्दे मांडताना विधानसभेतील चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांवर टीकाही करण्यात आली.

दिनांक ४ ऑगस्ट १९६४ रोजी डॉ. मंडलिक व श्री. खेर यांनी महापालिकेच्या ठरावाने विधानसभेचा हक्कभंग झाल्याची तक्रार मांडली. याबाबतची सूचना मांडण्यास परवानगी देताना उपाध्यक्ष म्हणाले की, "ही तक्रार गंभीर स्वरूपाची असून महापालिकेचा ठराव सभागृहाच्या अधिकाराला व इभ्रतीला आव्हान करणारा आहे. मद्रास पालिकेने विधानसभेतील कामाकाजाबाबत असाच ठराव केला असताना तो ह्क्कभंगाचा प्रकार मानण्यात आला होता", सदर प्रस्ताव मांडण्यास सभागृहाने परवानगी दिल्यावर तो विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात आला.

तहकुबीचा प्रस्ताव संमत करण्यामागे आपले संरक्षण समर्थन करण्याची इच्छा होती अशी महापालिकेतर्फे बाजू मांडण्यात आली समितीने त्यांचे म्हणणे ग्राह्य न धरता महापालिकेने विधानसभेचा व तिच्या सदस्यांचा हक्कभंग केला व विधानसभेचा अवमान केला असा अहवाल सादर केला. महापालिकेवर राज्य सरकारचे नियंत्रण आहे व तिच्या कोणत्याही बाबीची पाहणी करण्याचा विधिमंडळाला अधिकार आहे असे मत अहवालात नमुद करून महापालिका व तिच्या बैठकीतील चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांना दोषी ठरविले.

विधिमंडळाला हा अहवाल सादर केल्यापासून सहा आठवडयांच्या आत मुंबई महापालिकेने हा ठराव रद्द न केल्यास शासन म्हणून दहा हजार रूपये दंड करण्याची आणि याच मुदतीत बैठकीचे अध्यक्ष श्री.बन्दुकवाला व विधानसभेवर टीका करणारे सर्वश्री एम. माधवन, बी. एन. ढबूवाला, आर. बी. मोरे, ए. एस. जरीवाला, लिंगण्णा पुजारी, एच. पी. अडवाणी व बी. के. बोमन बेहराम यांनी बिनशर्त माफी न मागितल्यास त्यांना सभागृहाच्या "बारपुढे" बोलावून ताकीद देण्याची सूचना समितीने केल्या. श्री. वामन बापट हे दोषी असले तरी ते महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आल्याने त्यांच्याबाबतची जी काही कारवाई करावायाची ती विधानपरिषदेने करावी असेही अहवालात सूचविण्यात आले.

**(८) सदस्यांचे खाजगी वर्तन व हक्कभंग**

विधानमंडळाच्या सदस्यांचे खाजगी वर्तन हा विशेष हक्कभंगाचा विषय होतो किंवा नाही यासंबधी महाराष्ट्र विधानसभेत प्रश्न उपस्थित झाला होता. आमदार निवासात दोन आमदारांनी दारु पिऊन गोंधळ केला ही बातमी वर्णनासह 'तरुण भारत' या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. तोच मजकूर मुंबईच्या "संध्याकाळ" या पत्रात छापण्यात आली. ही बातमी प्रसिध्द झाल्यावर आमदार निवासात व विधानसभेच्या आवारात खळबळ उडाली व ज्याच्या त्याच्या तोंडी तो चर्चेचा विषय बनला. 'तरुण भारत' मध्ये आलेल्या मजकुरासंबंधी 'तरुण भारत ' चे संपादक व प्रतिनिधी श्री. बा.न. मग्गीरवार यांच्याविरुध्द डॉ. मंडलिक यांनी लागलीच विधानसभेत हक्कभंगाची नोटीस दिली. तशाच प्रकारची नोटीस विधानपरिषदेत आमदार राजहंस यांनी दिली.या सूचनेवर विधानसभेत दिनांक १ एप्रिल १९६६ रोजी श्री. बाळासाहेब भारदे व विधानपरिषदेत श्री. वि.स. पागे यांनी निर्णय देऊन त्या सूचना अस्वीकृत केल्या .या अस्वीकृतीबाबत आपला निर्णय देताना श्री. भारदे म्हणाले, "प्रसिध्द झालेल्या बातमीत आरोप गंभीर स्वरुपाचे असले तरी सभागृहाच्या हक्कभंगाचा विचार करताना हा सभागृहाच्या सन्माननीय सभासद या नात्याने कार्य करीत असताना त्यांच्या कार्यात काही बाधा येत असेल तर तो हक्कभंगाचा विषय होऊ शकेल. पंरतू सभासदाच्या व्यक्तीगत स्वरूपाच्या बाबी या विशेष हक्कभंगाचा विषय होऊ शकत नाही." सभापतींच्या या निर्णयावर विरोधी पक्षीय आणि काँग्रेस पक्षीय आमदारांनी या निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंती करणरी भाषणे केली. सभागृहात आमदारांनी व्यक्त केलेल्या मतांचा परामर्श घेताना श्री. भारदे म्हणाले आमदार हे एरव्ही समाजात वावरतात तसे ते आमदार निवासातही वावरतात. आमदार निवासात राहिल्यामुळे परिस्थिती बदलत नाही. हाच प्रकार जर आमदार निवासाबाहेर घडला असता तर तो हक्कभंगाचा विषय ठरला असता काय? अशा घटना बाहेर घडत असतात आणि त्याबद्दल वृत्तपत्रातूनही बातम्या प्रसिध्द होतात. ही घटना दोन्ही अर्थाने गंभीर आहे. ती सत्य असेल तर गंभीर आहे आणि असत्य असेल तरी गंभीर आहे. यासंबधी माझ्याकडे एक

लक्षवेधी सूचना आली आहे ती मी मंजूर केली आहे. शासन त्या सूचनेवर काय परिस्थिती आहे त्यासंबधी निवेदन करील."

**(९) "श्री. धोटे" प्रकरण (विधानसभा)**

दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीपुढे राज्यपालांचे अभिभाषण चालु असताना सदस्यांनी केलेल्या अशिष्ट व अशोभनीय वर्तनामुळे झालेला सभागृहाचा विशेष हक्कभंग व अवमान.

दिनांक ८ फेब्रुवारी, १९६८ रोजी श्री. प्राणलाल व्होरा, वि.स.स. यांनी "दिनांक ७ फेब्रुवारी, १९६८ रोजी श्री. जांबुवंतराव बा. धोटे, वि.स.स. यांनी माननीय राज्यपालांचे अभिभाषण चालू असताना सतत घोषणा देऊन, राज्यपालांचे आदेश धुडकावून लावून आणि सभागृहाचे आत व सभागृहाबाहेर लॉबीमध्ये बेशिस्त वर्तन करुन जाणूनबुजून सभागृहाच्या कामकाजामध्ये व्यत्यय आणून सभागृहाचा केलेला तथाकथित विशेषहक्कभंग व अवमान याबाबत सूचना दिली.

दिनांक ८ फेब्रुवारी, १९६८ रोजी अध्यक्षांनी विशेष हक्कभंगाचा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित करण्यास अनुमती दिली आणि सभागृहाने अनुमती दिल्यानंतर अध्यक्षांनी हा प्रश्न, त्याची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे पाठविला, समितीचे कामकाज चालू असताना श्री.धोटे यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले (१) राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी सभागृह रीतसर घटीत झाल्याचे समजण्यात येते काय, (२) राज्यपालांचे अभिभाषण हे सभागृहासमोरील कार्यवाहीचा भाग होतो काय, (३) यावेळी सभागृहाचे कामकाज कोण चालवितो, आणि (४) एकाच प्रकारच्या गुन्ह्याबाबत न्यायालयात आणि समितीसमोर एकावेळी कामकाज चालणे योग्य व रीतसर आहे काय? मुद्दे क्रमांक (एक) ते (तीन) बाबत समितीने असा निष्कर्ष काढला की, हे मुद्दे अन्य संदर्भात महत्वाचे असले तरी सध्याच्या कार्यवाहीशी त्यांचा काहीच संबंध नाही कारण या प्रकरणातील गुन्ह्यांचे स्वरुप, अशोभनीय आणि अप्रतिष्ठित वर्तन करणे आणि राज्यपाल संविधानानुसार पार पाडीत असलेल्या कर्तव्याच्या वेळी त्यांचा अनादर करणे आणि राज्यपालांचे

अभिभाषण सदस्याने विनयाने आणि शिष्टाचाराला धरुन ऐकणे असा संविधानाने संकेत घालून दिलेला असला तरी त्याबद्दल अनादर दाखविणे आणि संविधानाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतलेली असतानाही तसे वर्तन न करणे असे गंभीर स्वरुपाचे आहे. मुद्दा क्र.(चार) म्हणजे न्यायालय आणि समिती ह्यांच्यासमोर एकाच वेळी कारवाई चालू राहाणे याबाबत समितीने असे नमूद केले की तसे करण्यास काहीही हरकत नव्हती तरी समितीपुढे सुरु असलेली चौकशी होईपर्यंत फौजदारी न्यायालयाने त्या प्रकरणी आपले कामकाज स्थगित केले होते.

श्री. धोटे यांनी सभागृहाचा विशेष हक्कभंग व अवमान केला आहे असा निष्कर्ष समितीने काढला. समितीने असाही निष्कर्ष काढला की, लोकसभेतील संसदीय समिती आणि विशेष हक्क समिती या दोन्ही समित्या संसदीय समित्या असून त्यांना अशा प्रकरणाची चौकशी करण्याचे योग्य ते अधिकार असल्यामुळे हा प्रश्न विशेष हक्क समितीकडे विचारार्थ न पाठविता लोकसभेतील संसदीय समिती सारख्या समितीकडे विचारार्थ पाठविणे उचित होईल अशा आशयाच्या युक्तिवादात (जो हे प्रकरण समितीकडे विचारार्थ पाठविण्याची कारवाई सभागृहामध्ये चालू असताना मांडण्यात आला होता) काहीही तथ्य नाही. त्यात काहीही असले तरी असे वर्तन केल्याने सभागृहाचा विशेष हक्कभंग होतो व अवमान होतो असा एकदा निष्कर्ष काढल्यावर हे प्रकरण विशेष हक्क समितीपुढे जाणेच योग्य होते.

म्हणून श्री. धोटे, वि.स.स. यांचे सभागृहाचे सदस्यत्व अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी स्थगित करावे अशी समितीने शिफारस केली. सभागृहाने हा अहवाल स्वीकारल्यानंतर एका आठवड्याच्या आत त्यांनी बिनशर्त माफी मागितल्यास त्यांना माफी देण्यात यावी अशी देखील समितीने शिफारस केली.

दिनांक ३० जुलै, १९६९ रोजी मुख्यमंत्र्यांनी समितीच्या शिफारशी स्वीकारण्या-बाबतचा प्रस्ताव सभागृहात मांडला तथापि सदर प्रस्तावाला, राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळेस श्री. धोटे यांनी केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल त्यांना समज देण्यात यावी अशी सुधारणा

मांडण्यात आली व ती सुधारणा सभागृहाने संमत केली आणि त्यानुसार त्याच दिवशी अध्यक्षांनी श्री. धोटे यांना समज दिली.

(१०) **"मराठा" प्रकरण (विधानसभा १९६४-६६)** :- "दै.मराठा" या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्तातून उद्भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी दै. मराठाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. प्र. के. अत्रे यांना समज देण्यात यावी अशी शिफारस समितीने केली. तथापि श्री. अत्रे यांनी सभागृहाची बिनशर्त माफी मागितल्यानंतर प्रकरण संपविण्यात आले.

(११) **श्री. ढाकणे प्रकरण (विधानसभा १९६८)** :- श्री. बबनराव ढाकणे यांनी मा. अध्यक्षांच्या गॅलरीतून सभागृहामध्ये घोषणा देऊन व पत्रके फेकून सभागृहाच्या कामकाजात अडथळा व व्यत्यय आणल्याप्रकरणी श्री. ढाकणे यांना ७ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

(१२) **"मुंबई सकाळ" प्रकरण (विधानसभा १९८१-८४)** :- दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्रात लिहिलेल्या लिखाणातून उद्भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्राचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. माधव गडकरी यांना सभागृहाची तीव्र नापसंती कळविण्यात आली होती.

(१३) **"आपलं महानगर" प्रकरण (विधानसभा १९९२-९४)** :-"आपलं महानगर" या सायंदैनिकात प्रसिध्द केलेल्या लिखाणातून उद्भवलेल्या हक्कभंग प्रकरणी "आपलं महानगर" या सायंदैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. निखिल वागळे यांना ३ दिवसांची कारावासाची शिक्षा तसेच विशेष हक्क समितीच्या अधिकाराचा अधिक्षेप करणारे आव्हानात्मक पत्र लिहिल्याबद्दल अतिरिक्त एक दिवस अशी एकूण ४ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

(१४) **"दै. देशोन्नती" प्रकरण (विधानसभा २००१-२००३ )** :- "दै.देशोन्नती" या अकोला येथून प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रात पंचायती राज समिती संबंधातील आक्षेपार्ह मजकुरातून उद्भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणी सदर दैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. प्रकाश पोहरे यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलाविण्यात येऊन समज देण्यात आली.

**(१५) "दै.मापदंड" प्रकरण (विधानसभा २००१-२००४) -** "दै.मापदंड" या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या संपादकी यात विधीमंडळाच्या पंचायती राज समितीवर करण्यात आलेल्या टिकाटिप्पणीमुळे उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी सदर दैनिकाचे संपादक श्री. संजय जेवरीकर यांनी समितीसमोर व्यक्त केलेली माफी तसेच प्रसिध्द् केलेली जाहीर दिलगिरी विचारात घेऊन प्रकरण संपविण्यात आले.

**(१६) "श्री. मनजितसिंग सेठी" प्रकरण (विधानसभा २००५)** - राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी विधानसभेत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने श्री. मनजितसिंग सेठी, अध्यक्ष, बार मालक असोसिएशन यांनी धमकीवजा शब्दात त्याचा निषेध केल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. मनजितसिंग सेठी यांना ९० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सभागृहाने अहवाल विचारात घेऊन शिफारस संमत केली व त्यानुसार श्री.मनजितसिंग सेठी यांना ९० दिवसांच्या कारावासात पाठविण्यात आले. परंतु श्री.मनजितसिंग सेठी यांनी ९० दिवसांपैकी २९ दिवसांची शिक्षा भोगली व त्या दरम्यान श्री.मनजितसिंग सेठी यांनी शिक्षेविरुध्द मा.उच्च न्यायालयात दोन याचिका सादर केल्या त्या मा.उच्च न्यायालयाने फेटाळल्या असल्याने श्री.मनजितसिंग सेठी यांनी त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलात मा.सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेला अंतरीम स्थगिती दिली परीणामी त्यांना दिलेल्या शिक्षेची पूर्ण अंमलबजावणी होऊ शकली नाही व सद्यस्थितीत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात निर्णयार्थ प्रलंबित आहे. (हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे - मे, २०१३)

**(१७) "साप्ताहिक ससेमिरा" प्रकरण (विधानसभा २००६-२००७)** - मा. अध्यक्ष, विधानसभेचे अध्यक्ष या नात्याने आपले कर्तव्य बजावत असताना मा.अध्यक्षांविषयी टिकाटिप्पणी करणारी, त्यांची बेअदबी व अवमान करणारी तसेच त्यांची जनमानसातील प्रतिमा डागाळणारी वस्तुस्थितीशी विसंगत विधाने प्रसिध्द केल्यामुळे उद्‌भवलेल्या मा.अध्यक्षांच्या व महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी

साप्ताहिक ससेमिराचे संपादक व प्रकाशक श्री. मधुकर लोंढे यांना १० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सभागृहाने अहवाल विचारात घेऊन शिफारस संमत केली व त्यानुसार श्री.मधुकर लोंढे यांनी १० दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली.

**(१८) <u>"श्री. नंद लाल" प्रकरण (विधानसभा २००६-२००८)</u>** - विधानसभा विशेष हक्क समितीने मागविलेला खुलासा स्वत:चे स्वाक्षरीने पाठविण्यास टाळाटाळ करुन तसेच सदरहू सूचनेच्या अनुषंगाने समितीसमोर साक्षीसाठी उपस्थित राहण्यास नकार दिल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेष हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. नंद लाल, तत्कालीन राज्य निवडणुक आयुक्त यांना २ दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सभागृहाने समितीचा अहवाल विचारात घेऊन शिफारशीत केलेल्या ७ दिवसांच्या कारावासाऐवजी २ दिवसांच्या कारावासाच्या शिक्षेची शिफारस संमत केली व त्यानुसार श्री. नंद लाल यांनी २ दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली. या शिक्षेविरुध्द श्री.नंद लाल यांनी मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले. मा.उच्च न्यायालयाने विधानसभेचा निर्णय कायम ठेवत याचिका निकाली काढली. त्याविरुध्द श्री.नंद लाल यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केले व सद्य:स्थितीत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

(हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे - मे २०१३)

**(१९) <u>"श्री. जी.एन.वळवी " प्रकरण (पुर्नविलोकीत) (विधानसभा २०१०-२०१२)</u>** - मा. विरोधी पक्ष नेत्यांविरुध्द जिल्हा पोलीस प्रशासनाकडे अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची तक्रार करुन तसेच ह्या विषयी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करुन श्री.वळवी यांनी त्यांच्यावर असलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांची चौकशी दडपण्यासाठी दबाव आणल्यामुळे उद्‌भवलेल्या विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांच्या व महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष हक्कभंगाचे व अवमानाचे प्रकरणी दिनांक १३ एप्रिल, २०१२ रोजी सभागृहाने श्री. जी. एन. वळवी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि. जळगाव

यांच्याविरुध्द दिनांक १७ मार्च २०१० रोजी मा. अध्यक्षांकडे विशेषाधिकार भंगाची सूचना दिली होती.

दिनांक २३ एप्रिल, २०१० रोजी सभागृहाने अनुमती दिल्यानंतर ही बाब विशेष हक्क समितीकडे पाठविण्यात आली.

समितीचा अहवाल दिनांक ८ डिसेंबर, २०१० रोजी सभागृहास सादर करण्यात आला होता. विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात आल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी अहवालातील शिफारशी सभागृहाने स्विकारण्या संदर्भात असा प्रस्ताव मांडला होता की, "श्री. जी. एन. वळवी, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प यावल, जिल्हा जळगाव यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलवून समज देण्यात यावी" मात्र या मांडलेल्या प्रस्तावास सभागृहात काही सन्माननीय सदस्यांनी असहमती दर्शवून सदरहू प्रकरण गंभीर असल्यामुळे अधिक कठोर कारवाईची आवश्यकता असल्याने सदरहू प्रकरण पुनश्च: विशेष हक्क समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे अशी विनंती केली. मा. अध्यक्षांनी सभागृहाची एकदंरीत भावना लक्षात घेऊन तसेच सर्व गटनेत्यांशी केलेल्या चर्चेनंतर सभागृहाच्या अनुमतीने सदरहू प्रकरण पुन:श्च विचार करण्याकरिता समितीकडे पाठविण्यात यावे असे निदेश दिले.

या प्रकरणी समितीने पुनर्विचारांती असा निर्णय घेतला की, यापुढे अशाप्रकारच्या प्रकरणामध्ये एक उदाहरण (Example) कायम व्हावे म्हणून श्री. जी. एन. वळवी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि. जळगाव यांच्या संदर्भातील विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणात त्यांना ३ (तीन) दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस समितीने दिनांक १३ एप्रिल, २०१२ रोजी सभागृहास सादर केलेल्या पुनर्विलोकित अहवालात केली.

सदर अहवाल विचारात घेताना सभागृहाने सदर ३ (तीन) दिवसांच्या कारावासाच्या शिक्षेऐवजी २ (दोन) दिवसांच्या कारावासाची शिक्षा देण्यात यावी असा सुधारीत ठराव मंजूर केला व त्यानुसार श्री. जी. एन. वळवी, यांनी दोन दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली. (दिनांक १४/४/२०१२ ते दिनांक १५/४/२०१२)

## १६. ससंदेतील काही प्रकरणे

### (१) श्री. मुद्‌गल, संसद सदस्य, आर्थिक लाभ मिळवित असल्याबाबतचे प्रकरण

लोकसभा वा विधानसभा यांच्या काही उच्च पंरपरा आहेत. सभसदांनी आपले वर्तन त्या पंरपरेला अनुरुप असेच ठेवावयास पाहिजे. सभासद म्हणून जी कामे करावी लागतात ती नि:स्वार्थबुध्दीने केली पाहिजेत. त्यात कोणताही आर्थिक लाभ मिळविता कामा नये. अशी परंपरा असली तरी त्याविरुध्द वागणारे खासदार व आमदार आढळत असतात.यापैकी खासदार एच. सी. मुद्‌गल यांचे एक उदाहरण आहे. या खासदारांचा बॉम्बे बुलीयन असोसिएशनशी घनिष्ठ संबंध. असतांना या असोसिएशनची अनेक कामे सरकारदरबारी असतात, त्यांची काही गाऱ्हाणी मंत्री महाशयांपुढे मांडावयाची असतात व काही प्रश्न लोकसभेपुढे विचारावयाचे असतात. ही सर्व कामे श्री. मुद्‌गल यांनी करण्याचे कबूल केले, पण त्यासाठी असोसिएशनकडून वीस हजार या रकमेची मागणी केली. असोसिएशनने पाच हजार रुपये देण्याचे मान्य केले. असोसिएशनचे अध्यक्ष व सदस्य यांची अर्थमंत्र्यांशी मुलाखत घडवून आणण्याचे त्यांनी मान्य केले व त्याप्रमाणे अर्थमंत्र्यांना पत्र पाठवून मुलाखतीची तारीख व वेळ देण्याची विनंती केली. मुलाखत घेण्यास अर्थमंत्र्यांनी नकार दिला. श्री. मुद्‌गल यांनी बॉम्बे बुलीयन असोसिएशनच्या बाबतीत एका प्रश्नाची नोटीस दिली.

श्री. मुद्‌गल यांच्या वर्तनाची माहिती पंतप्रधानांच्या कानावर गेली. खासदार मुद्‌गल यांच्या वर्तनाची चौकशी करण्यासाठी पाच सभासदांची समिती नेमण्याचा ठराव पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी दिनांक ६ जून, १९५१ रोजी मांडला. ठराव मांडताना त्यांनी श्री. मुद्‌गल यांच्याविरुध्द खालीलप्रमाणे तक्रार मांडली :-

१) बॉम्बे बुलीयन असोसिएशनची दिनांक ९ मार्च १९५१ रोजी सभा बोलाविण्यात आली होती. असोशिएशनच्या काही तक्रारींची दाद लावून घेण्यासाठी लोकसभेच्या एका सदस्यांने कबूल केले असून त्यासाठी त्यांना रुपये २०,०००/- देण्याचा प्रस्ताव अध्यक्षांनी सभेपूढे मांडला त्यावर चर्चा होऊन रु. ५०००/- देण्याचा प्रस्ताव संमत झाला.

२) असोसिएशच्या ३० मार्च रोजी बोलविलेल्या बैठकीत श्री. मुद्‌गल यांना एक हजार रुपये देण्यात आल्याचे सांगण्यात आले. असोसिएशनच्या अध्यक्ष व सदस्यांना श्री. मुद्‌गल यांनी दिल्लीस बोलाविल्याचे व त्यांची संबंधित मंत्र्याशी मुलाखत घडवून आणण्याचे प्रयत्न करीत असल्याचे सांगण्यात आले.

३) या बैठकीपूर्वी श्री.मुद्‌गल यांनी दिनांक २४ मार्च, १९५१ रोजी पत्र पाठवून अर्थमंत्र्यांना मुलाखतीची वेळ देण्यास सुचविले. अर्थमंत्र्यांनी श्री. मुद्‌गल यांच्यामार्फत मुलाखत ठरविण्यास नकार दिला.

४) मार्च महिन्यात श्री. मुद्‌गल यांनी एका प्रश्नाची नोटीस दिली. तो प्रश्न बुल्यन असोसिएशनबाबत होता.

५) असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची मुलाखत घडवून आणण्याचा प्रयत्न व नोटीस दिलेला प्रश्न श्री. मुद्‌गल यांनी आर्थिक साहाय्य मिळविण्यासाठी होता.

समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांची नियुक्ती करण्यात आली. श्री. के. टी. शहा, श्री. सय्यद नौशेरअल्ली, श्रीमती दुर्गाबाई व श्री. कशिनाथराव वैद्य हे समितीचे सदस्य होते. समितीची प्राथमिक बैठक दिनांक ९ जून १९५१ रोजी बोलाविण्यात आली व त्यात सरकारच्या ताब्यात असलेले कागदपत्र समितीकडे सादर करण्यात आले. २९ जून ते ५ जुलैपर्यंत समितीच्या बैठकी मुंबई विधानमंडळाच्या इमारतीत घेण्यात आल्या. या सर्व बैठकींना श्री. मुद्‌गल उपस्थित होते व त्यांच्या तर्फे ॲडव्होकेट पारडीवाला यांनाही उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली. समितीने २४ साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या व आपला अहवाल दिनांक ३० जुलै १९५१ रोजी लोकसभेत सादर केला. श्री. मुद्‌गल यांचे वर्तन सभागृहाच्या प्रतिष्ठेला शोभणारे नसल्याचे समितीने अहवालात नमूद केले.

दिनांक २४ सप्टेंबर १९५१ रोजी समितीचा अहवाल मान्य करण्यासंबंधी व श्री. मुद्‌गल यांचे सभासदत्व रद्द करण्यासंबंधी ठराव मांडण्यात आला. ठरावावर पंडीत नेहरु यांनी भाषण केल्यावर श्री. मुद्‌गल यांनी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. ठरावात योग्य ती दुरुस्ती करण्यात आल्यानंतर तो सभागृहाने संमत केला. लोकसभेचे सदस्यत्व रद्द करण्याचा हा पहिलाच ठराव होय.

### (२) डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबतचे प्रकरण

आणीबाणीच्या काळात डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी हे परदेशात असताना देशाची अप्रतिष्ठा व अवमान करणारी विधाने त्यांनी केली, याबद्दल त्यांच्या वर्तनाची चौकशी करण्याकरता श्री. गौरे मुरहारी यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांची एक समिती नेमण्यात आली. डॉ. स्वामी यांचे वर्तन हे सभागृह व सभागृहाचे सदस्य यांच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे असून सदस्याकडून अपेक्षित असलेल्या वर्तनाशी विसंगत आहे असा अहवाल समितीने सभागृहाला सादर केला.

सदर अहवाल संमत करण्यासाठी सभागृहाचे नेते श्री. कमलापति त्रिपाठी यांनी दिनांक १५ नोव्हेंबर १९७६ रोजी एक ठराव राज्यसभेत मांडला व डॉ.स्वामी यांचे सदस्यत्व रद्द करण्याची सूचना ठरावाद्वारे केली. तो ठराव आवाजी मतदानाने संमत झाल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

### (३) श्रीमती इंदिरा गांधी यांचे सभासदत्व रद्द करण्याबाबतचे प्रकरण

पंतप्रधानांना त्यांच्या कृतीबद्दल शिक्षा देण्याचा प्रसंग लोकशाही राष्ट्रांच्या इतिहासात फक्त श्रीमती इंदिरा गांधी यांच्या बाबतीत प्रथमत: घडला. लोकसभेचा अवमान केला असा त्यांच्यावर आरोप होता ते प्रकरण दोन वर्षापूर्वी म्हणजे १९७७ साली घडले. श्री.संजय गांधी यांच्या "मारुती लिमिटेड" या कंपनीने काही यंत्रसामग्री परदेशातुन आयात केली. ही गोष्ट कंपनीला दिलेल्या परवान्यातील शर्तीचा भंग करणारी होती. यंत्रसामग्रीच्या आयातीबाबत श्री. मधु लिमये व श्री. ज्योतिर्मय बसु यांनी वेगवेगळया प्रश्नांची पुर्वसूचना लोकसभेच्या सभापतीकंडे पाठविल्या. त्यापैकी श्री. ज्योतिर्मय बसु यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६५६ हा उत्तरासाठी दिनांक १६ एप्रिल १९७५ रोजी ठेवण्यात आला.

सभासदांनी सूचना दिलेले प्रश्न लोकसभेच्या सभापतीकडून संबंधित खात्याकडे पाठविले जातात. दिनांक १६ एप्रिल १९७५ रोजी श्री. ज्योतिर्मय बसु यांच्या प्रश्नास माहिती उपलब्ध न झाल्यामुळे उत्तर देण्यात आले नाही. प्रश्नाची माहिती का उपलब्ध झाली नाही याची कारणमीमांसा दोन वर्षानंतर उघडकीस आली. या दोन वर्षाच्या काळात

देशात वेगाने घडामोडी घडत होत्या. दिनांक २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी पुकारण्यात आली. एकोणीस महिन्यानंतर लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला व जनता पक्षास बहुमत मिळाले. श्रीमती इंदिरा गांधी यांचा रायबरेली या मतदारसंघात पराभव झाला. जनता पक्ष सत्तारुढ झाल्यानंतर त्या पक्षाच्या सरकारने आणीबाणीतील अतिरेकांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला. दिनांक २८ मे १९७७ रोजी भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. जे. सी. शहा यांचा एक सदस्य आयोग नेमण्यात आला. त्या आयोगाच्या कामकाजाच्या वेळी श्री. ज्योतिर्मय बसु यांच्या प्रश्नाची माहिती गोळा करणाऱ्या उद्योग मंत्रालयातील चार आधिकाऱ्यांचा अनन्वित छळ केल्याची माहिती प्रकाशात आली. या प्रकरणात पंतप्रधान, पंतप्रधानांचे अतिरिक्त स्वीय सहाय्यक श्री. आर. के. धवन व सी. बी. आय. चे डायरेक्टर श्री. डी. सेन यांचा हात असल्याचा निष्कर्ष आयोगाने काढला.

१९७८ साली लोकसभेच्या चिकमगलूर मतदारसंघात पोटनिवडणूक झाली व त्यात श्रीमती गांधी प्रचंड मताधिक्याने निवडून आल्या. श्री. ज्योतिर्मय बसु यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबतची माहिती गोळा करणाऱ्या उद्योग मंत्रालयातील चार अधिकाऱ्यांचा छळ करुन सभागृहाचा अवमान केला आणि विशेषाधिकाराचा भंग केला असा प्रस्ताव मांडण्यात आला. तो प्रस्ताव विशषाधिकार समितीकडे पाठविण्यात आला.. माजी पंतप्रधान श्रीमती गांधी, त्यांचे तत्कालीन अतिरिक्त सचिव श्री.आर.के.धवन व केंद्रीय गुप्तचर खात्याचे माजी संचालक श्री.डी.सेन यांना सर्वांना हक्कभंग समितीने याप्रकरणी दोषी ठरविले. दिनांक २१ नोव्हेंबर, १९७८ रोजी समितीने आपला अहवाल लोकसभेत सादर केला व त्या सर्वांना कोणती शिक्षा द्यावयाची याचा निर्णय लोकसभेवर सोपविला.

समितीच्या अहवालावर लोकसभेत दिनांक ७ डिसेंबर, १९७८ रोजी चर्चा सुरु झाली. जनता व अन्य पक्षांनी आपल्या सदस्यांना कोणताही आदेश दिला नाही व त्यांना मतस्वातंत्र्य दिले. इंदिरा काँग्रेस व अण्णा द्र.मु.क. पक्षाचे सभासद यांनी श्रीमती गांधी यांच्या पाठीशी उभे राहून प्रस्तावाला जोरदार विरोध करण्याचा पवित्रा घेतला. विरोधकांचे म्हणणे की, हा प्रकार ५ व्या लोकसभेच्या (१९७२ -७७) मुदतीत घडला असल्याने १९७७ साली निवडलेल्या सहाव्या लोकसभेला विचार करता येणार नाही. त्याबद्दल कसलीही

कारवाई करता येणार नाही. जनता, कॉंग्रेस, डावे कम्युनिस्ट व उजवे कम्युनिस्ट या चारही पक्षाच्या सभासदांनी प्रस्तावाला अनुकूल अशी भूमिका घेतली. या पक्षाच्या म्हणण्याप्रमाणे सभागृह ही अव्याहत प्रक्रिया असून विद्यमान लोकसभेला पूर्वीच्या घटनेची दखल घेता येते अशी दिनांक १३ डिसेंबर, १९७८ रोजी श्रीमती गांधी यांनी आपली बाजु मांडली.

प्रस्तावावर चर्चा चालु असताना पंतप्रधान श्री.मोरारजीभाई देसाई यांनी ठराव मांडला. हक्कभंग प्रकरणी दोषी ठरलेल्या व्यक्तिंना लोकसभेचे अधिवेशन चालु असेपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा देण्याचे व श्रीमती गांधी यांचे लोकसभेचे सभासदत्व रद्द करण्याची मागणी ह्या ठरावामुळे करण्यात आली. ठरावास २७९ अनुकूल तर १३८ प्रतिकूल असे मतदान झाले. ३७ सदस्य मतदानाच्या वेळी तटस्थ राहिले होते.

मतदान झाल्यानंतर लोकसभेची बैठक तहकुब झाली. शिक्षा झालेल्या सर्वांना तिहाड जेलमध्ये पाठवण्याच्या हुकुमावर सभापतींनी स्वाक्षरी केली. लोकसभेचे अधिवेशन ६-७ दिवसानंतर स्थगित करण्यात आले. श्रीमती गांधींना सात दिवस कारागृहात काढावे लागले.

[श्रीमती इंदिरा गांधी यांच्या विरोधात केलेली कारवाई रद्दबातल ठरविण्याचा ठराव सातव्या लोकसभेत संमत करण्यात आला.]

## १७. सभागृहाचे सदस्यत्व रद्द व निलंबन केल्याची प्रकरणे

**श्री.जांबुवंतराव धोटे यांचे सदस्यत्व रद्द**

महाराष्ट्र विधानसभेत सभासदत्व रद्द करण्याचा एकच प्रसंग घडला आहे. दिनांक १२ ऑगस्ट, १९६४ रोजी श्री.धोटे यांच्याकडून गोळाफेकीचा, सभापतींकडे झेप घेण्याचा व सुरक्षा रक्षकाशी झटापट करण्याचा प्रसंग घडला.दुसऱ्या दिवशी कामकाजास रीतसर सुरुवात होताच मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांनी पुढील प्रमाणे ठराव मांडला. "१२ ऑगस्ट रोजी सभागृहाचे एक सदस्य श्री.जांबुवंतराव धोटे यांनी केलेले अत्यंत बेशिस्त वर्तन पाहता त्यांनी सन्माननीय सभापती यांची व्यक्तिश: व एकूण सभागृहाची अप्रतिष्ठा व अनादर केला याबद्दल आपल्याला बसलेला धक्का व तिरस्कार हे सभागृह व्यक्त करीत आहे. सभागृह व सभापती यांचा घोर अपमान करणारे हे वर्तन होते म्हणून हे सभागृह या ठरावाद्वारा असा निर्णय करीत आहे व हुकूम देत आहे की, श्री. जांबुवंतराव धोटे यांची सभागृहातून तत्काळ हकालपट्टी व्हावी, वर उल्लेखिलेल्या परिस्थितीत सभापतींनी ज्या संयमाने व समयज्ञतेने सभागृहाचे कामकाज चालविले त्याबद्दल हे सभागृह त्यांना धन्यवाद देत आहे."

या सभागृहात प्रत्येकाने आपली मते शांततेने मांडली पाहिजेत व लोकशाहीस ते पोषकच आहे. लोकशाहीवर ज्यांचा विश्वास आहे त्यांनी लोकशाहीची प्रतिष्ठा राखण्यासाठी या ठरावाला पाठिंबा देण्याचे आवाहन ठराव मांडताना त्यांनी केले. या शिक्षेऐवजी दुसऱ्या एखाद्या शिक्षेचा विचार करण्यात यावा असे श्री. धुळुप यांनी सुचविले व त्या सूचनेस आचार्य दांडेकर, श्री. रहांगडाले व श्री.पिंटो यांनी पाठिंबा दिला. श्री.पिंटो यांनी तर तशा आशयाची उपसूचना मांडली पण ती सभागृहाने नामंजूर केली. या वेळी श्री. धुळुप हे उभे राहिले व म्हणाले की, "श्री. धोटे यांनी गाय मारली तर सरकार वासरु मारीत आहे." एवढे सांगून त्यांनी सभात्याग केला व त्यांच्या पाठोपाठ विरोधी गटाचे सर्व आमदार बाहेर पडले. मूळ ठराव सभागृहाने संमत करुन सभापती व सभागृहाशी अपमानकारक वर्तन केल्याचे आरोपावरुन श्री. धोटे यांचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय घेतला.

**महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद**
**सदस्यांना निलंबित केल्याबाबतची माहिती**

| अ.क्र | दिनांक | निलंबित सदस्यांचे नांव | पक्ष | निलंबनाचे कारण | किती दिवसाकरिता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १) | १३/८/१९६४ | (एक सदस्य)<br>श्री. जाबुवंतराव धोटे | फॉरवर्ड ब्लॉक | दि.१२-८-१९६४ आपला माईक बंद आहे याकारणाने मोडतोड केली व क्रोधाने बाहेर काढले जात असता पेपरवेट फेकला-प्रस्तावावर चर्चा झाली व सभासदत्व कायमचे रद्द करण्यात आले. | सभासदत्त्व कायमचे रद्द करणे | |
| २) | ३१/८/१९६६ | (एकूण सदस्य -२०)<br>श्री. का.ता जाधव,<br>श्री. यं. रा. मडूर,<br>श्री. सा. गो. पाटकर,<br>श्री. धा. पो. सुतार,<br>श्री. त्र्यं.सी. कारखानीस,<br>श्री. भा.न. गावंडे,<br>श्री. ग.अ. देशमुख,<br>श्री. शे. आ.देशमुख,<br>श्री.कृ.ना. धुळुप,<br>श्री. के. शं. धोंडगे,<br>श्री. बा. सो. नाईक,<br>श्री. का.रा.पाटील, | संयुक्त महाराष्ट्र समिती व संयुक्त सोशालिस्ट पार्टी | सीमा प्रश्न - सीमा प्रश्नावर सतत बोलत राहण्याचा व कामकाजात अडथळा आणण्याचा इरादा जाहीर केला. | दिनांक ३१ ऑगस्ट, १९६६ ते ५ सप्टेंबर १९६६ पर्यंत | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्री. कृ.बा.पाटील,<br>श्री. दि.बा.पाटील,<br>श्री. स. दौ. पाटील,<br>श्री. म. गुं. महाराज,<br>श्री. कृ.रा. मुंढे,<br>श्री. पां.रा. सानप,<br>श्री. बा.ना. नागवडे,<br>श्री. श. का. आठल्ये, | | | | |
| **३)** | ७/११/१९६७ | (एकूण सदस्य -४३ )<br>श्री. कृ.ना. धुळुप,<br>श्री.ना.रा.काळे,<br>श्री. ब. द. किल्लेदार,<br>श्री. तु.कृ. कोलेकर,<br>श्री.अ.रा.गव्हाणे,<br>श्री.ग.अ.देशमुख,<br>श्री.के.शं. धोंडगे,<br>श्री.उध्दवराव पाटील,<br>श्री. द.ना.पाटील,<br>श्री. दि. बा. पाटील,<br>श्री. पा.रा.पाटील,<br>श्री. वि.चं.नाईक,<br>श्री. उ.र.नान्द्रे (पाटील),<br>श्री. शि. त्रिं. पवार,<br>श्री. सा.गो.पाटकर,<br>श्री. कृ.गं.देसाई, | संयुक्त महाराष्ट्र समिती | सीमा प्रश्न - महाजन अहवाल-महाराष्ट्र -म्हैसूर सीमावादासंबंधी महाजन कमिशनने सादर केलेला अहवाल जाळून टाका, मंत्र्यांनो राजीनामे द्या अशा घोषण केल्या अणि कामकाज सल्लागार समितीमध्ये श्री. धुळप यांनी यासंदर्भात प्रसंगी कामकाज बंद पाडू असे सांगितले | संपूर्ण कालावधीसाठी मा.अध्यक्षांनी नंतर असा आदेश दिला की फक्त दिनांक ७ नोव्हेंबर, १९६७ या दिवसाकरिता मर्यादित | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्री. श. का. आठल्ये,<br>श्री. वि.रा.काळदाते,<br>श्री. शि.दा.हिरे,<br>श्री. ब्र.कृ.माने,<br>श्री. द. ना.सामंत,<br>श्री.वि.रा.पाटील,<br>श्री. गो. तु. कालिकते,<br>श्री.<br>त्र्यं.सी.कारखानीस,<br>श्री.भा.शि.पाटील,<br>श्री.रा.धों.पाटील,<br>श्री. सं.मा.पाटील,<br>श्री. शं.भि. पोटिडे,<br>श्री. सु.रा.राऊत,<br>श्री. अ. प. शेटये,<br>श्री. पां.रा.सानप,<br>श्री. सी.स.सावंत,<br>श्री. नि. वि. उगले,<br>श्री. गु.भा.गणाचार्य,<br>डॉ.आर.बी.चौधरी<br>श्री.वि.अ.दराडे,<br>श्री.बा.कृ.देशमुख,<br>श्री.रा.मा.पंगारे,<br>श्री. ला.भ.जैस्वाल,<br>श्री. चंद्रकांत<br>आर.पाटील, | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्री. अहमद मौलवी<br>मा.उस्मान निहाल,<br>श्री. सी.स.भोये,<br>श्री.गुलाम महमद<br>हाजीनूरमहमद<br>बनातवाला | | | | |
| **४)** | ८/११/१९६७ | (एकूण सदस्य -४३ )<br>श्री. कृ.ना. धुळुप,<br>श्री.ना.रा.काळे,<br>श्री. ब. द. किल्लेदार,<br>श्री. तु.कृ.कोलेकर,<br>श्री.अ.रा.गव्हाणे,<br>श्री.ग.अ.देशमुख,<br>श्री.के. शं. धोंडगे,<br>श्री.उध्दवराव पाटील,<br>श्री. द.ना.पाटील,<br>श्री. दि. बा. पाटील,<br>श्री. पा.रा.पाटील,<br>श्री. वि.चं.नाईक,<br>श्री. उ.र.नान्द्रे<br>(पाटील),<br>श्री. शि. त्रिं. पवार,<br>श्री. सा.गो.पाटकर,<br>श्री. कृ.गं.देसाई,<br>श्री. श. का. आठल्ये,<br>श्री. वि.रा.काळदाते,<br>श्री. शि.दा.हिरे,<br>श्री. ब्र.कृ.माने, | संयुक्त महाराष्ट्र समिती | सीमा प्रश्नासंबंधी झालेल्या गोंधळातून अविश्वासाचा ठराव प्रथम चर्चेस घेण्यात यावा यासाठीचा आग्रह | दिनांक १७ नोव्हेंबर १९६७ पर्यंत | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्री. द. ना.सामंत,<br>श्री.वि.रा.पाटील,<br>श्री. गो. तु. कालिकते,<br>श्री.<br>त्र्यं.सी.कारखानीस,<br>श्री.भा.शि.पाटील,<br>श्री.रा.धों.पाटील,<br>श्री. सं.मा.पाटील,<br>श्री. शं.भि. पोटिडे,<br>श्री. सु.रा.राऊत,<br>श्री. अ. प. शेटये,<br>श्री. पां.रा.सानप,<br>श्री. सी.स.सावंत,<br>श्री. नि. वि. उगले,<br>श्री. गु.भा.गणाचार्य,<br>डॉ.आर.बी.चौधरी,<br>श्री. वि.अ.दराडे,<br>श्री.बा.कृ.देशमुख,<br>श्री.रा.मा.पंगारे,<br>श्री. ला.भ.जैस्वाल,<br>श्री. चंद्रकांत<br>आर.पाटील,<br>श्री. अहमद मौलवी<br>मा.उस्मान निहाल,<br>श्री. सी.स.भोये,<br>श्री.गुलाम महमद<br>हाजीनूरमहमद<br>बनातवाला | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **५)** | २२/३/१९७३ | (एकूण सदस्य-२७)<br>श्री. त्र्यं. सी. कारखानीस,<br>श्री. कृ. स. देशमुख,<br>श्री. के. शं. धोंडगे,<br>श्री. दी. बा. पाटील,<br>श्री. ह. रा. बारकुले,<br>श्री. पु. बा. काडू,<br>श्री.वि. चं. मस्के,<br>श्री. वि. बा. खाडीवाले,<br>श्री. वा. अं. देशमुख,<br>श्री. गुलाम अहमद हाजीनूरमहमद, बनातवाला,<br>श्री. ज. का. अहिर,<br>श्री. नि. रा. बोरकडे,<br>श्री. दु. सी. पवार,<br>श्री. अ. ना. पाटील,<br>श्री. अं. ना. थोपटे,<br>श्री. अ. टी. पाटील,<br>श्री स. दा. मंडलिक,<br>श्री. श्री. द. नातु,<br>श्री. दि. द. पाडवी,<br>श्री. कृ. धो. भेगाडे,<br>श्री. रा. का. म्हलगी, | शे.का.प. | महसूल विभागाच्या दुष्काळ व टंचाईच्या निमित्ताने - अनुदानाच्या मागण्यांच्यावेळी सदस्यांनी दुष्काळ निवारण आणि इतर चार मागण्यांसाठी शासनाचे आश्वासन नको कृती करावी अशी सभागृहात वारंवार मागणी करुन सभागृहात गोंधळ केल्याने. | दिनांक २२ मार्च ते २६ मार्च १९७३ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्री. अ. अ. वानखेडे,<br>श्री. प्र. नवलकर<br>श्री. मृ.के. गोरे,<br>श्री. दि. वि. पुरोहित,<br>श्री. गो.रा. शेंडगे,<br>श्री. ना. की. पाटील, | | | | |
| **६)** | ६/८/१९७४ | (एकूण सदस्य - १७)<br>श्री. दि. बा. पाटील,<br>श्री. का. रा. पाटील,<br>श्री. कि. ना. देशमुख,<br>श्री. वा. आ. देशमुख,<br>श्री. दि. डों. पाडवी,<br>श्री. कृ.धों. भेंगाडे,<br>श्री. श्री. द. नातु,<br>श्री. अ. अ.वानखेडे,<br>श्री. पु. बा. काडू,<br>श्री. व. बा. लंघे,<br>श्री. प्र. नवलकर,<br>श्रीमती मृ. गोरे,<br>श्री. ज. जाधवराव,<br>श्री. ज. मठकर,<br>श्री. डी.व्ही. पुरोहित,<br>श्री. जी.आर. शेंडगे,<br>श्री. वि. राजे धोंडे, | शे.का.प. | महागाई - टंचाईबाबत चर्चा - जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व महागाई या संदर्भात चर्चा चालू असताना (रॉकेल टंचाई) सभागृहात गोंधळ केल्याने. | दिनांक ६ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट १९७४ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७) | ७/८/१९७४ | (एकूण सदस्य - ५)<br>श्री. ग. आ. देशमुख,<br>श्री. एन. के. पाटील,<br>श्री. व्ही. सी. म्हसकर,<br>श्री. एच. आर. बारकुले,<br>श्री. ए. टी. पवार | | जीवनावश्यक वस्तुंची टंचाई व महागाई या संदर्भात दिनांक ६ ऑगस्ट १९७४ रोजी सभागृहात गोंधळ घातल्याने. | दिनांक ७ ऑगस्ट १९७४ ते दिनांक १२ ऑगस्ट १९७४ | |
| ८) | २९/३/१९८५ | (एकूण सदस्य - १३)<br>श्री. के. शं. धोंडगे,<br>श्री. ब. दा. ढाकणे,<br>श्री. सु. भि. जैन,<br>श्री. प. बा. पाटील,<br>श्री. ब. भि. पाचपुते,<br>श्री. वि. अ. गव्हाणे,<br>श्री. चं. सो. घोडके,<br>श्री. ह. उ.मोरे,<br>श्री. सु. चिं.खानोरकर,<br>श्री. श. मो. तसरे,<br>डॉ. श्रा.गो.पराते,<br>श्री. सु. शा. शिंदे,<br>श्री. वै. या आकात | | शासनाने शेतकऱ्यांकडील ज्वारी खरेदी करण्याची योजना दिनांक १५ मार्च १९८५ पासून अकस्मात बंद केली याबाबतच्या स्थगन प्रस्तावावर चर्चा करण्यास अनुमती न दिल्याने सभागृहात गोंधळ करुन राजदंड पाठविल्याबाबत. | संपूर्ण सत्रकालावधी | |
| ९) | २६/११/१९८७ | (एक सदस्य)<br>श्री. छगन भुजबळ | शिवसेना | मा.अध्यक्षांची अनुमती न घेता सभागृहात कापडी फलक दाखवून सभागृहात गैरवर्तन केले. | दि. २६ व २७ नोव्हेंबर १९८७ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **१०)** | २४/७/१९९१ | (एकूण सदस्य - ३)<br>श्री. सुर्यकांत महाडिक,<br>श्री. कालिदास कोळंबकर,<br>श्री. मारुती शिंदे | शिवसेना | विद्यमान विधानसभा सदस्यांची समितीवर निवड न केल्याबद्दल त्याकारणाने सभागृहाचे कामकाज सुरु असताना मा.मुख्यमंत्र्यांच्या आसनाजवळ जाऊन त्यांना शारिरीक इजा करण्याचा प्रयत्न केल्याबाबत. | संपूर्ण सत्रकालावधी | |
| **११)** | ३१/३/१९९३ | (एकूण सदस्य - ८)<br>श्री चंद्रकांत खैरे,<br>श्री.नारायण चव्हाण,<br>श्री. हेमेंद्र मेहेता,<br>श्री.जगन्नाथ पाटील,<br>श्री.राज पुरोहित,<br>श्री.सुरेश नवले,<br>श्री.प्रेमकुमार शर्मा,<br>श्री.गजानन किर्तीकर | शिवसेना व भा.ज.पा. | श्री. गडाख-विखे पाटील प्रकरणी औरंगाबाद उच्च न्यायालयाचा जो निकाल जाहीर झाला त्या संबंधात नियम ९७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास रोखून चर्चा हवी म्हणून सभागृहात एकसारखा गोंधळ केल्याबद्दल. | मा.अध्यक्षांनी नेम करुन दोन दिवस सभागृहात बसता येणार नाही असा निदेश दिला. | |
| **१२)** | २/४/१९९३ | (एकूण सदस्य -६)<br>श्री अर्जुन खोतकर,<br>श्री.रमेश नवले,<br>श्री. हरिभाऊ लहाने,<br>श्री.राज पुरोहित,<br>श्री.देवेंद्र साटम,<br>श्री.शाबीर शेख | शिवसेना व भा.ज.पा. | सभागृहात प्रस्तावावर चर्चा सुरु असताना मा.अध्यक्षांच्या टेबलावर हात आपटून कामकाजात अडथळा निर्माण केल्याबाबत. | सात दिवसासाठी निलंबित | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **१३)** | ३०/३/१९९५ | (एकूण सदस्य - १ )<br>श्री. रामभाऊ मोझे | काँग्रेस (आय) | मुंबईतील घुसखोरांवर कारवाई करण्याबाबतच्या शासनाच्या निर्णयासंबंधी आणलेला स्थगन प्रस्ताव अमान्य केल्याबद्दल दिनांक ३० मार्च १९९५ रोजी राजदंड पळवून फेकल्याबाबत. | दि. ४ ते ७ एप्रिल १९९५ पर्यंत. | संसदीय कार्य मंत्र्यांच्या प्रस्तावास सुधारणा सुचविल्याने व संबंधित सदस्यांनी माफी मागितल्याने फक्त ताकीद देण्यात आली. |
| **१४)** | ३०/७/१९९६ | (एकूण सदस्य ४)<br>श्री. माणिकराव ठाकरे,<br>श्री. अशोक धात्रक,<br>श्री. अनिस अहमद,<br>श्री. दिग्विजय खानविलकर | काँग्रेस (आय) | किणी मृत्यू प्रकरणी घोषणा, कापडी फलक व गैरवर्तन केल्याबाबत. | उर्वरित सत्र कालाकरिता | |
| **१५)** | २३/७/१९९७ | (एकूण सदस्य - ५)<br>श्री. नवाब मलिक,<br>श्री. सोहेल लोखंडवाला,<br>श्री. बशीर पटेल,<br>श्री. नरसय्या आडम,<br>श्री. विठ्ठल नाईक | समाजवादी व भा.क.प. | रमाबाई आंबेडकर नगरातील गोळीबार प्रकरणी सभागृहामध्ये प्रेतयात्रा काढणे, टेबलावरील पुस्तके व कागदपत्र फाडणे व अन्य गैरवर्तन केल्याबाबत. | १ दिवस | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **१६)** | १५/१२/१९९९ | (एकूण सदस्य-७)<br>श्री. दिलिप भोळे<br>श्री. रोहिदास चव्हाण,<br>श्री. भास्कर जाधव,<br>श्री. धाने-पाटील,<br>श्री.विनायक राऊत,<br>श्री. गुलाबराव पाटील,<br>श्री. सुभाष वानखेडे | सर्व शिवसेना | मंत्री व सत्ताधारी सदस्यांबद्दल सभागृहात अनुद्‌गार काढल्याबाबत. | ७ दिवस | दिनांक १७ डिसेंबर १९९९ रोजी निलंबन रितसर ठरावाव्दारे रद्द करण्यात आले. |
| **१७)** | २५/०७/२००० | (एकूण सदस्य - १२)<br>पहिले<br>श्री. शिवशरण बिराजदार<br>श्री. अनिल राठोड,<br>श्री. सुभाष वानखेडे,<br>श्री. अशोक शिंदे,<br>श्री. सुभाष साबणे,<br>श्री. सुरेश साळोखे<br>दुसरे<br>श्री. कल्याणराव पाटील,<br>श्री. गुलाबराव पाटील,<br>श्री. सिताराम भोईर, | शिवसेना | श्री. बाळासाहेब ठाकरे यांना अटक करण्यासंदर्भात शासनाचा निर्णय सभागृहातील साहित्याची नासधूस, मोडतोड व गैरवर्तन केल्याबाबत. | पहिले ६ सदस्य- १ वर्ष<br>दुसरे ६ सदस्य- ६ महिने | दिनांक २५/७/२००० रोजी श्री. विनायक राऊत यांचे नाव नजरचुकीने समाविष्ट केल्यामुळे त्यांची शिक्षा मागे घेण्यात आली व गैरवर्तन करणारे परंतु नांव समाविष्ट |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्री. दिलीप भोळे,<br>श्री. रविंद्र माने,<br>श्री. विनायक राऊत | } | | | करण्याचे राहिलेले श्री. आर.एम.वाणी वश्री.प्रकाश खेडेकर यांचे सदस्यत्व १ वर्षासाठी निलंबित करण्यात आले. |
| **१८)** | २७/०७/२००० | (एकूण सदस्य - २)<br>श्री. प्रकाश खेडेकर,<br>श्री. आर. एम. वाणी | शिवसेना | श्री. बाळासाहेब ठाकरे यांना अटक केल्याप्रकरणी सभागृहातील साहित्याची नासधूस, मोडतोड व गैरवर्तन केल्याबाबत. | १ वर्षाकरिता | श्री. विनायक राऊत यांचे नजरचुकीने समाविष्ट झालेले नांव मागे घेण्यात आले व या दोन सदस्यांचे १ वर्षासाठी सदस्यत्व निलंबित करण्यात आले दिनांक ४ डिसेंबर २००० रोजी रितसर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ठरावाव्दारे या प्रकरणात १ वर्ष शिक्षा झालेल्या एकूण आठ सदस्यांचे सदस्यत्व निलंबन सहा महिन्यापर्यंत कमी करण्यात आले. |
| **१९)** | २७/०३/२००१ | (एकूण सदस्य ९)<br>श्री. राज पुरोहित<br>श्री. गिरीष बापट,<br>श्री. अरुण अडसड,<br>श्री. साहेबराव घोडे,<br>श्री. अतुल शहा,<br>श्री. देवेंद्र फडणवीस,<br>श्री. हेमेंद्र महेता,<br>श्री. विनय श्रीधर नातू,<br>श्री. गिरीश महाजन | भा.ज.पा. | राज्यमंत्री श्री. एकनाथ गायकवाड यांचे कथित भ्रष्टाचार प्रकरणी सभागृहात गोंधळ, घोषणा व गैरवर्तन केल्यामुळे. | सत्र कालावधीसाठी | |
| **२०)** | ०६/१२/२००५ | (एकूण सदस्य ०१)<br>श्री. गुलाबराव गावंडे | शिवसेना | सभागृहात विषारी किटकनाशक व एक केरोसिनने भरलेली बाटली आणून अचानक उभे राहून व सभागृहाच्या वेलमध्ये येऊन किटकनाशकाची बाटली तोंडाला लावून | उर्वरित सत्र काळाकरीता | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | केरोसिनची बाटली डोक्यावर ओतण्याचा प्रयत्न केल्यामुळे. | | |
| **२१)** | १३/१२/२००५ | (एकूण सदस्य ०३)<br>श्री. एकनाथ खडसे<br>श्री. गिरीश महाजन<br>श्री. सुधीर मुनगंटीवार | भा.ज.पा. | मा.अध्यक्षांच्या दालनात येवून मा.उपाध्यक्षांना शिवीगाळ केल्याप्रकरणी सभागृहात प्रस्ताव. | सहा महिने | दिनांक १३.३.२००६ रोजी निलंबन मागे घेतले. |
| **२२)** | ०५/१२/२००६ | (एकूण सदस्य १०)<br>श्री. देवेंद्र फडणवीस<br>श्री. गिरीश महाजन<br>श्री. सुनिल धांडे<br>श्री. रविंद्र गायकवाड<br>श्री. वामनराव चटप<br>श्री. एकनाथ शिंदे<br>श्री. संदीप धुर्वे<br>श्री. बाबुराव पाचर्णे<br>श्री. शरद ढमाले<br>श्री. दिलीप येळगावकर | भा.ज.प. | शेतकरी आत्महत्या आक्षेपार्ह सभागृहात फलक फडकविणे व प्रेत यात्रा काढल्याबाबत. | तीन दिवसांसाठी निलंबित | दिनांक ७.१२.२००६ रोजी निलंबन मागे घेतले. |
| **२३)** | १/४/२००८ | (एकूण ०६ सदस्य)<br>श्री. वामनराव चटप<br>श्री. संजय चव्हाण<br>श्री. राज पुरोहित<br>श्री. बच्चू कडू<br>श्री. अर्जुन खोतकर<br>श्री. संजय कुटे | शे.का.प., अपक्ष, भा.ज.पा., शिवसेना | मा. अध्यक्षांच्या आसनासमोरील डायसवरील जाड पुस्तके मा. तालिका अध्यक्षांना फेकून मारली. तसेच टाचण्यांचा बॉक्स मा. तालिका अध्यक्षांच्या रोखाने भिरकावल्याबाबत. | एक वर्षाकरिता | दिनांक २४ एप्रिल, २००८ रोजी निलंबन मागे घेतले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **२४)** | १६/६/२००९ | (एकूण सदस्य ३) श्री. विनोद तावडे, श्री.दिवाकर रावते, श्री. अरविंद सांवत, वि.प.स. | भा.ज.पा., शिवसेना | मा.सभापतींचा अवमान व अनादर केला. संसदीय प्रथा, परंपरा पायदळी तुडविल्या, सभागृहातील कागदपत्रे भिरकावून दिल्याबाबत. | श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे सदस्यत्व ३ वर्षांसाठी (१६ जून, २००९ ते १५ जून, २०१२) तसेच सर्वश्री. दिवाकर रावते व श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांचे सदस्यत्व त्यांच्या सदस्यत्वाची मुदत संपेपर्यंत. | दिनांक ११ नोव्हेंबर, २००९ रोजी निलंबन मागे घेतले. |
| **२५)** | १०/११/२००९ | (एकूण सदस्य ४) श्री.शिशिर शिंदे, श्री.रमेश वांजळे, श्री.राम कदम, श्री.वसंतराव गिते | म.न.से. | सभागृहातील शपथविधीचा कार्यक्रम सुरु असताना अनूचित वर्तन केल्याबाबत | दिनांक १० नोव्हेंबर, २००९ पासून चार वर्षांकरिता. | दिनांक १२ जुलै, २०१० रोजी निलंबन मागे घेतले. |
| **२६)** | २/१२/२०१० | (एकूण सदस्य ५) श्री.संजय राठोड, ॲड.आशिष जयस्वाल, कॅप्टन अभिजीत अडसूळ, प्रा.शरद पाटील, श्री.रविंद्र वायकर | शिवसेना | सभागृहाचे कामकाज सुरु असताना सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे अत्यंत घृणास्पद व लांछनीय वर्तन व राजदंड पळविण्याबाबत. | दिनांक २ डिसेंबर, २०१० पासून पुढील वर्षाचे हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत | दिनांक १५ डिसेंबर, २०१० रोजी निलंबन मागे घेतले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **२७)** | २४/३/२०११ | (एकूण सदस्य ९)<br>श्री.विनोद घोसाळकर,<br>श्री.हरिष पिंपळे,<br>श्री.विजय शिवतारे,<br>श्री.विजयकुमार देशमुख,<br>श्री.गिरीष महाजन,<br>श्री.एकनाथ शिंदे,<br>श्री.प्रताप सरनाईक,<br>श्री.तारासिंग सरदार,<br>श्री.रविंद्र वायकर | शिवसेना,<br>भारतीय जनता पार्टी,<br>म.न.से. | मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांना अर्थसंकल्प मांडू देण्यास अडथळा आणणे, बॅनर फडकविणे, घोषणाबाजी करणे तसेच मा.अध्यक्षांच्या निदेशाचा अवमान करणे अशा प्रकारे सभागृहाची प्रतिष्ठ मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे अत्यंत अशोभनीय वर्तन केल्याबाबत. | दिनांक २४ मार्च, २०११ पासून दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत | दिनांक २९ मार्च, २०११ रोजी निलंबन मागे घेतले. |
| **२८)** | १९/४/२०११ | (एकूण सदस्य १)<br>श्री. विजय शिवतारे,वि.स.स. | शिवसेना, | सभागृहातून विरोधी पक्ष सभात्याग करित असताना सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.विजय शिवतारे यांनी मा.अध्यक्षांच्या संदर्भात आक्षेपार्ह शब्दांचा वापर करुन सर्वोच्च सभागृहाच्या माननीय अध्यक्षांचा अवमान केल्यामुळे. | दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी दिवसाचे कामकाज संपेपर्यत निलंबीत करण्यात आले. | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **२९)** | १३/१२/२०११ | (एकूण सदस्य १) श्री.नितीन भोसले, वि.स.स | म.न.से | सभागृहाच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे, बॅनर फडकविणे, घोषणाबाजी करणे तसेच मा.अध्यक्षांच्या निदेशाचा अवमान केल्याबाबत. | दिनांक १३/१२/२०११ रोजी सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत | सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत |
| **३०)** | १३/१२/२०११ | (एकूण सदस्य १) श्री.नाना पटोले, वि.स.स. | भा.ज.प. | अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे. | दिनांक १३/१२/२०११ पासून सन २०१२ चे हिवाळी अधिवेशन समाप्त हाईपर्यंत. | दिनांक २३/१२/२०११ रोजी निलंबन मागे घेतले. |
| **३१)** | १५/१२/२०११ | (एकूण सदस्य २) श्री.केशवराव मानकर,वि.प.स. श्री.सय्यद पाशा पटेल,वि.प.स. | भा.ज.प. | अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे. | दिनांक १५/१२/२०११ रोजी पासून सदस्यत्वाची मुदत संपेपर्यत. | दिनांक २३/१२/२०११ रोजी निलंबन मागे घेतले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **३२)** | १९/१२/२०११ | (एकूण सदस्य ५)<br>श्री.चंद्रकांत हंडोरे, वि.स.स.<br>श्री.नवाब मलिक, वि.स.स.<br>श्री.शशीकांत शिंदे, वि.स.स.<br>श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स.<br>श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स. | काँग्रेस<br>रा.का. | सभागृहात फलक फडकविल्यामुळे व मा. अध्यक्षांच्या निदेशांचे पालन न केल्यामुळे. | दिनांक १९/१२/२०११ रोजी सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत. | सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत |
| **३३)** | २०/०३/२०१२ | (एकूण सदस्य १)<br>श्री.राम पंडागळे,वि.प.स. | भा.ज.प. | सभागृहात आक्षेपार्ह वर्तन करुन अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे. | दिनांक २०/०३/२०१२ रोजी पासून विद्यमान अर्थसंकल्पिय सत्र संपेपर्यंत. | सत्र समाप्तीमुळे आपोआपच निलंबन रद्द झाले. |
| **३४)** | २०/०३/२०१२ | (एकूण सदस्य १)<br>श्री.जैनुद्दीन झव्हेरी,वि.प.स. | अपक्ष | सभागृहात आक्षेपार्ह वर्तन करुन अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे. | दिनांक २२/०३/२०१२ रोजी पर्यंत. | निलंबनाचा कालावधी संपल्यानंतर आपोआपच निलंबन रद्द झाले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **३५)** | ३०/०३/२०१२ | (एकूण सदस्य - १४)<br>श्री.प्रताप सरनाईक,वि.स.स.<br>श्री.महादेव बाबर, वि.स.स.<br>श्री.विजय शिवतारे,वि.स.स.<br>श्री.एकनाथ शिंदे, वि.स.स.<br>श्री.विनोद घोसाळकर,वि.स.स.<br>श्री.राजन विचारे,वि.स.स.<br>श्री.ज्ञानराज चौगुले,वि.स.स.<br>श्री.संजय गावंडे,वि.स.स.<br>डॉ.बालाजी किणीकर,वि.स.स.<br>कॅ.अभिजीत अडसूळ,वि.स.स.<br>डॉ.सुजित मिणचेकर,वि.स.स.<br>श्री.चंद्रकांत मोकाटे,वि.स.स.<br>श्री.दौलत दरोडा, वि.स.स.<br>प्रा.राम शिंदे,वि.स.स. | शिवसेना -१३<br>भाजप -१ | सन्माननीय सदस्यांनी डोक्यावर टोप्या घालून, गळ्यात भगवे दुपट्टे घालून, टाळ वाजवत व घोषणा देत सभागृहात प्रवेश केला व सभागृहाचे कामकाज पार पाडण्यास अडथळा निर्माण केल्याबाबत. | दिनांक ३०/०३/२०१२ पासून एक वर्षाकरिता निलंबित. | दिनांक २०/०४/२०१२ रोजी निलंबन मागे घेतले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **३६)** | २०/०३/२०१३ | (एकूण सदस्य - ५)<br>श्री.राम कदम,<br>वि.स.स.<br>श्री.क्षितीज हितेंद्र ठाकूर,वि.स.स.<br>श्री.जयकुमार रावल,वि.स.स.<br>श्री.प्रदीप जयस्वाल,वि.स.स.<br>श्री.राजन साळवी,<br>वि.स.स. | म.न.से.<br>ब.वि.आ.<br><br>भा.ज.प<br>शिवसेना<br>शिवसेना | आक्षेपार्ह वर्तन करुन अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे. | दिनांक २०/०३/२०१३ पासून दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत. | |
| **३७)** | १६/०४/२०१३ | (एकूण सदस्य -१ )<br>श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर,<br>वि.स.स. | शिवसेना | सभागृहाचे कामकाजामध्ये अडथळा आणणे, घोषणाबाजी करणे, राजदंड उचलणे तसेच मा.अध्यक्षांचे निदेशाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे. | दिनांक १६/०४/२०१३ पासून १ वर्षाकरीता. | |

## विशेषाधिकार भंग प्रकरणी देण्यात आलेल्या तुरुंगवासाच्या शिक्षांच्या प्रकरणांचे
## विवरणपत्र
## (महाराष्ट्र विधानमंडळातील विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणांचा सारसंग्रह या प्रकाशनाच्या आधारे )

| अ.क्र. (१) | प्रकरणाचे नाव (२) | कोणाविरुध्द (३) | प्रमादाचे स्वरुप (४) | समितीने केलेली शिफारस (५) | सभागृहाने मान्य केलेला प्रस्ताव (६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | "श्री. ढाकणे" प्रकरण (विधानसभा) | श्री.बबनराव ढाकणे | अध्यक्षांच्या गॅलरीतून घोषणा देऊन, पत्रके फेकून सभागृहाच्या कामकाजामध्ये अडथळा आणला. | श्री. ढाकणे यांना ७ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे. | दिनांक ९ जुलै, १९६८ रोजी सभागृहाने समितीची शिफारस स्विकारली. |
| २. | "प्रशस्ती" प्रकरण (विधानसभा) | "प्रशस्ती" या मराठी साप्ताहिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक | "या आमदारांना जिवंत जाळा" या शीर्षकाखालील लेखामध्ये आमदारांवर व मा. अध्यक्षांवर टीकाटिप्पणी केली. | संपादक, मुद्रक व प्रकाशक साप्ताहिक "प्रशस्ती" यांना ३० दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे. | दिनांक १६ नोव्हेंबर, १९७३ रोजी सभागृहाने समितीची शिफारस स्विकारली व त्यानुसार संपादकांस तुरुंगात टाकण्यात आले. |
| ३. | "रणांगण" प्रकरण ( विधानसभा ) | "रणांगण" या मराठी साप्ताहिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक | विधानसभेच्या दिनांक ८ एप्रिल, १९७५ रोजीच्या कार्यवाही वृत्तावर तसेच सभागृह व सदस्यांवर टीका केली. | संपादक, मुद्रक व प्रकाशक साप्ताहिक "रणांगण"यांना ९० दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे. | दिनांक २८ नोव्हेंबर, १९७५ रोजी सभागृहाने समितीची शिफारस एकमताने स्विकारली. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | "रेल्वे" प्रकरण (विधानसभा) | १)श्री. विनोद फत्तेपुरीया<br>२)श्री. पुरुषोत्तमलाल चतुर्वेदी (चौबे), विशेष कार्यकारी दंडाधिकारी<br>३) श्री. देसराज, सिनियर डिव्हिजनल अकाऊंटन्स ऑफिसर आणि श्री. तिरपुडे, चीफ रिझर्व्हेशन इन्स्पेक्टर | सभागृहाची बैठक संपल्यानंतर आपापल्या मतदारसंघात जात असताना रेल्वे अधिकाऱ्यांनी व प्रवाशांनी सदस्यांना अवमानास्पद वागणूक दिली. | १) श्री. फत्तेपुरीया यांना ९० दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे.<br>२)श्री. चतुर्वेदी यांना ७ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे.<br>३)श्री.देसराज व श्री. तिरपुडे यांना ३० दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे. | दिनांक २१ जुलै, १९८८ रोजी सभागृहाने खालीलप्रमाणे सुधारणा सुचविणारा प्रस्ताव एकमताने संमत केला.<br>१) श्री. विनोद फत्तेपुरीया यांना ८ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे.<br>२) श्री. पुरुषोत्तमलाल चतुर्वेदी (चौबे) यांना ७ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे.<br>३) श्री. देसराज यांना १५ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे.<br>४) श्री. तिरपुडे यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | "रेल्वे" प्रकरण (विधानपरिषद) | १) श्री. फत्तेपुरीया<br>२)श्री. खैरकर व श्री. देसराज<br><br>३) श्री. वर्मा व श्री. तिरपुडे | सभागृहाची बैठक संपल्यानंतर आपापल्या मतदारसंघात जात असताना रेल्वे अधिकाऱ्यांनी व प्रवाशांनी सदस्यांना अवमानास्पद वागणूक दिली. | १) श्री. फत्तेपुरीया यांना ३० दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे.<br>२) श्री. खैरकर व श्री. देसराज यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी व सभागृहाची बैठक संपेपर्यंत त्यांना ताब्यात घ्यावे.<br>३) श्री. वर्मा व श्री. तिरपुडे यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी. | दिनांक २६ जुलै,१९८८ रोजी सभागृहाने खालीलप्रमाणे सुधारणा सुचविणारा प्रस्ताव एकमताने संमत केला.<br>१) श्री. फत्तेपुरीया यांना ७ दिवस कारावासात पाठविण्यात यावे.<br>२) श्री. देसराज, श्री. तिरपुडे व श्री. वर्मा यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी. |
| ६. | "दक्षता" प्रकरण (विधानसभा) | "दक्षता" मासिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक तसेच त्यातील लेखाचे लेखक, श्री. मनोहर हिरे | विधानसभा प्रश्नोत्तराबाबतच्या मजकुराचा संदर्भ देऊन विधानमंडळ सदस्यांवर हेत्वारोप केले. | लेखाचे लेखक श्री. मनोहर हिरे यांना ५ दिवसांसाठी कारवासात पाठविण्यात यावे. | दिनांक ३ मार्च, १९९० रोजी सातवी विधानसभा विसर्जित झाल्यामुळे अहवाल सभागृहात विचारार्थ येऊ शकला नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | "श्री. रामदास नायक आणि श्री. धरमचंद चोरडिया" प्रकरण (विधानपरिषद) | श्री. रामदास नायक आणि श्री. धरमचंद चोरडिया | पत्रकार परिषदेमध्ये मा.विधानसभा अध्यक्षांबद्दल आक्षेपार्ह भाष्य तसेच टीका केली. | श्री. नायक व श्री. चोरडिया यांना १४ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे. तसेच श्री. रामदास नायक यांना, समिती सदस्यांना अशिष्ट भाषेत पत्र पाठविल्याबद्दल अतिरिक्त एक दिवस जादा कारावासाची शिक्षा देण्यात यावी. | दिनांक २९ जुलै, १९९१ रोजी प्रस्तावात सुधारणा करुन श्री. नायक व श्री. चोरडिया यांना एक दिवसाची कारावासाची शिक्षा देण्याचे सभागृहात ठरविण्यात आले. |
| ८. | "आपलं महानगर" प्रकरण (विधानसभा) | "आपलं महानगर" या सायं-दैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. निखिल वागळे | "ही ढोंगबाजी कशासाठी?" या शीर्षकाखाली प्रसिध्द झालेल्या लेखात सभागृहाच्या कामकाजाच्या वृत्तांतावर टीकाटिप्पणी केली. | श्री. वागळे यांना ३ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे. समितीने आदेश देऊनही समितीपुढे हजर न राहण्याच्या, साक्षीपुरावा सादर करण्याचे नाकारण्याच्या व उलट समितीच्या अधिकाराचा अधिक्षेप करणारे आव्हानात्मक पत्र लिहिण्याच्या प्रमादाबद्दल त्यांना एक दिवसासाठी जादा कारावासात पाठविण्यात यावे. | दिनांक २१ एप्रिल, १९९४ रोजी सभागृहाने समितीची शिफारस एकमताने स्विकारली. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | "सामना" प्रकरण (विधानसभा) | "दै.सामना" या दैनिकाचे संपादक श्री. बाळ ठाकरे आणि मुद्रक व प्रकाशक श्री. सुभाष देसाई | मा.अध्यक्ष, विधानसभा यांच्यासंबंधी आक्षेपार्ह मजकूर प्रसिध्द केला तसेच मा.अध्यक्षांविषयी, मुख्यमंत्र्यांच्या हातातील बोलके बाहुले असे व्यंगचित्र रेखाटल्यामुळे उदभवलेला विशेषाधिकार भंग व अवमानाचा प्रश्न. | श्री. ठाकरे व श्री. देसाई यांना ७ दिवसांसाठी कारावासात पाठविण्यात यावे. | मुख्यमंत्र्यांनी सुचविलेल्या सुधारणेनुसार समितीच्या अभिप्रायांच्या संदर्भात पुनर्विचार करण्यासाठी सदर प्रकरण समितीकडे पुन्हा सुपूर्द करण्यात आले. तद्नंतर मार्च, १९९५ मध्ये आठवी विधानसभा विसर्जित झाल्यामुळे सदर प्रकरण व्यपगत झाले. |
| १०. | "श्री.मनजितसिंग सेठी" प्रकरण (विधानसभा) | "श्री.मनजितसिंग सेठी, बार मालक असोसिएशन यांच्या विरुद्ध" | राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा.श्री.आर. आर. पाटील यांनी राज्यातील डान्स बार तातडीने बंद करण्याचा निर्णय विधानसभेत दिनांक ३० मार्च, २००५ रोजी जाहिर केला असता श्री.मनजितसिंग सेठी, अध्यक्ष बार मालक असोसिएशन यांनी "या | श्री.सेठी यांच्यासारख्या समाजास घातक ठरणाऱ्या प्रवृत्तीला आळा घालण्याची निकड लक्षात घेता त्यांना विशेषाधिकारभंग केल्याबद्दल नव्वद दिवसांची कारावासाची शिक्षा देण्यात यावी, अशी समितीने आग्रहाची शिफारस केली.( दिनांक ८/१२/२००५ रोजी | दिनांक १२ एप्रिल, २००६ रोजी सदरच्या अहवालावर सभागृहाने विचार केला आणि श्री.मनजितसिंग सेठी यांना ९० दिवसांची कारावासाची शिक्षा देण्यात यावी असा प्रस्ताव पारित केला. त्याच दिवशी श्री.मनजितसिंग सेठी यांना अटक करण्यात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | निर्णयाविरोधात डान्स बारमधील महिला रस्त्यावर उतरतील आणि मंत्र्यांच्या बायकांना बाहेर फिरू देणार नाहीत" अशा धमकीवजा शब्दात त्याचा निषेध केल्यामुळे उदभवलेला विशेषाधिकार भंग व अवमानाचा प्रश्न. | सभागृहास अहवाल सादर) | आली आणि तूरुंगात पाठविण्यात आले.<br>श्री.मनजितसिंग सेठी यांनी ९० दिवसांपैकी २९ दिवसांची शिक्षा भोगली व त्या दरम्यान श्री.मनजित सिंग सेठी यांनी शिक्षेविरुध्द मा.उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल केल्या. त्या मा.उच्च न्यायालयाने फेटाळल्यामुळे श्री.मनजित सिंग सेठी यांनी त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलात मा.सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेला अंतरीम स्थगिती दिली परीणामी त्यांना दिलेल्या शिक्षेची पूर्ण अंमलबजावणी होऊ शकली नाही व |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सद्य:स्थितीत हे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात निर्णयार्थ प्रलंबित आहे. (मे, २०१३) |
| ११. | "श्री.नंद लाल" प्रकरण (विधानसभा) | श्री. नंद लाल, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेविरुध्द. | श्री.नंद लाल, राज्य निवडणूक आयुक्त यांनी, त्यांच्याविरुद्ध श्री.जनार्दन चांदूरकर, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या विशेष हक्कभंगाच्या सूचनेबाबत विधानसभा विशेष हक्क समितीने मागविलेला खुलासा स्वत:चे स्वाक्षरीने पाठविण्यास टाळाटाळ करुन तसेच सदरहू सूचनेच्या अनुषंगाने समितीसमोर साक्षीसाठी उपस्थित राहण्यास नकार देऊन समितीच्या संविधानिक व वैधानिक कार्यामध्ये अडथळा निर्माण केल्यामुळे उदभवलेला | श्री.नंद लाल यांना सात दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी. तसेच मूळ हक्कभंगाच्या सुचनेवरील पुढील कार्यवाही करणे समितीस शक्य होण्यासाठी श्री.नंद लाल यांना सभागृहाच्या वतीने असेही कळविण्यात यावे की, त्यांनी यापुढे विशेष हक्क समितीनें मागविलेले खुलासे स्वत:च्या स्वाक्षरीने समितीस सादर न केल्यास किंवा समितीने बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कळवूनही ते समितीसमोर उपस्थित न राहिल्यास | दिनांक २७ मार्च, २००८ रोजी समितीने सभागृहाला सादर केलेल्या अहवालात ७ दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस केली. तथापी सभागृहाने ही शिक्षा कमी करुन या प्रकरणी दोन दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा द्यावी असा ठराव संमत केला. त्यानुसार श्री. नंद लाल यांनी २ दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली. (दिनांक २७ व२८ मार्च, २००८). श्री.नंद लाल यांनी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | विशेषाधिकार भंग व अवमानाचा प्रश्न. | त्यांचेविरुद्ध याहूनही कडक भूमिका घेणे सभागृहास भाग पडेल. (दिनांक २७/३/२००८ रोजी सभागृहास अहवाल सादर करण्यात आला.) | सदरहू शिक्षेविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. परंतु ती मा.न्यायालयाने फेटाळली. श्री. नंद लाल यांनी मा.उच्च न्यायालयाच्या निकाला विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालय येथे याचिका (SLP) दाखल केली व ती मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबित आहे. (मे,२०१३) |
| १२ | "श्री.जी.एन.वळवी" प्रकरण (विधानसभा) | श्री.जी.एन.वळवी, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालय, यावल, जि.जळगाव यांचेविरुध्द | आदिवासी विकास विभागाच्या नंदुरबार व यावल येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारामध्ये श्री.जी.एन. वळवी, प्रकल्प अधिकारी यांचा सहभाग असल्यामुळे | प्रस्तुत प्रकरणी श्री.जी.एन.वळवी, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालय, यावल, जि.जळगाव यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलविण्यात येऊन समज देण्यात यावी, | **दिनांक १३ एप्रिल,२०१२ रोजी** सदर पुनर्विलोकीत अहवाल विचारात घेताना सभागृहाने ३ (तीन) दिवसांच्या कारावासाच्या शिक्षेऐवजी २ (दोन) दिवसांच्या कारावासाची शिक्षा देण्यात यावी असा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेत्यांनी व इतर सदस्यांनी दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी विधानसभेत लक्षवेधी सुचनेवरील चर्चेच्या वेळी केल्याने श्री.जी.एन.वळवी यांनी चिडून जाऊन आकसाने मा.विरोधी पक्ष नेत्यांविरुध्द जिल्हा पोलीस प्रशासनाकडे अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची तक्रार करुन तसेच ह्या विषयी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करुन श्री.वळवी यांनी त्यांच्यावर असलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांची चौकशी | अशी समितीने **दिनांक ८/१२/२०१० रोजी सभागृहास सादर केलेल्या अहवालात** शिफारस केली.<br>मा.अध्यक्षांनी सभागृहाची एकदंरीत भावना लक्षात घेऊन तसेच सर्व गटनेत्यांशी केलेल्या चर्चेनंतर सभागृहाच्या अनुमतीने सदरहू प्रकरण पुन:श्च विचार करण्याकरिता समितीकडे पाठविण्यात यावे असे निदेश दिले.<br>या प्रकरणी समितीने पुनर्विचारांती असा निर्णय घेतला की, यापुढे अशाप्रकारच्या प्रकरणामध्ये एक उदाहरण (Example) कायम व्हावे म्हणून श्री.जी.एन.वळवी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल,जि.जळगाव | ठराव मंजूर केला. त्यानुसार श्री.जी.एन.वळवी, यांनी दोन दिवसांची कारावासाची शिक्षा भोगली. (दिनांक १४/४/२०१२ ते दिनांक १५/४/२०१२) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दडपण्यासाठी दबाव आणल्यामुळे उदभवलेला विशेषाधिकार भंग व अवमानाचा प्रश्न. | यांच्या संदर्भातील विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणात त्यांना ३ (तीन) दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस समितीने **दिनांक १२/८/२०११ रोजी सभागृहास सादर केलेल्या पुनर्विलोकित अहवालात केली.** | |

## १८. विशेषाधिकार भंग संदर्भातील काही महत्वाचे न्यायनिर्णय

(1) Two very significant questions concerning parliamentary privileges have been decided by the Supreme Court in **P.V. Narsimha Rao v. State**. (AIR 1998 Supreme Court 2720) These questions arose in the following factual context. The Narsimha Rao Government at the Centre did not enjoy majority in Lok Sabha in 1993. A vote of no-confidence was moved against the Government by the opposition parties. To avert defeat on the floor of the House, certain members of the ruling party gave large sums of money to a few members of the Jharkhand Mukti Morcha (JMM) to vote against the motion on the floor of the House. Consequently, the no-confidence motion was defeated in the House with 251 for and 265 against. Two questions arose for the consideration of the Supreme Court in the instant case:

(a) whether by virtue of Arts. 105(1) and 105(2), a member of Parliament can claim immunity from prosecution before a criminal Court on a charge of bribery in relation to the proceedings in Parliament?

(b) whether a member of Parliament is a 'public servant' under the Prevention of Coruption Act, 1988?

The five Judge Bench deciding the case split 3 : 2

